# मैत्रबंध



अरुण कुलकर्णी

# मैत्रबंध

## अरुण कुळकर्णी

ई साहित्य प्रतिष्ठान

# मैत्रबंध

लेखक- अरुण कुळकर्णी
८,ग्रीनपार्क सोसायटी,
सुसेन-तरसाली रोड
वडोदरा-३९००१०
मो. ०७३५९२१२२११,
Email- Kulkarni@technique-baroda.com
Arungk1943@gmail.com

या कथांचे सर्व अधिकार ©
श्री. अरुण गणेश कुळकर्णी किंवा त्यांचे वारस श्री रविंद्र अरुण कुळकर्णी
८, ग्रीनपार्क सोसायटी,
मकरपुरा रोड बडोदा ३९० ०१० यांच्याकडे आहेत.
मो. ०७३५९२१२२११ 7228884030किंवा ०९८२४०१५२६२
Email- kulkarni@technique-baroda.com
Arungk1943@gmail.com

या कथांचे सर्व अधिकार वरीलप्रमाणे असून कोणत्याही कथेचे कथावाचन, नाट्यरुपांतर अथवा सिनेरुपांतर करण्यासाठी कॉपी राईट मालकाची लिखित परवानगीची जरुरी आहे.

ई प्रकाशक :
ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com
ई प्रकाशन : १७ ऑगस्ट २०१६
©esahity Pratishthan®2016

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# मनोगत

मराठी साहित्य रसिकानी माझ्या “एकटे जीव” व “इनामदारीण” या दोन पुस्तकाना सुंदर दाद दिली. ही दोन पुस्तके २०१२ मधे प्रसिद्ध झाली होती. मार्च २०१६ मधे डिजिटल प्रत ई-साहित्यने प्रसिद्ध केल्यावर देश विदेशातून खूपच सुंदर प्रतिसाद मिळाला.

आज “मैत्रबंध” या तीन कथा डिजिटल प्रत रूपात  ईंटरनेटवर वर प्रकाशित करताना मला खरोखरच आनंद होत आहे. पुस्तक प्रसिद्ध करण्यासाठी प्रकाशक तयार नसतात. वाचकांचा दुष्काळ पडला असावा असा भास होत असताना ईंटरनेट सारख्या माध्यमातून गोष्टी अचूक वाचकांपर्यंत कोणत्याही खर्चाशिवाय पोचवण्याचा मार्ग सापडला.

लहानपणापासून  कोंकणात जे पाहीले, अनुभवले त्या कित्येक प्रसंगांची, व्यक्तींची, व्यंगांची, चालीरीतींची अनेक प्रतिबिंबे मनावर कोरली गेली होती. मनाच्या सांदीकोपऱ्यात दडलेल्या या गोष्टींनी रीटायर झाल्यावर मनात फेर धरला आणि कागदावर झरझर उतरत गेल्या.

लहानपणीच्या निरागस मैत्रीचे बंध वर्णीत करणाऱ्या या कथा तुम्हाला विचार करायला लावतील पण वाचनाचा निर्भेळ आनंदही देतील.

स्वातंत्र्या नंतरता तो काळ. त्यावेळी सर्वचजण गरीब होते. प्रत्येक जीवनोपयोगी वस्तुची चण चण होती. दुसऱ्या युद्धानंतर सर्वच गोष्टींचे रॅशनिंग चालू झाले होते. प्रत्येक जण जगण्याची धडपड करत होता. आपल्या आयुष्याची वाटचाल कण्हत कुंथत करीत होता. त्या हाल अपेष्टातही काही लोकांचे जीवन जवळून पहायला मिळाले. किशोरावस्थेत त्या माणसांची चित्रे मनावर कोरुन ठेवली. ती अशी गोष्टीतून सुमाक्का, गोमती, व पाऊ या रुपाने कथेत उतरली. कधी मनावर ओरखडे उठवणारे प्रसंग, कधी मजेशीर प्रसंग, कधी कांही शिकवून जाणारे प्रसंग पकडून त्याची प्रतिबिंबे मनात साठवण्याची एक सवय पडून गेली आणि पुढेही चालू राहीली. आयुष्याच्या वाटचालीत कोंकण, कोल्हापूर, सांगली, मुंबई करत बडोद्याला पोहोचेपर्यंतची ही असंख्य प्रतिबिंबे मी चित्रित करायची ठरवली. व लिहू लागलो. “एकटे जीव” मधल्या व्यक्तिरेखा आणि या “मैत्रबंध”  मधल्या गोष्टी या सर्व प्रतिबिंबांचा आलेख आहे.

या पुस्तकात मी कांही प्रयोग केले आहेत. सुमाक्का ही गोष्ट गद्य व पद्य यांचे मिश्रण आहे तसेच बायकानी न बोलताच सर्व सहन करण्याचा परीणाम किती भयंकर होतो तेही या कथेत दाखवले आहे.

यातील दोन कथा मेनका मासिकातून प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या अनुक्रमणिकेत दर्शविल्या आहेत.

आपल्याला या कथा आवडल्या का? आपण जरूर कळवा त्यातील चुकांसह कळवल्यात तर फार आनंद होईल. जरूर ई मेल करून आपला अभिप्राय कळवावा.

अरुण कुळकर्णी

Kulkarni@technique-baroda.com or

Arungk1943@gmail.com

Mobile- 07359212211

07228884030



# कथा अनुक्रम

**१. सुमाक्का** .............................. (मेनका दिवाळी २०१४)
**२. गोमती** ................................. (मेनका २०१५)
**३. पाऊ**

# सुमाक्का



कोकणातलं आमचं गाव फार सुंदर, डोंगरांच्या रांगांमध्ये गावच्या वेगवेगळया लोकाची आवाठे वसली होती.

सुतारवाडीत सुतार, लोहार, मग एक दोन कुभारांची घरे, गावकर आवाठ मानकऱ्यांचे. वाणी, मराठे असे सगळे आपआपली आवाठे म्हणजे वाड्या करून वसले होते. भटवाडीत भटजींची चार घरे व वतनदार खोत, कुळकर्ण्यांची चार घरे तेवढी ऐसपैस परसू असलेली. या वतनदाराना गांवातील लोक बामण म्हणूनच संबोधीत.

सुमाक्का माझ्या पेक्षा वर्ष दीड वर्षानी मोठी असेल. ती व मी एकत्रच खेळू. सुमाक्का एकुलती एक होती. आम्ही चार भावंडे, माझ्यापेक्षा दोन मोठे भाऊ व एक लहान बहिण. माझे दोन्ही मोठे

भाऊ व माझ्या वयात चार पांच वर्षांचे अंतर धाकटी बहिण अगदीच तान्ही. मी सात वर्षाचा, सुमाक्का आठ वर्षाची समवयस्क म्हणून आम्हीच जास्त एकत्र खेळू.

समोरासमोर घरे. मधून फक्त एक बैलगाडी जाईल एवढाच रस्ता. आमचे व सुमाक्काच्या घरचे मोठे लोक आप आपल्या ओटीवर बसूनच गप्पा मारीत. आमच्या दोन्ही कुटुंबात घरोबा एवढा की त्यांच्या घरची व आमच्या घरची कार्ये अगदी एकमेकाच्या साथीनेच पूर्ण होत.

साध्या चकल्या चिवडा जरी कुणाच्या घरी बनला तरी दोन्ही घरच्या सर्वांच्या तोंडी लागल्या शिवाय रहात नसे. माझी आणि सुमाक्काची गट्टी खूपच होती. सुमाक्का एकदम हाडकुळी, गव्हाळ रंगाची होती. उभा लांब चेहेरा, सपाट गाल, टपोरे पण झोपाळलेले डोळे. पण या सर्वावर मात करी ते नाक. पूर्ण चेहेऱ्याचा नूरच ते पालटून टाके, एकदम धारदार टोकदार नाक चेहेऱ्याच्या कितीतरी बाहेर आलेले दिसे. सुमाक्का त्यामुळे दिसायला फारशी सुंदर वाटत नसे. पण तिच्या स्वतःच्याच तंद्रीत गुंग असण्यामुळे, गुणगुणत राहाण्यामुळे माझी तिच्याशी गट्टी झाली होती. कदाचित सुमाक्का माझ्याशी व तिच्या आईशीच  जास्त बोले. बाकीच्यांशी जास्त संवाद नसे. अंगात लहानपणचे दुडदुडणे नव्हते पण वेंधळेपण खूपच भरले होते. चालताना किंवा थोडेसे धांवतानाही परकर जर वर पकडला नाही तर धपकन् पडे. कोंकणातली जमीन चिऱ्याची, लाल, खडबडीत. कडक चिरा लागून तिचे ढोपर किंवा कोपर खरचटे.

अशीच एकदा ती पडली. खूप खरचटले. मग चुरचुरले, दुखले. माझ्याकडे आली. हळूच म्हणाली “येशा बघ लागले रे, काय करू आता आई ओरडणार,”

“थांब मी हळदीचा लेप लावतो.” असे म्हणत मी घरांत पळालो. एका पानावर थोडीशी हळद मागितली तर आई म्हणाली “ काय रे कशाला हळद ? कुठे लागले काय रे ?”

“नाही ग जरासं खरचटलंय. दे हळद आणि थोडी साय.” मी बोललो. आईने थोडी हळद आणि साय पानावर काढली आणि म्हणाली “बघ फार लागले असेल तर दाखव मला.” मी तिथे न थांबता पळत पळत सुमाक्काकडे पोचलो. हळद साय एकत्र कालवून तिच्या खरचटलेल्या कोपरावर लेप केला व म्हणालो. “साय पण घातलीय ग. म्हणजे जखम तटतटून दुखणार नाही. आणि तू एवढी वेंघळी कशी? धांवताना परकर सांभाळता येत नाही तुला? सारखी पायांत परकर अडकूनच पडतेस तू.”

" गप्प रे! माहीत आहे तू मोठा शहाणा! " सुमाक्का बोलली खरी पण त्यातही मंजूळपणाच होता. तिला खरोखर तर दम मारताच येत नसे.

मी जरा आडदांडच; वर चिडवा चिडवीत खूप तरबेज. मी तिला काहीही चिडवले तरी ती ढिम्म् शांत. माझाच मामा होई. पण मग मग तिच्या कविता ऐकून तिच्या बद्दल मला अभिमान वाटू लागला. ती नेहमी काहीतरी गुणगुणत असे. पहिल्या पहिल्यांदा मला वाटे ही कुठलेतरी गाणे, नाहीतर जात्यावरच्या ऐकलेल्या ओव्या गुणगुणत असेल. पण एक दिवशी त्याचा गौप्य स्फोट तिनेच केला. तो प्रसंग खरोखरच मनावर कोरला गेला.

आमच्या घरांमागे खूप मोठे परडे. घरांच्या दोन्ही बाजूना चांगलीच जागा सोडलेली. मागच्या परसांत नारळ, सुपारी. केळी, आंबे, फणस, काजू, रतांबे, आंबाडी, ओवळी अशा असंख्य झाडानी गर्दी केलेली. मधेच विहीरी खोदून त्यावर पायरहाट बसवलेला. सगळ्या झाडाना पाणी मिळावे म्हणून झाडांमधून पाट काढलेले. रहाटाने पाणी सगळ्या बागेला मिळेल याची काळजी घेतलेली. फरक एवढाच की आमच्या घरी घराच्या दोन्ही बाजूला असलेल्या जागेत जास्वंदी, मोगरा, गुलाब अशी वेगवेगळी फुलझाडे लावलेली. सुमाक्काच्या घरी मात्र बाजूच्या जागेत भाज्या, मिरच्या पेरल्या जायच्या अगदी कुंपणाला लागून दोन चार जास्वंदीची झाडे व मोगऱ्याची एक दोन खोडेच होती. बाकी बाग म्हणून फुलझाडे कधी लावलीच नव्हती. सुमाक्काला फुलांची आवड होती. आमच्या बागेतल्या गुलाबावरची फुले ती खुडून नेई, त्यावेळी मी तिला जाम सतवे. पण तिला काहीच वाटत नसे.

ती एकदा आमच्या आईशी बोलत होती. "शारदा मावशी! गुलाबाचे झाड कसे लावायचे? मला माझ्या परड्यांत गुलाबाची बाग करायचीय." सुमाक्का.

"अग! पावसाळ्यांत देईन हो तुला गुलाबाच्या डाळख्या. त्या नेऊन रोप." माझी आई.

"हो? म्हणजे आता लावल्या तर नाही चालत?" सुमाक्का

"अग वेडे! झाडं लावायची वेळ असते तेव्हाच लावावी, मग लागतात. कलम असले तर केव्हाही लावले तरी चालते." माझी आई सुमाक्काला समजवीत होती व मला हसू येत होते. सुमाक्काचा लांबट चेहेरा मनात शंका आल्यामुळे आणखी लांबट वाटत होता.

मी एकदम ओरडलो "ए सुमाक्का ते बघ काय तुझ्या चेहेऱ्यावर?"

"काय रे काही लागलय का?" शांतपणे सुमाक्का विचारत होती

"अग केवढी प्रश्नचिन्ह चिकटलीत चेहेऱ्यावर! " मी.

"असू देत असू देत. माहीत नसलं तर विचारावं रे मोठ्याना." एवढीशी सुमाक्का मला तत्वज्ञानाचे धडे देत होती.

पावसाळा सुरू झाला आणि सुमाक्का दत्त म्हणून आमच्याकडे उभी झाली.

"आई गुलाबाची डाळखी देता ना? मला लावायचीय."

"हो बाई देते हो. जरा थांब" असे म्हणत आईने कोयता घेतला व बागेत निघाली. लाल गुलाबाच्या दोन जाडजूड डाळख्या तिने कापल्या व घरी निघाली. तिच्या मागे सुमाक्का आणि मी लुटपुटत चालत होतो.

घरी येवून तिने त्या डाळख्यांचे छान पांच सहा तुकडे केले. सुरीने जमिनीत रोपायची बाजू तिरपी कापली व सुमाक्काला म्हणाली " जा हे सगळे लाव. तीन चार पावले अंतर ठेव एकमेकात. सगळेच नाही उगायचे पण एक दोन झाडे मोठी होतील. दिवाळी नंतर फुले मिळतील तुला. रोज पहात जा. आणि दोन चार दिवस पाऊस थांबला तर पाणी घालायला विसरू नकोस." आई.

"हो! हो! " करत सुमाक्का आनंदाने आपल्या घरी पळत गेली. आमचे दररोजचे खेळ, पकडापकडी, चिडविणे असले चालूच होते. कितीही चिडवले तरी सुमाक्कावर काहीच परिणाम व्हायचा नाही म्हणून मीच चिडे. असे दिवस जात होते. दसरा संपला तसे मला सुमाक्काला शोधावे लागू लागले. सुमाक्का जास्तीत जास्त तिच्या गुलाबांच्या रोपा जवळच गुणगुणत बसलेली आढळे.

ती हाक मारली की लगेच धांवत येई. पण आज ती हांकेला "ओ"च देत नव्हती. मी शोधत शोधत तिच्या बागेत गेलो तर ही गुलाबाच्या रोपाकडे एकटक बघत उकीडवी बसली होती. काहीतरी गुणगुणत होती. मी हळूच मागे जाऊन "भाव SS" करून ओरडलो. सुमाक्का दचकली पण नाही. ती गुंग होऊन गुणगुणत होती. "काय ग कुठचं गाणं म्हणतेयस?" मी विचारले.

"अरे माझ्या गुलाबाला फूल आलेय बघ. त्याला खुडून देवाला वाहीन म्हणते. पण खुडायला जीवच धजत नाही. सारखी कविता मनात येतेय तीच गुणगुणतेय." सुमाक्का.

" कविता? कुठची कविता? सगळ्या पाठ आहेत तुला?" मी.

"अरे ही पुस्तकातली नाही. ऐक! सांग ऐकलीस का कधी?" असे सांगून सुमाक्का कविता म्हणू लागली.

छोटी छोटीशी डाळखी गुलाबाची लावयेली
माये मायेने तिला पाणी मी पाजीयेली
छान छान किती माझं रोपटं ग उगीवलं
हळू हळू पिसारली हिरवी हिरवी गोल पानं
एके दिनी दिसली मज कळी छोटी छान छान
उभारलं आनंदलं उतावीळ माझं मन
फुल फुल रे गुलाबा लवकरच मोठं छान
हवा वारा डोलावेल झुलवेल फुल पान
दिन वार जाती मागे जीव नाही रमायाचा
किती किती वेळ लागे एक कळी फुलायचा
एके दिनी कळीने त्या पाहिले सुर्याला चोरून
कळी पाकळी थरारली सैरभैर झाली खुलुन
सुगंधाची आनंदाची पखरण मनी झाली
गाणे कवितेच्या ओळी वेल मनी उगवली
पहिले फूल गुलाबाचे माझे परसी उमलले
देवाचे अप्रुप पाहून त्याचे चरणी वाहियेले "

मी पहातच बसलो. दुसरीत गेलेली, अजुनही पाटीवर धड लिहायला न शिकलेली सुमाक्का अशी कविता करते? हा जोरदार धक्का होता. खाली मान घालून मी जमीन उकरत बसलो होतो. विचार सुमाक्काच्या कवितेचा होता. वर मान केली तर सुमाक्का तिथे नव्हती व झाडावर फूलही नव्हते. बहुतेक फुल खुडून सुमाक्का देवघरात गेली असणार हे लगेच उमजलो. त्यांच्या देवघराकडे धांवलो.

समईच्या प्रकाशात शांतपणे हात जोडून उभी असलेली सुमाक्का दिसली. गुलाबाचे फूल शंकराच्या पिंडीवरच्या बेलपानावर अगदी छान विराजले होते. “तू फूल तोडून देवाला वाहिलेस पण?” मी विचारताच सुमाक्का मागे वळून हंसली. म्हणाली “पहिलेच फूल माझ्या झाडाचे. देवाचा प्रसाद तो. त्यालाच नको वहायला? चल आज मला खूप छान वाटतेय. आपण खूप खेळू.” असे म्हणत ती मला घेऊन ओटीवर आली. त्या दिवसापासून आमची एकदम गट्टी झाली. एकमेकाना खाऊ देणं. तिच्या बागेत आणखी फुलझाडे लावणं, एकत्र शाळेत जाणं हे चालू झालं.

सुमाक्काची आई एक दिवशी माझ्या आईला सांगत होती. “वैनीबाय! आम्हाला आता दोन मुलं हो. तुमचा यशवंता आता सुमीला छान भाऊ मिळाला. सारखे एकत्र खेळतात. सुमी तर खायला दिले की यशवंतला शोधत बाहेर पळते. त्याला दिल्याशिवाय खात नाही हो! ”

“खरे आहे हो! देव सर्वाना कुठून कुठून नाती जोडून देईल सांगता येत नाही.” माझी आई.

मी मात्र नवा छंद लावून घेतला होता. सुमाक्का गुणगुणु लागली की जवळ जाऊन ऐकायचा प्रयत्न करायचा. तिला “कोणती कविता केलीस, मला ऐकव” असे विचारून भंडाऊन सोडायचो. ती ढिम्म् असायची. “पुरती झाली की ऐकवेन” म्हणायची. पण मला माहीत होते. हिची कविता एका झटक्यातच पुरी होत असे. पण सगळयाच काही ती मला सागंत नसे. तुम्ही म्हणाल कशावरुन? सांगतो तोही किस्सा.

एकदा सुमाक्काच्या घरी कसलीतरी मोठी पुजा होती. होम हवन होते. सगळी पुजा चालू असताना सुमाक्का गुणगुणु लागली मी जवळच बसलो होतो. कान लावून ऐकायचा प्रयत्न करीत होतो. भटजींच्या मंत्रोच्चारात धड ऐकायला येत नाही म्हणून राग येत होता. सुमाक्काच्या चेहेऱ्यावर एक हलके हसू होते. तिची कविता झाली होती. याचे ते लक्षण होते. एवढयात सुमाक्का माझ्याकडे सरकली व

म्हणाली “बघ तुला कविता ऐकवते. या पूजेवरच आहे पण मोठ्याने हसू नको. कुणी कविता ऐकली तर मला मार पडेल”

“ ऐकव! ऐकव! ” असे मी म्हणताच ती माझ्या कानात कुजबुजु लागली.

हे कोण आले भटजी आले

टोपी खाली शेंडी लोंबे कानाखाली बाळी लोंबे

जानव्याखाली चावी लोंबे छातीखाली पोट लोंबे

हे आले भटजी आले

श्लोका मागून श्लोक चाले तोंडामधे जीभ लोंबे

होमामधे धूर चाले वरतीखाली हात लोंबे

पूजा संपे भटजी उठे हातामधे सोगा लोंबे

नाव काय हो भटजी तुमचे

सर्वे म्हणती आम्हा लोंबे .

कानाने ही कविता ऐकत होतो व समोर तेच चित्र पहात होतो. लोंबे भटजी त्यांच्या व आमच्या घरी नेहमी येत. पण सुमाक्काच्या कवितेने लोंबे भटजींच्या पूजेचा एक फोटोच मनावर तयार केला. हसू दाबणे कठीण झाले म्हणून कविता संपताच मी उठून धावत घराबाहेर पळालो. ओटीवरच्या खांबाला पकडून हस हस हसत होतो. एवढयात सुमाक्का आली. गयावया करीत मला म्हणाली “ए सांगू नकोस हा ही कविता कुणाला. आई ओरडेल मला.”

“थांब तू, पूजा संपली की सगळ्यां समोर मोठ्याने म्हणतो. आणि सांगतो सर्वांना तू केलीस म्हणून.” मी.

पण सुमाक्काला पक्के माहीत होते मी सुकी धमकी देतोय. मी कुणालाच काही सांगणार नाही. मला आता सुमाक्का बद्दल जाम आदर वाटत होता. शाळेत र ट प करत शिकणारी सुमाक्का, पुस्तकातल्या कविता पाठ करता करता कंटाळणारी सुमाक्का, गणिते सोडवताना गहन विचारात गढलेली

व बेरीज वजाबाकीत घोटाळणारी सुमाक्का, कविता करण्यात एवढी तरबेज कशी? एवढं शब्दभांडार हिच्याकडे येते कुठून?

गावी सगळयांकडे त्या काळात पहाटे उठून जात्यावर दळण काढले जाई. गावात पिठाची गिरणी या सारख्या सोई नव्हत्या. मग आमच्या ओटीवर आई आणि सुमाक्काच्या ओटीवर तिची आई असे दळण चाले. सुमाक्काची आई सुंदर ओव्या म्हणे त्याच तालावर दोन जाती चालत रहात. मला वाटते ह्या ओव्या ऐकुनच सुमाक्का कविता करायला शिकली असावी. तशी सुमाक्का खूप कनवाळू तिला सगळ्यांची दया येई.

असाच एकदा जोरदार पाऊस पडत होता. वीजा कडाडत होत्या. मी आणि सुमाक्का पडवीत बसून पागोळ्यांशी खेळत होतो. एकमेकावर पाणी उडवीत होतो. एवढयात घरासमोरून कुणीतरी आपली गुरे नेत होता. तो स्वतः कांबळ्यात गुरपटलेला होता. जोराच्या पावसाचा मारा खात गाई कातडी थरथरवीत होत्या. सुमाक्का एकटक ते दृष्य बघताना गुणगुणू लागली. मी ओरडलो मोठ्याने म्हण, मला ऐकू दे. ती नवीच कविता करीत होती.

काळे काळे ढग आले सोसाटयाचा वारा

कडा कडा वीज बोले पाऊस ना दे थारा

गाय पाडी थरथरे हींव भरे बापडयानां

झाडांमधे भिजलेल्या थंडी चढे पांखराना

शिवायचे कपडे त्यांना विचार ना कोणी करे

का रे असे सर्वजण आपुलेच पोट भरे?

मी विचारात पडलो. पराकोटीचा विचार होता. पण त्यातून दयाभाव ओसंडत होता. शब्द देखिल मोजके आणि मनाला चिकटणारे वाटत होते.

असेच एके वर्षी, दिवाळीच्या अगोदर, सुमाक्काच्या घरच्या सगळयानी आपले घर गेरुच्या गिलावा करून रंगवले. सुमाक्का व तिच्या आईने पांढऱ्या रंगाने वर चित्रे काढली. कोयता, झाडं, जाती, मुसळं, नांगर, फुलझाडं सगळी रेखाचित्र भिंतीवर उमटली घर सुंदर दिसू लागले.

शेणाने जमिनी सारवून झाल्या आणि सुमाक्का गुणगुणत रांगोळी काढू लागली. ती गुणगुणतेय पहाताच मी धावत त्यांच्या ओटीवर पोचलो आणि म्हणालो "सुमाक्का पहिल्यापासून म्हण. पुरे म्हण मला ऐकायचेय." सुमाक्काने आणखी एक कविता केली होती. ती गाऊ लागली.

आज रंगले माझे घर सुंदर लाल गेरुने

जमीन रंगली सारवून ताज्या ताज्या शेणाने

फुले पाखरे रंगवित बसलो मी आणि माझी आई

वेल, घरे, आयुधे सारी उमटली भिंतीवर बाई

शेतावरचे काम दांडगे बाबा करीती दिवसभर

आई करी जेवण न्ह्यारी घेऊन जाई शेतावर

सांज पडे तो सर्व घरी आनंदाने हंसताना

घरकुलाचे प्रेम आमुचे आई शिकवी सर्वांना

घर, माणसे, गाई, पांखरे सगळ्या वरच सुमाक्का प्रेम करायची, सगळे रंगावायची, रांगोळ्या काढायची केवढी हौस. सुमाक्का कवितेनेच नाही पण या गुणानी देखील माझ्या मनात मोठी होत चालली होती.

आता मोठे होत होतो. मी पण शाळेत जात होतो. सुमाक्का दोन वर्षे पुढे. शाळेत गेलो की मी लहान असून देखिल सुमाक्काला सांभाळायचो. थोडीशी वेंधळी होती. बरोबरच्या मुली खेळा बागडायला बाहेर पडल्या, की ही हळुबाई लगबग करायला बघायची आणि नेमकी पडायची नाहीतर आपटायची. मग तिला किती लागले काय करायचे हे सगळे मीच पाही. पण या हळुबाईचे निरीक्षण फार जोरदार होते.

एक दिवशी माझ्याकडे आली आणि म्हणाली " येशा येशा ऐक ना मजेशीर कविता केलीय वर्गातल्या मुलांवर आणि अभ्यासावर ऐकतोस?" मी नाही थोडेच म्हणणार होतो? मग ऐकू लागलो.

गणिताचा तास चाले गंपा राणे झोपे
गुरुजी त्याला शिक्षा म्हणुनी जाम चोप चोपे
मराठीचा तास येई कविता गाणी गावी
शब्दार्थांचा अर्थ लावता मी कंटाळून जाई
इतिहासतील वीर नाचती घेऊन तलवारी
येता मागून सनावळी त्या कंटाळे मन भारी
कठीण शिकाया त्रिज्या भुज्या गहन आकृतिंच्या
उभव्या आडव्या रेषा काढून भु-मितीच्या
चित्रकलेचा तास येता आनंदून जातो
पान फुलाना रंगीत करता विश्व विसरूनी जातो.

मला अगदी असेच वाटे शाळेत. पण त्यावरून कविता नाही करता आली. हिला कशी सुचली? किती खरी आहे. किती सुंदर. मला गप्प बघून सुमाक्का म्हणाली “का रे? नाही बरी कविता?”

“अग सुंदरच आहे. पण तुला सुचतात कशा? मला का नाही करता येत?” मी विचारले .

“मला काय माहीत? मला सगळं कवितेतच सुचतं कसं ते मलाच माहीत नाही.” सुमाक्का म्हणाली.

असेच दिवस जात होते सुमाक्का सातवी पास झाली आणि तिची शाळा संपली. एकतर गावात ७वीपर्यंतच शाळा होती. पुढे शिकायला मोठ्या गावात  जावे लागे. मुलीना त्यामुळे गावात जेव्हढी शाळा असेल तेवढेच शिकायला मिळे. सुमाक्का अशीच सातवी वर थांबली. वय वर्षे चौदा शिक्षण संपले. आता घरांतले शिक्षण चालू झाले. घरकाम, जेवण बनवणे, शिवण टिपण वगैरे चालू झाले. अर्थातच त्याकाळी मुलीना स्वतःचा मार्ग शोधण्याचा अधिकार नव्हताच. हेच पुढचे आयुष्य. दोन चार वर्षात लग्न करून सासरी जायचे हे भविष्य स्वच्छ झाले होते.

सुमाक्कानेही ते रुढीप्रमाणे शिरोर्धाय मानले होते. सुमाक्काच्या मागे दोन वर्षांनी मी सातवी पास करून पुढच्या शिक्षणासाठी जाणार होतो. तोपर्यंत सुमाक्का कविता कशा करते ते शिकून घ्यायचं होतं. ती कोणत्याही विषय पकडून कविता करायची. गेल्याच वर्षी आमची ट्रीप वालावलीला गेली होती. कोंकणात निसर्ग सौंदर्य ठासून भरलेले. वालावली व तिथला परीसर म्हणजे या सौंदर्याने नटलेला. ट्रीप संपत आली होती व बस लेट झाली होती. आम्ही सगळी मुलं एका शाळेच्या आवारात झाडाखाली बसलो होतो. लांबूनच मी पाहिलं, सुमाक्काचे ओठ हलत होते. डोळे तंद्री लावल्यासारखे वाटत होते. मी समजलो ही नक्की कवितेत रंगली असणार हळू हळू मी तिच्याकडे निघालो थोडा जवळ पोहोंचलो आणि हळूच हांक मारली “सुमाक्का?” तिने पटकन मान वळवून माझ्याकडे पाहिले. खूण करून बोलावलेले तिला समजले आणि ती लगेचच आली.

“काय ग कुठली कविता केलीस?” मी विचारले

“अरे ट्रिपवर सुचले ते गुणगुणत होते.” सुमाक्का

“मला ऐकव. आताच.” मी हट्टाने म्हटले

“अरे बस आली तर अर्धवट राहील.” सुमाक्का

“चालेल! पण तू उद्यापर्यंत विसरून गेलीस तर?” मी

“ बरं बरं ऐकवते. ऐक”

शाळेतून ट्रीप जाई दरसाली
यावेळी ठरले जावे वालावली
हिरवे हिरवे डोंगर खाली वाहे कारली
बगळ्यांची माळ होवुनी बसले किनारी

भली सकाळ सुर्य तर होता उगायचा
मासे पकडी खंडया कसा होता पहायचा

नाव धांवे सर्वा घेऊनी सर सर पैलतीरी

गाव राहिले अंधुक होऊन भुरकट ऐलतीरी

ताड माड उंच त्यांचे शेंडे होते सोनोरी

देवे काढीले सुंदर चित्र जणू फार मनोहारी

वालावलीची ट्रीप रहाते आमुच्या स्मरणांत

वर्णन सगळे लिहायचे मग निबंधात.

मी स्तब्ध होऊन बसलो. हे सगळे वर्णन कसे जसेच्या तसे तिने कवितेत उतरवले होते. कमाल केली होती तिने. दोन दिवसानी शाळेत पोचल्यावर मी ती कविता सुंदर अक्षरात लिहून सहावीच्या गुरुजीना देताना म्हटले ही कविता सुमाक्काने वालावलीलाच केली. पहा किती सुंदर आहे. त्यांनी ती वाचली, स्वतःजवळ ठेवून घेतली. दोन दिवसांत सगळ्या शाळेत सुमाक्काचे नाव गाजू लागले. हेडमास्तरपासून सगळ्यानी तिचे कौतुक केले. मोठ्या फळ्यावर तिची कविता लिहून सगळ्याना वाचायला लावली.

सुमाक्का मात्र मला म्हणाली “येशा! मी तुला यापुढे कविता नाय ऐकवणार. तू सगळ्याना सांगतोस.”

मी हंसलो हे शब्द जरी दम मारणारे वाटत होते तरी बोलण्याचा ढंग मात्र प्रेमळ समजावणी सारखाच होता. सुमाक्काला रागावायला येतच नव्हते मी हंसलो आणि निघून गेलो.

सुमाक्काने सातवी नंतर शिकावे म्हणून सांगायला शाळेचे हेडमास्तर दोन वेळा येवून गेले. पण सुमाक्काच्या आईने ठाम नकार दिला. आणि सुमाक्का घरकामाचे शिक्षण घ्यायला लागली.

मला मात्र मनात रुखरुख लागली होती. सुमाक्काने शिकायला पाहिजे. तिच्या कविता सगळ्यांपर्यंत पोचायला पाहिजेत. पण त्या गावढ्यांत हे समजणारे कोणच नव्हते. “मुलीला काय घरचेच सांभाळायचे.” ह्या विचाराबाहेर जायला कोणी तयारच नव्हते. कवी म्हणूनच जन्मलेली सुमाक्का या गावढ्यांतच राहून फुकट जाणार असे वाटे.

एवढयात बातमी आली सुमाक्काचे लग्न शेजारच्याच गावी ठरवतायत. सुमाक्काची आत्या त्या गावीच दिली होती. त्यांच्याच भाऊबंदातल्या घरी सुमाक्काचे लग्न ठरवायचे घाटत होते. ते तीन भाऊ होते. मोठ्या दोघांचे लग्न झाले होते. धाकटा एकच लग्नाचा होता. शेतीवाडी, गुरे यांनी घर संपन्न होते. मधला भाऊ मुंबईला नोकरी करीत होता. सर्वच दृष्टीने सोयरीक चांगली होती. सुमाक्काच्या वडिलांपेक्षा ते जास्त श्रीमंत होते. हुंडा पांडा काहीच नको म्हणाले होते. म्हणजे आता सुमाक्काचे लग्न ठरणार हे नक्कीच.

सुमाक्काची आई मात्र म्हणत होती. पोर लहान आहे. सोयरीक ठरवली तरी लग्न दोन वर्षे पुढे ढकला. सुमाक्काच्या आत्याने हे मुलाकडच्याना सांगीतले. त्यांनीही मान्य केले. म्हणजे सुमाक्काच्या घरून जे जे सांगीतले ते सर्व ते मान्य करीत होते. सुमाक्काला मात्र यांत काहीच मत नव्हते.

मी आता सातवीत गेलो होतो. वर्ष पुरे होताच मोठ्या गावी शिकायला जावे लागणार, गावाचा सर्वांचा सहवास संपणार म्हणून हुरहुर लागत असे.

एके दिवशी सुमाक्काच्या घरचे सगळे गायब दिसले. आईला मी विचारले तर ती म्हणाली “अरे सुमीचे लग्न ठरलेय ना? ती आत्याकडे गेलीय मग सासरही बघून येणार. येतील संध्याकाळपर्यंत नाहीतर उद्यापर्यंत.” तिचे सासर थोडेच लांब होते? आमच्या गांवाहून निघाले की एक नदी यायची तिच्या पलिकडे एक डोंगर टेकडी होती. तिचा चढ चढून उतरला की भेडसे गाव यायचे. सुमाक्काची आत्या या भेडसे गांवाचीच. चालत जायला फारतर अर्धा पाऊण तास लागे. मला मात्र राहून राहून वाटत होते. माझ्या आईने त्यांच्याबरोबर जायला पाहिजे होते. माझ्या आईलाही सुमाक्काची फार माया वाटे. तसेच ती लोकाना ओळखण्यात फार हुषारी दाखवायची. सुमाक्काच्या सासरचे लोक कसे आहेत ही तिने लगेच ओळखले असते. सुमाक्काची आई तशी गरीब सरळ होती. छक्के पंजे तिला माहीतच नव्हते.

दुसऱ्या दिवशी बातमी आली सुमाक्काला सासर आवडले. कारण का? तर  बाग होती. जास्वंदी मोगरा वगैरे झाडानी भरलेली बाग व शेजारीच तो डोंगर. ज्याच्या माथ्यावर शंकराचे देऊळ होते. फुले आणि देव यांच्यात रमणाऱ्या सुमाक्काला आनंद होणारच.

एवढयात सुमाक्का बागेत दिसली. तिच्या गुलाबाच्या झाडाकडे बसून काही तरी करीत होती. मी समजलो आता ती जे जे काय पाहिले ते आपल्या गुलाबाला सांगत असणार. ते पण कवितेतूनच असणार मी धावत तिच्याकडे गेलो. ती गुणगुणत होती. मधेच गुलाबाच्या पानाना कुखाळीत

होती. मी तिच्या बाजूला जाऊन बसलो. म्हणालो “मोठ्याने म्हण ना! नवी कविता केलीस?” मान वेळावत हो म्हणाली व सांगू लागली.

“अरे येशा काल गेलो ना भेडशाला तर मजा आली. नदीच्या आपल्या कडच्या तीरावर पार्वतीचे मंदीर आहे. आणि नदी पलिकडे डोंगरावर शंकराचे देऊळ आहे. म्हणजे मी आता पार्वतीच्या गावाहून शंकराच्या गावी जाणार रे! ” मला तिचे हे कविता वाचन गद्यात नको होते म्हचले “ए! तू मला गोष्टी नको सांगू. तू गुणगुणत होतीस ती कविता ऐकव.”

“तू उगीचच मागे लागतोस. कशावरून मी नवी कविता केली आहे म्हणतोस? जुनीच गुणगुणत होते मी.” सुमाक्का

“ए! जा जा, मी पुरतं ओळखतो तुला. काय तरी भेडशाच्या लोकावर असणार ऐकव ना.” मी.

“ऐक. पण कुणाला सांगू नकोस हां.” सुमाक्का

मग सुमाक्काने सुरू केले.

माझे माहेर माहेर

नदीच्या अल्याड अल्याड

माझे सासर सासर

डोंगराच्या पल्याड पल्याड

डोंगराच्या माथी वसे

भोळा शंकर शंकर

नदीतीरी वाट पाहे

पारवती सुंदर सुंदर

दोन्ही देव विसावले

मंदीरात छान छान

माहेरी सासरी जाता येता

सुंदर दर्शन दर्शन.

मी गुंग होऊन ऐकत होतो. लग्न ठरले त्याची संमती, अभिसारकेच्या मनाचा हळुवारपणा व देवावरची भक्ती, सर्वच या छोट्याशा कवितेत होती. ती आतापासूनच सासर माहेरच्या फेऱ्या करू लागली होती. त्या फेऱ्यात ती देव दर्शनही करणार होती. किती लाघवाने ती गात होती. खरंच सुमाक्का हे देवाने बनवलेली खास मुलगी होती असा विचार मनात आला. मनापासून मला वाटले सुमाक्का लग्न होऊन भेडशाला गेली की शंकर पार्वतीचाच मिलाप होणार. आमच्या गावची पार्वती भेडशाच्या शंकराला भेटणार. पटकन तोंडातून प्रश्न निघाला

"सुमाक्का तुझ्या होणाऱ्या नवऱ्याचे नाव शंकर आहे का ग?"

"चल! तुझे काहीतरीच. तसे असते तर मी कवितेत तरी म्हटले असते का?" सुमाक्का

"हो मग नाव काय त्याचे?" मी

"चल रे! मला माहीत नाही. मी कुणाला विचारले नाही. आणि माहीत असेल तरी मी ते तुला कसे सांगू? नवऱ्याचे नाव घेतं का कुणी?" सुमाक्का सगळ्या रुढी , परंपरा आपल्या संथ, किनऱ्या आवाजात मला समजावत होती.

खूप वेळ मी त्या कवितेचा, सुमाक्काचा, तिच्या समजुतदारपणाचा विचार करीत होतो. किती गुण देऊन पाठवले होते देवाने हिला. मी एकटक सुमाक्काला पहात असतानाच विचारले "सुमाक्का तुला कविता सुचतात कशा? बरोबर शब्द कसे आठवतात?"

मागे पण तू हेच विचारले होतेस. तेव्हा माहीत नव्हते पडले. पण आता एकादा प्रसंग, दृष्य बघितलं की मी आपोआप गुणगुणू लागते. शब्द आपसूक येतात व कविता तयार होते. अशीच एकदा बसले होते विचार करीत होते, आपल्यालाच कशा कविता करता येतात असा विचार आला आणि एकदम् गुणगुणू लागले.

मनात गुंजते   उरात दाटते

कानांत हांकते  डोळयांत डोलते

उठती उठती   तेव्हाच उठती

ओठांवर लाटा  कवितेच्या.

आणि मलाच हसू आले रे. मला माहीत होते हे उत्तर तुला मी दिले की तू माझी खिल्ली उडवणार.”  सुमाक्का

पण मी तोंड उघडे टाकून तिच्याकडे बघतच बसलो होतो. कवितेत किती एकरूप होते ही. किती सुंदर देणगी मिळालीय हिला. शब्द गुलाम होऊन हिच्यासमोर जणू लोटांगण घालतात.

दोन वर्षात मी सातवी झालो आणि पुढच्या शिक्षणासाठी तालुक्याच्या गावी जायचे निश्चित झाले. आता गावच्या सगळयाना सोडून नव्या विश्वात जाणार त्याचीच ओढ लागली होती.

मोठयांच्या तोंडून तालुक्याचे, तिथल्या बाजारपेठेचे, तिथल्या रस्त्यांचे खूप वर्णन ऐकले होते. चहापाण्याची खूप दुकाने होती तिथे भजी, बटाटावडा, खडकेलाडू, खाजे वगैरे मिळते असे ऐकले होते. पेपरमिटच्या गोळ्या चघळायला फार मजा येते म्हणायचे. मागे एकदा मुंबईहून आमचा मामा आला होता. त्याने लाल, हिरव्या, पिवळया गोळ्या आणल्या होत्या. साखरे सारख्या गोड होत्या. त्या खाऊन चघळून रंगलेली जीभ बघायला मजा यायची.

एकीकडे ही मोहात टाकणारी आमिषं तर दुसरीकडे सुमाक्का एकटी पडणार याचं दुःख. खरंच सुमाक्का आणि माझी फार गट्टी होती. सख्या भाऊ बहिणी सारखी. तसेच भांडू, तसेच रुसु, तसेच खाऊ एकमेकाना देऊ. सगळे म्हणत हा आपल्या भावंडाबरोबर नाही एवढा सुमाक्काबरोबरच असतो.

ते खरेच होते. माझ्या आईलाही माहीत होते. ती दरवर्षी दोनदा तरी मुगाचे तुपातले लाडू करायची. त्याने ताकद येते म्हणायची. सगळयाना ती एक एक लाडू देई पण मला देताना दोन देई. तिला माहीत असे एक दिला तर अर्धा मी सुमाक्काला देणार. मग आईने लाडवात एक भागीदार वाढवला सुमाक्का. हे असे वर्षानुवर्षे चालले होते.

सुमाक्काच्या आईला पण हे माहीत होते. ती तर घरात दररोजच्या नास्त्यात पण मला बाजूला वाटीत काढून ठेवे. गेलो की पहिली मला वाटी देई व मग सुमाक्काला बोलवी.

आता हे सर्व थांबणार होते. दोघेही एकटे पडणार होतो. मी सुमाक्काकडे हिरमुसले होऊन बोललो "ए! सुमाक्का आता आपण रोज भेटणार नाही. करमेल तुला."

"येशा! तुलाच करमायचे नाही. कधी कशात जीव लावला नाहीस. अरे मन अभ्यासात, खेळात गुंतवावे मग अशा तुटणाऱ्या संबधांच्या वेळी त्रास नाही होत रे! " सुमाक्का.

"म्हणजे फक्त मलाच त्रास तुला नाही?" मी.

"अरे हे बघ! मी माझ्या गुलाबाच्या झाडात, कवितेत जीव गुंतवलाच होता. आता तर लग्न ठरले म्हणून आई स्वंयपाक पाणी, घरकाम शिकवतेय. त्यात हां हां म्हणता वेळ जाणार रे माझा. तुझी आठवण येणार रे, पण ती रिकाम्या वेळी." सुमाक्का.

मी विचारात पडलो. घरून मला कोणी कधीच कुठलं काम सांगीतलं नाही. सारखी सर्दी होते म्हणून नदीत डुंबायला जाऊ दिलं नाही. शाळेतल्या दंगामस्तीत मला रसच नव्हता. सर्वात लहान म्हणून आई जपायची. राहीला तो सुमाक्काचा सहवास. त्यामुळे आता मलाच हुरहुरत होते. तालुक्याला कोणाशी मैत्री होईल का? आपल्याला कंटाळा तर येणार नाहीना? असे अनेक विचार मनात येत.

शेवटी गाव सोडून मी तालुक्याला गेलो. आत्याकडे रहायचे होते. तिच्याकडे खूप मुले होती. ती मोठ्या गावात राहाते म्हणून आत्याच्या नात्यातले आम्ही, तसेच तिच्या दीरा- नणंदांची मुले तिच्याच कडे शिकायला म्हणून येत. चार वर्षे तिच्याच कडे राहात शिकत मॅट्रीकची परीक्षा देऊन मुंबईला जाऊन चाकरमानी होत. काही जण गावीच रहात. गावच्याच शाळेत मास्तर म्हणून नोकरी करीत व बरोबर घरची शेतीही सांभाळीत.

मी आत्याकडे गेलो तो घाबरलोच. एकूण चौदा मुलं होतो आम्ही. दोन मुली बाकीचे मुलगे.

आत्याचे घर म्हणजे चौसोपी वाडा होता. एका मोठ्या खोलीत आम्हा बारा मुलांच्या पथाऱ्या लावल्या होत्या. प्रत्येकाच्या डोक्याजवळ एक लाकडी पेटीसारखे होते. त्याला ते "डेस्क" म्हणायचे वरचा अर्धा भाग सरळ जमीनीला समांतर तर अर्धा भाग पुढे घसरता. या घसरत्या भागावर वही ठेवली की लिहायला सोपे जाई. पेन, पेन्सिली सगळे पुढच्या सपाट भागावर राही. तो घसरता भाग उचलला की खालच्या पेटीत वह्या पुस्तके ठेवता येत. आपल्या पथारीवर बसले की या डेस्कवर छान अभ्यास करता येई.

बारा मुले म्हणजे केवढा गलबला असेल विचार करा. मी आणि एक काकाचा मुलगा हे आत्याच्या नात्यातले. बाकीचे आत्याच्या यजमानांच्या नात्यातले होते. ते सगळे पूर्वी पासुनच एकमेकाना ओळखणारे. त्यामुळे ते आम्हा दोघाना आडून बोलत. आमची खिल्ली उडवत. पण आमची आत्या फार खमकी होती. सर्वांवर सारखीच माया करे. भेदभाव आजिबात नाही. शिस्त कडक आणि कोणीही दुसऱ्याची कळ काढलेली समजले की त्याला शिक्षा. जास्त मस्ती करणाऱ्याला एक मोठी शिक्षा होती. सांगूनही ऐकत नाही. म्हणून त्याला माडीवर एकट्याला झोपायला लावायची. अशी कोणाला शिक्षा झाली की बाकीचे खालून विचित्र आवाज काढू लागत. तो मुलगा वर जाम घाबरुन जाई, थरथरत खाली येवून आत्याला बाकीच्यांची तक्रार करे. आत्या उलट त्यालाच दम मारे. परत खाली जागेवर येवून झोपण्यास सांगे. जरा जरबेने सुनवी "आजचा अनुभव लक्षात ठेव परत हीच शिक्षा द्यावी लागली तर अजिबात सूट देणार नाही."

आत्याच्या घरी तीन चार बायका कामाला येत. दोघी जेवण करायला तर दोघी बाकीच्या कामाना. मुलानी आपआपली अंथरुणे, पांघरुणे नीट घडी करून ठेवणे, चटई गुंडाळून व्यवस्थित कोपऱ्यात ठेवणे, आपल्या समोरच्याच भिंतीतील कपाटात आपले कपडे व्यवस्थित घडी घालून ठेवणे असे कित्येक नियम होते. आत्या स्वतः येऊन केव्हाही तपासे त्यामुळे प्रत्येकाला भितीच वाटे. त्या भितीपोटी सगळे व्यवस्थित रहात.

रात्री ९ वाजता दिवे मालवून सर्वानी झोपलेच पाहिजे व सकाळी ५ वाजता उठून आपली तयारी आपली आपणच करायची हा दंडक पाळणे फार जरुरी होते. कारण आत्याबरोबर रात्री सव्वा दहाला फेरी मारत यायची.

आम्ही दिवे मालवले की काहीतरी विनोद करणे, गोष्टी सांगणे, गाणे म्हणणे करत असू. मग एक एकाची दांडी जाई व सगळे झोपी जात. शांतता झाल्यावर जर मला जाग असेल तर सुमाक्काची फार आठवण येई.

एके दिवशी रात्री जोरदार पाऊस व कडाक्याच्या विजा चमकू लागल्या. सगळे जण एकमेकाना भिववीत हंसत खिदळत बसलो होतो. मग झोपायला उशीर झाला. पाऊस थांबला मग झोपून गेलो. पहाटे परत जोरदार विजा चमकून कडकडाट सुरू झाला. आणि मला जाग आली. कोणीतरी जात्यावर ओव्या म्हणत होते. आवाज छान होता. मला सुमाक्काची खूप आठवण आली. तिनेही अशीच

एक घिरटी जात्यावर ओवी तयार केली होती ती आठवली. डोळ्यासमोर सुमाक्का जात्यावर बसून ती ओवी म्हणतेय असे वाटू लागले डोळ्या समोरून त्या ओवीचे शब्द सरकू लागले.

पहाटेस घिरटी चाले

घर घर घर्र घर्र.

दाणे साल त्यांतून पडती

भर भर भर्र भर्र

आवाज सुपडयांचा येई

सप सप सप्प् सप्प्

पहाटेच्या हा बोल बोले

झोप गप गप्प् गप्प्

वाकळीत तरी ऐके

पांखरांची खळ खळ

त्यातूनही ऐकू येई

चाळण्यांची सळ सळ

सकाळच्या पारी चाले

आवाजांचा खेळ खेळ

सर सर भर भर

सळ सळ खळ खळ

हे विचार चालू होते, माझे मलाच समजत नव्हते मी काय करतोय ते. मी केव्हा चालत पुढच्या दारी येवून बाहेरच्या पायरीवर बसलो ते समजलेच नाही. तिथेच बसून सुमाक्काची ही कविता मी भान हरपून मोठ्याने म्हणत होतो.

घिरटीवरच्या बायांचा आवाज बंद झाला होता माझे गाणे ऐकत त्या घिरटी चालवीत होत्या. गाणे संपले आणि मी तोंड दोन्ही हातानी झाकून बसलो. एवढयात मागून आवाज आला.

“यशवंता फार छान म्हणतोस रे. पण ह्या ओव्या कधी ऐकल्या नव्हत्या.” मागे आत्या येवून उभी होती. माझे गाणे पुरते ऐकूनच ती बोलत होती. मी एकदम दचकून उभा झालो. पुटपुटत म्हणालो “भानच राहिले नाही. मी असा कधी गात नाही. आत्या परत नाही करणार असे.” आत्याला काय आवडेल काय आवडणार नाही हे अजून माहीत पडले नव्हते. घाबरून मी अगोदरच क्षमस्वचा पवित्रा घेतला होता.

“नाही रे बाळा, रामप्रहरीच गाणी सुंदर वाटतात. तू चांगलं गात होतास. पण थोडे देवाचे नाव असते तर बरे झाले असते. कुणाची गाणी रे ही? शाळेत होती का तुला?“ आत्या.

“ नाही ही कविता सुमाक्काची. ती खूप सुंदर कविता करते.” मी

“सुमाक्का? हां! हां! तुमच्यासमोरची खोतांची सुमी होय! ती कविता करते? शिकलीय कुठे ती एवढी?“ आत्या एकामागोमाग एक विचारीत होती. सुमाक्काचा विषय म्हणून मी भडभडून बोलू लागलो “आत्या खूप सांगीतलं त्यांना सुमीला पुढे शिकवा. पण ऐकतच नाहीत. ती फार छान कविता करते. गुरुजी पण सांगत होते तिच्या वडलाना. पण ऐकलंच नाही कुणी. आता तर तिचं लग्न ठरवून बसलेत” मी श्वास घ्यायला थांबलो.

“असते रे एकएकाच्या प्रारब्धात. न शिकताही पुढे येईल ती.” आत्या एवढे बोलून घरात निघून गेली. सुमाक्काचा विषय थांबला म्हणून मी थोडासा खट्टू झालो. सुमाक्काचे गुण सर्वांना माहीत पडावेत असेच मला वाटे. लोक मात्र जास्त रस दाखवत नसत म्हणून राग येई.

आता वरच्या वर्गांत मराठी विषय चांगलाच मोठा झाला होता. एके दिवशी कवितांचे प्रकार समजावताना गुरुजी खूप काही सांगत होते. वृत्त, छंद वगैरे प्रकारात कविता कशा केलेल्या असतात. भूपाळया, पोवाडे, ओव्या, गीत, सुनीत असे प्रकार त्यातील फरक समजावत होते. एकंदर विषय गहन वाटत होता. आणि सुमाक्का डोळ्यासमोर आली. तिला हे सर्व माहीत होते? ती कधी

शिकली? ती कविता करते त्या कुठल्या प्रकारात बसतात? कितीतरी प्रश्न मनात उसळले. या वेळी गावी गेलो की सुमाक्काला विचारायचे ठरवले.

थोड्याच दिवसात एक ओवी प्रकार शिकवताना गुरुजी म्हणाले “या अशा ओव्या बहिणाबाईनी केल्यात, कोणतेही शिक्षण नव्हते त्यांना. लिहू देखील शकत नव्हत्या. तरी त्यांनी ओव्यांमधे उत्तमोउत्तम काव्य केले आहे.” मी गुंग झालो होतो. माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले होते. सुमाक्का बहिणाबाई सारखीच होती. फारसे न शिकताही ती कविता करीत होती. सारखी गुणगुणतच असायची. बहुतेक काही जणाना उपजत ही कला येत असावी.

सुटी पडली गावी आलो. आमचे गाव तसे मालवणपासून जवळच होते. आता गावी बस सुरू झाली होती. कंदीलाच्या जागी लाईट यायला हळू हळू सुरवात होत होती. आमच्या गावी पुढच्या वर्षी लाईट येणार अशी आवई उठली होती. घरी पोचताच आईने अगदी जवळ घेऊन विचारले “कसा आहेस? केवढा रोडलायस! ” पण त्या माऊलीच्या मायेत गुरफटायच्या आत मी पळालो. सुमाक्काला केव्हा भेटेन असे झाले होते. सुमाक्का कडे पोचलो तर ती बागेत आहे समजले. आता तिच्या बागेत गुलाब, जास्वंद, चाफे सगळी झाडे तिने लावून जंगलच केले होते. त्यामुळे आमच्या ओटीवरून पाहिले की बागेतील कोणी दिसत नसे.

सुमाक्का बागेत झाडांच्या मुळातील माती उकरीत बसली होती. मी एकदम् ओरडलो “सुमाक्का” दचकून उभी होत सुमाक्का तिच्या किनऱ्या आवाजात म्हणाली “केवढी दचकले रे मी. तू जरा देखिल सुधरत नाहीस. असे घाबरवतात का कुणाला? केव्हा आलास?“

मी हंसत हंसत तिला म्हणालो “ हा आताच आलो तुला खूप काही सांगायचंय. अग तुझ्या पेक्षाही न शिकलेली एक बाई होती बहिणाबाई. ती पण तुझ्यासारखीच कविता करे. आम्हाला शिकवतात तिच्या ओव्या. तिला लिहायला देखिल येत नव्हते. तू तुझ्या कविता लिहीत जा. तिच्या सारख्याच तुझ्या कविता शाळेत शिकवतील बघ.” मी एवढा उतावळा होऊन बोलत होतो की ती नुसती माझ्याकडे पहातच बसली होती. “अग! आम्हाला खूप काही सांगीतलं कवितां बदल. कवितांना छंद असतात, वेगवेगळ्या वृत्तात कविता बांधलेल्या असतात. ओव्या, पोवाडे, भूपाळी, असे किती तरी प्रकार असतात. तुला हे सगळे कधी माहीत झाले? कशा कविता बसवतेस या सर्वांत?“ मी अधीरपणे तिला विचारत होतो.

"अरे मला यातलं काहीच माहीत नाही. मी एका तालात गुणगुणते शब्द मनात येतात, त्यातूनच कविता होते. मला नाही हे सगळे प्रकार माहीत. आणि तसे पाहिलेस तर माझ्या कविता तुझ्या शिवाय कोणी ऐकल्यात? मी फक्त माझ्यासाठीच गुणगुणते. आणि आता दोन तीन महिन्यात मी लग्न होऊन जाईन. मग तेच ठरवतील माझी गाणी चांगली की वाईट, मी गुणगुणायचे की नाही. कविता करायच्या की नाही." सुमाक्का स्वप्नाळू होत लग्नानंतरच्या समर्पणात शिरू लागली.

"म्हणजे तू लग्नानंतर कविता करणार नाहीस?" मी

"अरे! लग्नानंतर त्यांना काय आवडेल ते पहायला नको? त्यांना पसंत नसेल तर नाही करणार. आवडेल तर करणार." सुमाक्का

मी हिरमुसला झालो. हिचे लग्न झाले म्हणून काय झाले. हिने कविता करायच्याच नाहीत. नवऱ्याच्या आवडी निवडीचा काय संबंध? हिच्या आवडीचे काय? मला तिच्या नवऱ्याचा राग मनात भरू लागला. काही नाही कधी तो भेटलाच तर त्याला सरळ सांगायचे. बाबा! सगळे काही कर पण हिला कविता करण्यापासून थांबवू नकोस. आत्मा आहे तो तिचा.

माझी महिन्याची सुट्टी संपली. परत मालवणला गेलो. आता वर्षभर गावचे दर्शन होणार नव्हते. शाळेत जास्त मित्र नव्हते. आत्याच्या कडक शिस्तीत अभ्यासही चांगला होई. वर्गात हुषार मुलांत गणना होऊ लागली. मधे एकदा मोठा भाऊ कामासाठी म्हणून तालुक्याला आला होता. तो भेटायला आला. सुमाक्काचे लग्न झाल्याचे समजले. वर्ष संपत आले. गावी जायची फारशी ओढ नव्हती. कारण आता तिथे सुमाक्का नव्हती.

गावी पोचलो. आईने दोन दिवस चांगले करून खायला दिले पण मन संतोषत नव्हते. सगळे कंटाळवाणे वाटत होते. वेळ जाता जात नव्हता. दोन दिवसानी नदी काठच्या पार्वतीच्या देवळात जत्रा होती. रात्री तिकडे सर्वच जाणार होते. आमच्या घरचे आणि सुमाक्काच्या घरचे देखिल. पण त्यातही मला रस नव्हता. सकाळपासूनच कंटाळवाणे, हरवल्यासारखे वाटत होते. भटकत भटकत निघालो. पाय नेतील तिकडे जायचे. शेवटी नदीकाठच्या पार्वती मंदीरात पोहोचलो. अगोदर खूपदा या देवळात आलो होतो. पण देऊळ, आतली पार्वतीची मुर्ती, परीसर काहीच व्यवस्थित पाहिले नव्हते. आज पहिल्यांदाच कित्येक गोष्टी नव्याने पाहिल्या सारख्या वाटू लागल्या.

एक तर पार्वतीची मुर्ती रागीट वाटत होती. तिला आठ हात होते. सहा हातात वेगवेगळी शस्त्रे होती. एका हातात कमळ व दुसऱ्या हातात काहीतरी वाद्य होते. देऊळ तसे छोटेच होते. एका कोपऱ्यात तीन चार त्रिशूळे व तलवारी ठेवल्या होत्या. देवळात जत्रा किंवा दुसरा उत्सव असला की गावातील लोक पौराणीक प्रसंगावर एकादे नाटक करीत. कोंकणात त्याला दहिकाला म्हणत. अशा नाटकात हे त्रिशूळ व तलवारी वापरत. देवळाच्या बाहेर कितीतरी काळ्या कापडी बाहुल्या पडल्या होत्या. काही विटून गेलेल्या तर काही अगदी ताज्या. बरोबर दोन चार कापलेली लिंबे देखिल पडली होती. कोंकणातले लोक भुता खेतांना फार मानत. भूत उतरणे किंवा एकाद्याच्या मागे भुताचे शुक्लकाष्ट लावणे याला ते “कवाटबावले” म्हणत. त्या बाहुल्या याच प्रकारात वापरलेल्या होत्या. पण एकंदर शांतता, जवळून वहाणारी नदी, देवळातली रागीट मुर्ती आणि माणसांचा मागमूसही नसलेल्या त्या देवळात मी एकटाच आहे हे मनात येऊन चांगलाच घाबरलो. लगबगीने घरी निघालो.

रस्त्याच्या दोन्ही बाजूनी कुड्या, करवंदांच्या झुडपानी गर्दी केली होती. त्यातून मधेच पानांची खसखस ऐकू आली की जीव आणि घाबरा व्हायचा कसातरी घरी पोहोचलो तो घामाने डबडबूनच.

कपडे उचलून विहीरीवर गेलो. चारपांच बादल्या शेंदून धडाधडा डोक्यावर ओतल्या आणि घामाबरोबर भितीदेखिल धुवून निघाली. तेवढयात आठवले, आई म्हणत होती, सुमाक्का महिन्यातून दोन तीनदा येते आईला भेटायला. रोडली आहे फार. जास्त बोलत नाही. सासर मानवलेले दिसत नाही. या सगळ्या गोष्टी ऐकून मी तिला भेटायला उतावळा झालो होतो.

लक्षात आले तिच्या गावी जायचा रस्ता देवळावरुनच जातो. म्हणजे आता मी आलो त्याच रस्त्याने ती जात येत असणार. एकटीच? भिती नसेल वाटत तिला?

मग एकच छंद लागला. घरच्या ओटीवर बसून तिच्या कविता आठवून आठवून म्हणायच्या. घाबरण्यावरून आठवले. एकदा सुमाक्का त्यांच्या कुणाच्या तरी लग्नाला म्हणून तारकर्लीला गेली होती. चांगली आठ दिवसानी आली होती. मग तिथल्या गोष्टी सांगताना मला म्हणाली, “येशा! केवढा समुद्र रे! थांगच लागत नाही. पाणी अगदी अकाशाला जाऊन भिडते संध्याकाळी तर सूर्य लाल लाल होऊन समुद्रातच बुडतोय असे वाटते. भरतीच्या वेळी या मोठ्या लाटा येतात. आवाज केवढा येतो त्यांचा. एक दिवशी रात्री आम्ही बाहेर ओटीवर झोपलो होतो. रात्री भरती आली आणि समुद्राचे रोरावणे

सुरू झाले. मी जागी झाली. अर्धवट चंद्रप्रकाशांत ते रोरावणे, ती माडांची सळसळ, सांवल्यांनी धरलेला फेर. हे सगळे बघून ऐकून घाबरून गेले. पण दुसऱ्या दिवशी आपसूक एक कविता आली रे ओठावर. ऐक

उधाण उधाण उधाण
रोरावतो समुंदर
भरती भरती भरती
पाणी धांवे अंगावर
रंगले रंगले रंगले
पश्चिमेचे ढग नभी
बुडाला बुडाला बुडाला
बघ सुर्यदेव समुंदरी
घोघावे घोघावे घोघावे
भरतीचे मोठे लाट
आली आली बघ आली
अष्टमीची अर्धी रात
प्रकाश प्रकाश प्रकाश
अर्ध्या अर्ध्या चंद्रमाचा
सळाळ सळाळ सळाळ
वारा वाहे पश्चिमेचा

भयाण भयाण भयाण

सांवल्या झांवळया माडांच्या

हालती डोलती चालती

घालती सांवल्या फुगडी

घाबरा घाबरा घाबरा

होतो जीव बापुडी

भ्यालेली भ्यालेली भ्यालेली

मी कशी बरे झोपायची

भरती भरती भरती

नको अर्ध्या चंद्रमाची.

बघ मी किती घाबरलेली होती ते.''

मी हे सगळे आठवत होतो सुमाक्काची भेट होत नव्हती, पण तिच्या कवितांच्या आठवणीतून ती भेटत होती. मी दररोज एकदा तरी तिच्या आईला विचारी ''काकू! सुमाक्का नाही आली, कधी येईल हो?''

''अरे सांगावा पाठवलाय. कळवलेय मी तिला तू आलायस म्हणून. सासुरवाशीण रे ती. येईल येईल हो. पण ती हल्ली फारशी आनंदी दिसत नाही. काही बोलतही नाही. तू विचारशील का रे? कसला त्रास आहे. विचार हो तिला. मग ती गेली की सांग मला. हल्ली चिडते ती पटकन. सांभाळून विचार हो.'' सुमाक्काची आई पोटच्या मायेने मला भडाभडा सांगत होती. मला आश्चर्य वाटत होते, तसेच दुःखही होत होते.

सुमाक्का अगदी गरीब गाय होती. ती चिडते, रागावते यावर विश्वासच बसेना. दुःख वाटले ते तिला सासुरवास होत असेल हे ऐकून. वाटले एकदा तिच्याकडे जाऊन स्वतःच पाहून यावे काय चाललेय ते. पण घरी काय सांगायचे? मनाशी असा खेळ चालला असताना मागचे दिवस आठवले. मागे

आलो होतो तेव्हा तिचे लग्न व्हायचे होते. लग्न ठरले या आनंदात होती. गुणगुणत होती. विचारले तरी ती कविता म्हणून दाखवीत नव्हती. मी तर तिच्या कविता आठवून आठवून लिहून ठेवत होतो. कुठलीही कविता चुकून राहिली तर मी बेचैन होत असे. आणि आता तर ही कविता मला सांगतच नव्हती. खूप मागे लागलो. समजावले, भांडलो, रुसलो तेव्हा कुठे तयार झाली. म्हणाली "मला लाज वाटते रे ही कविता तुला म्हणून दाखवायला. मुलीचं मन या वयांत कसं हळुवार, ओढाळ उत्सुक असतं, ते दाखवणारी कविता आहे. कुणाला सांगणार नसशील तरच म्हणून दाखवते."

"हो मी खरंच कुणाला सांगणार नाही. पण तू मला म्हणून दाखव मी लिहून ठेवणार आहे. चालेल ना?" मी

"कशाला? लिहून ठेवलीस की सगळ्याना मिळणार." सुमाक्का

"तू म्हण मग सांगेन तुला मी का लिहीणार ते." मी

मग तिने ती कविता म्हणायला सुरवात केली.

बोला फुलाची गांठ

पाऊस म्हणता पाऊस

मन झाले ओढाळ ओढाळ

बोलणी ऐकता चोरून

कशी लागली ही ओढ

सोळाव्याची रे खोड.

माझ्या मनाची रे गांठ

कशी बैसली तुझ्यात.

लपंडाव होतो मनी

रंगे मुर्ती तुझी क्षणी .

खोडी तुझी जीव घेणी

लपतोस क्षणोक्षणी

दे रे मना तू विसावा

नको करू त्याचा धांवा

छळवाद मांडतो तो

दिन मग खिन्न जातो

मन होते हळूवार

भेटायाची आंस फार

तुझी मुर्ती डोळ्यांवर

नाव येई ओठांवर

बोला फुलाची होता गांठ

पहा आलास समोर

कविता संपली आणि मी एकदम विचारले “म्हणजे तू भेटलीस त्याला? बघितलास त्याला? कसा दिसतो ग?”

“अरे वेडया! हे सगळे मनाचे खेळ. अजून कुठे पाहिलाय मी. लग्नाच्या वेळीच पहाणार त्याला. तोपर्यंत हे मन असंच खेळतं. आपणच प्रतिमा तयार करायची आणि पूजायची.”

मी कविता आणि तिचा स्वप्नाळूपणा दोन्ही मुळे विचारात गेलो. काय छान विचार करते, कल्पना करते. त्याच विश्वात दंग होते.

आणि आता ऐकतोय ते काय? ती दुःखी का? काहीच समजणार नाही ती भेटल्या शिवाय. अस्वस्थ होऊन जात होतो. आता तर शेवटचे आठच दिवस बाकी होते. मग परत जायचे होते.

शेवटचे वर्ष चालू होणार. मॅट्रीक झाल्यावर पुढच्या शिक्षणासाठी कोल्हापूर नाहीतर मुंबईला जावे लागणार. मग तर गावी येणे जमेल की नाही तेही माहीत नव्हते. अजूनतरी सुमाक्काचा पत्ता नव्हता की केव्हा येणार त्याचा निरोपही आला नव्हता.

मी जायला दोन दिवस बाकी होते आणि सुमाक्काच्या आईने हांळी दिली. ‘‘यशवंता! सुमी आली रे सकाळी सकाळी! ये लवकर’’ मी नुकताच उठून चहा पोहे खात होतो. सगळे तसेच टाकून पळत सुटलो.

सुमाक्का आईच्या बाजूला बसली होती. गुढग्यांत मान लपवली होती. मी गेलो तर गदगदा हलू लागली. मला समजले ती रडतेय. चांगली हुंदके देत रडतेय. मी एकदम आवेगाने जवळ गेलो. म्हणालो ‘‘सुमाक्का’’ काय झालं? का रडतेस? चल बागेत जाऊ तुझ्या, बरे वाटेल तुला. पण ती जराही हलली नाही. आम्ही तिघेही शांत बसलो होतो. पण तिघांच्याही मनात प्रचंड खळबळ उडाली होती. प्रश्न एकच, काय एवढे मोठे दुःख आहे हिला? पण याचं उत्तर तिने सांगीतल्या शिवाय मिळणार नव्हतं.

बराच वेळ गेला आणि तिने मान वर उचलली. पाण्याचा पेला घेवून घटाघटा पाणी पिवू लागली. आणि तिच्याकडे पहाताच मी धसकलो.

सुमाक्का भयानक दिसत होती. पिंजारलेले केस, लाल डोळे, आधीच काटकुळी होती, ती अजून वाळली होती. चेहेरा पांढरा फटक दिसत होता. त्यांतून ते नाक अजून बाहेर आल्यासारखे वाटत होते. तिची रयाच उडून गेली होती. लग्न होऊन वर्षही पुरे झाले नव्हते. मग तिची ही अवस्था का? या विचाराने मी हैराण झालो. तिच्या आईचेही बरोबर होते तिला काय दुःख आहे याचा छडा लावलाच पाहिजे होता.

मी तिचा हात पकडला व म्हणालो ‘‘चल.’’ एक जोराचा झटका देऊन तिने हात सोडवला व म्हणाली ‘‘बागेत नेऊन काय बोलणार ते माहीत आहे मला. मला काय दुःख हेच विचारणार ना तूं? ते मी तुला नाही सांगू शकणार. तू आलेला समजल्यावर मी यायचं टाळत होते. तू सगळे विचारत बसणार. डोकं फिरवणार माझं. माझ्या प्रारब्धांत जे आलंय ते भोगू दे मला. तुम्हाला सांगून तुमचं दुःख कशाला वाढवू?’’ उसासत ती गप्प झाली. तिची आई देखिल गप्प होऊन माझ्याकडे पहात राहीली.

"जाऊ मी सुमाक्का? एवढी आलीस तर काहीच बोलणार नाहीस? अग तू बोलली नाहीस, एक दोन कविता ऐकवल्या नाहीस तर मला चैन नाही पडणार वर्षभर. बरं चल मी काही विचारत नाही. तू कविता ऐकव." मी काहीतरी मार्ग काढायचा प्रयत्न करीत होतो.

"मी कविता करायच्याच सोडून दिल्यात. अरे आयुष्यातून सगळा आनंदच गेला तर कविता कसल्या करणार आणि आता कविता आलीच ओठावर तर ती मनातलं, हृदयातलं गरळच ओकणार. ना? मग कशाला कविता करू? तुम्ही कोणी लक्ष देऊ नका माझ्याकडे, ज्या दुःखावर तोडगा नाही, ते न बोलता भोगलेच पाहिजे मला." सुमाक्का खोल आवाजात बोलत होती.

मग मी तिच्या आईलाच विचारले "काय हो काकी! सुमाक्काची आत्या त्याच गावी आहेना? तिनेच सोयरीक जुळवली ना? मग? तिला विचारलेत की नाही?"

"अरे बाबा राहीन का रे मी विचारल्या शिवाय? ती म्हणते तिच्या घरचे सगळे चांगले आहेत. जपतात हिला. पण हीच विचित्र वागते. नवरा लाड करायला बघतो, पण हीच बिथरुन त्याच्यावर ओरडते."

मला खरेच वाटेना लग्नाच्या बाबतीत स्वप्नाळू असलेली सुमाक्का अशी कशी झाली? हे कोडं काही असंच सुटणार नव्हतं. मी परत घरी आलो दुपारीच सुमाक्का तिच्या गावी परत गेली. हे ऐकताच मी सैर भैर झालो आता आमचं हे नातं देखिल हळूहळू संपणार का? असं वाटून गेलं.

मी माझ्या आईला म्हणालो "तू बघितलंस सुमाक्काचं काय झालंय ते?"

"हो रे! पण काय करणार असतं प्रारब्ध एकएकाचं, काय त्रास आहे ते बोलत नाही ती." माझी आई अगदी रुढी समजावत होती. जणू काही बायकानी सगळं नशीब समजून सोसायचे.

"अग पण तिची आत्या राहाते ना त्याच गावी? तिनेच ठरवले ना लग्न? मग तिला नाही माहीत?" मी

"अरे! ती म्हणते सगळे चांगले आहे. पण सुमीच विचित्र वागते. ते लोक खूप सांभाळून घ्यायचा प्रयत्न करतात." आई.

पण मला मात्र हे पटेना. सुमाक्का अतिशय सरळ आणि गरीब होती स्वभावाने. कविचं हळवं मन होतं. किनऱ्या आवाजात गोड बोलणारी सुमाक्का लग्ना नंतर केवढी बदललली होती. फार

चिडचीड करू लागली होती. मनातल्या मनात कुढत होती. कोणाशी धड बोलत नव्हती. का? याचे उत्तर कुणालाच मिळत नव्हते. सबंध दिवस विचार करून मी थकून गेलो. दोन दिवसानी परत निघालो. परत गावी केव्हा येईन हे निश्चित सांगता येत नव्हते. एक हुर हुर, रिकामेपण मनात तयार झाले होते.

शाळेत जोरात अभ्यास सुरू होता. अभ्यासात गढून गेलो. सगळे विषय अगदी घोटून करीत होतो. एके दिवशी मराठीच्या तासात कवितांचे विश्लेषण चालू होते. सर फार रंगात येऊन भाव कविता कशा असतात याचे विवरण करीत होते. आणि मला आपल्या कवितेत दंगलेली सुमाक्का सारखी नजरेसमोर येत होती. त्या दिवशी सरानी आम्हाला भाव कवितेवर एक टिपण्णी वजा निबंध लिहून आणायला सांगीतले. मी काय लिहू याच्यावर विचार करीत असतानाच मला सुमाक्का तिच्या बागेत गात फिरतानाचा दिवस आठवला. काय लिहित होतो तेच माहीत नव्हते. अगदी आतून कुठूनतरी शब्द मनात येत व कागदावर उतरत होते. सुमाक्काची कोकीळे वरची कविता व तिचे बागेत फिरतानाचे गुणगुणने डोळ्या समोरून सरकत होते. शब्द भराभर कागदावर उमटत होते. चांगली दोन पाने भरल्यावर निबंधाची सांगता केली. आणि शांतपणे डोळे मिटून बसलो. एका वेगळ्याच अनुभूतीचा स्वाद घेतोय असे वाटत होते. तेवढ्यांत कानात कोणीतरी बोलतेय असा भास झाला.

“ पाहिलेस? समजला अर्थ? घेतलास अनुभव? आले लक्षांत मी म्हणते त्याचा?

मनात गुंजते उरांत दाटते

कानांत हांकते डोळ्यांत डोलते

उठती उठती तेव्हाच उठती

ओठावर लाटा कवितेच्या

आज तुला जे काही उचंबळून आले. पांचही इंद्रीयानी एकत्र येवून तुझ्या लेखणीतून जे उतरवले त्यालाच म्हणतात रे समाधी. माझी अशीच समाधी लागते. पांचही इंद्रीये सक्रिय होवून मदत करतात, त्याच वेळी उरांतून विचार येतात. घेतलास ना अनुभव?”

जणू सुमाक्का मला तिचा अनुभव अप्रत्यक्षपणे देत होती.

दोन दिवसानी सरानी माझा निबंध सर्वोत्कृष्ट म्हणून वर्गात वाचला. फारच सुंदर म्हणून शेरा दिला. त्यातली कविता वाचली. आणि म्हणाले “ यशवंतने फार सुंदर कविताही केली आहे.” मी

एकदम उभा राहिलो व म्हणालो " नाही सर ही माझी कविता नाही. ही माझ्या बहिणीने सुमाक्काने केली आहे. ती कविता ती गुंग होऊन गुणगुणताना मी पाहिली होती. ती त्या भावविश्वांत दंग होती हे अनुभवले म्हणूनच तुमच्या भाव कवितेवरच्या विश्लेषणा नंतर मी बरोबर लिहू शकलो."

"वा! सुंदर तुमच्या बहिणीलाही सांगा अशाच कविता करीत रहा. किती सुंदर कविता आहे. ही." सर.

मनात खट्टू होऊन मी खाली बसलो. कसं सांगणार यांना तिच्या आयुष्यातून कविताच निघून गेली आहे. आता ती त्या विश्वात रमतच नाही. गोड, गरीब, कवी मनाची सुमाक्का पार कोमेजून दुसऱ्याच विश्वात गेली आहे. का? कशी? या प्रश्नांची उत्तरे मीही शोधत आहे.

आज सुमाक्का मुळेच मी शाळेत नावाजला गेलो होतो. सुमाक्काने मला भरभरून सगळे काही दिले होते. मी काय देणार होतो. तिला? आजपर्यंत तरी काहीच दिले नव्हते.

शेवटचे वर्ष संपले. रिझल्ट नंतर कॉलेज ऍडमिशनची सोय पहायची होती. मुबंई व कोल्हापूर असे दोनच पर्याय होते. पण रिझल्ट नंतरच हालचाली करायला हव्या होत्या. महिन्या दीड महिन्याचा अवधी होता. गावी जावं असा विचार करीत होतो. एवढ्यात बातमी आली सुमाक्काची आई वारली तडक उठलो आणि गावची बस पकडली.

घरी पहोचलो, नजर समोर सुमाक्काच्या घरी गेली. स्मशान शांतता होती. काही लोक आतल्या खोलीत असावेत असे वाटले. माझी आई जेवणघरात होती. तिथे गेलो. विचारले "आई! काय झालं ग? अशा कशा एकदम् गेल्या काकू?"

"काय सांगायचे प्रारब्ध रे! आठ दिवसापूर्वी सुमी आली होती. अगदीच रोड झाली होती. जगेल की मरेल अशी झालीय सुमी. आईनी तिला काय होतेय विचारले. मग त्यांचं काय बोलणं झालं कुणालाच माहीत नाही. पण सुमीच्या आईने त्याच रात्री अंथरुण पकडलं. माझ्याकडे एवढेच बोलली, आमच्या मुलीचा आम्हीच घात केला हो. मी खोदून विचारले तरी सांगीतले नाही. दुसऱ्याच रात्री झोपली ती उठलीच नाही. रविवारी सकाळीच समजले ती गेली. आज पांचवा दिवस . ती गेली पण सुमी आली नाही. सुमीचा नवरा आलाय, सासरे आलेत." आईने एका दमात सगळा वृतांत सांगीतला. मी आश्चर्यात पडलो सुमाक्का आली नाही? सुमाक्का आणि आईचे फार प्रेम एकमेकांवर, तरी देखिल सुमाक्का आली नाही?

चार पांच दिवसानी दिवसकार्य आले. समोरच्या घरांत सुमाक्काचे बाबा एकटेच राहिले होते. दिवसकार्याचे पहायचे सगळे सुमाक्काच्या सासऱ्यानी व नवऱ्याने आपल्या हाती घेतले होते. माझे बाबा व भाऊ त्यांना मदत करीत होते, दिवस कार्यालाही सुमाक्का आली नाही. मी सरळ सरळ तिच्या नवऱ्याला विचारले “काय हो! सुमी एकुलती मुलगी ती नाही आली?”

“अहो! बरेच सांगीतले तिला. पण ऐकतच नाही ती कुणाचं. बडबडत बसते आईला मीच मारलं असं बरळत बसते.” असे बोलून तो गप्प बसला. थोड्या वेळाने म्हणाला “एक विचारू? खरे खरे सांगाल? नाही म्हणजे तुम्ही आणि ती लहानपणापासून एकत्र खेळलात एकमेकाचे बाळपणीपासून घट्ट संबध होते म्हणून विचारतो.”

जरी त्याच्या बोलण्यात मला कुजकट गंध दिसला तरी मी म्हटले “ हो विचारा ना! काय ते विचारा.”

“नाही! ही पहिल्यापासूनच अशी वेडसर होती म्हणून आमच्या गळयात मारली, की हिला पाहिजे तिथे लग्न नाही झाले म्हणून वेड्यासारखी करते?”

मी या प्रश्नाने खरेतर तापलो, पण सावरीत म्हणालो. “ती अतिशय साधी गोड आणि कविता करणारी होती. ती वेडसर जराही नव्हती. माझ्या मोठ्या बहिणीसारखी ती माझ्या पाठीशी उभी राहीली. आजही अप्रत्यक्षपणे उभी आहे. उलट आम्हालाच संभ्रम वाटतो. एवढया चांगल्या घरी लग्न होऊन ती दुःखी का? लग्नानंतर फार बदलली ती. कशामुळे हे समजत नाही.”

तिच्या नवऱ्याचा चेहेरा थोडा पडल्यासारखा वाटला पण तरीही तो म्हणाला, “ हे पहा आम्ही तर सर्व तिच्या कलाने घेतो. तिला चांगले वागवतो. पण तिला मूल होत नाही याचं दुःख कशाला कवटाळून बसायचं. तिला मूल होत नाही म्हणून आम्ही काही दोष देत नाही. मी कधी दुसऱ्या लग्नाचा विचार पण केला नाही. तरी दुःख कसले. असते एकएकाच्या नशीबी वांझपण.”

वांझपण हा शब्द मला जबरदस्त झोंबला. मी पटकन उठलो आणि घरी निघून आलो. मनात विचार आला, मूल नाही झालं तर बाईच वांझ असते? की पुरुषातही दोष असू शकतो? पण आता हे त्रासदायक विचार नकोत असेच वाटू लागले. ज्या गोष्टीत आपण काहीच करण्यास असमर्थ आहोत त्यावर काय विचार करीत बसायचे?

दोन दिवसानी गावावरून निघालो. आता केव्हा येईन माहीत नव्हते.

मगची वर्षे सरसर पळत होती. चार वर्षे झाली होती गावी गेलोच नव्हतो. कोल्हापूरहून पुण्याला गेलो होतो. अभ्यासासाठी वेळ पुरत नव्हता. शेवटी एकदा डिग्री परीक्षा पास झालो आणि गावी निघालो पांच वर्षात जरी अभ्यासात गढलो होतो तरी ओठावर सुमाक्काच्या कविता येत. तिची आठवण देत. कशी असेल सुमाक्का ?

शिक्षण संपले आता नोकरी शोधायची त्या अगोदर एकदा गावी जाऊन यायचे ठरवले.

गावी पोचलो सुमाक्काच्या पडवीत एक पिंजारलेल्या केसांची हाडकुळी बाई कचरा काढताना दिसली. पाठमोरी होती. मी आमच्या घरात शिरलो. आईने बसायला पाट दिला चहा ठेवला आणि म्हणाली " अरे सरळ घरीच आलास सुमीला नाही भेटलास?"

दचकत मी विचारले, "सुमाक्का इथे आहे?"

"हो रे! बिचारीचे फार वाईट झाले. तिची आई गेली. तिचा नवरा सारखा इकडे येवून तिच्या वडिलाना सतवू लागला सांगू लागला, "तुमच्या मागे कोणी नाही, तुमची मुलगी वेडसर आहे. आत्ताच जमीन जुमला नांवे करा. मागून आम्हाला त्रास नको. पण ते जीवंत असेपर्यंत कसे करतील रे त्यांच्या नावे? म्हणून गप्प राहायचे. ते जमीन नावावर करीत नाहीत म्हणून त्याने सुमीलाच पाठवले माघारी. वांझ, वेडसर असे खूप दोष लावले तिला. पहिल्यांदा नाही दिसले हे दोष? काही नाही रे त्यांचा घरावर, जमीनीवर डोळा, दुसरं काय? पण पोर पार खचली रे. हाडपिंजरा झालीय आत्तांच. प्रारब्ध रे! दुसरं काय ?"

आई बोलायची थांबली मला एकदम अपराधी वाटू लागलं मघाशी कचरा काढणारी दुसरी तिसरी कोणी नसून सुमाक्का होती तर? मी ओळखलीच नाही तिला? तसाच उठलो आणि निघालो. आई ओरडत होती. "अरे चहा पी आणि मग जा" मी तिकडे लक्ष न देता तडक सुमाक्काच्या घरी आलो.

सुमाक्का सुन्न झाल्या सारखी मागच्या दारी पायरीवर बसली होती. समोरच तिचे वडील झाडे छाटीत होते. मी मागून अलेलो सुमाक्काच्या ध्यानीही आले नव्हते.

"सुमाक्का! बघ मी आलोय, येशा." मी म्हणालो. सुमाक्का हळू मागे वळली. माझ्याकडे बघून खोल गेलेल्या किनऱ्या आवाजांत म्हणाली "पाहिलं मी तुला मघा आलास तो. पण तुझं लक्ष नव्हतं, घरीच गेलास लगबगीनं."

मी तिच्याकडे बघून हादरलो होतो. ही आणि सुमाक्का ? शक्यच नाही. ही म्हणजे सुमाक्काचे जीवंत प्रेत होते. निस्तेज खोल गेलेले डोळे. वर आलेली गालाची हाडे, खप्पड झालेले गाल. अंगात रक्तच नसल्यासारखी पांढरी फटक पडलेली सुमाक्का. माझ्या मनातल्या सुमाक्काच्या मुर्तीच्या ठिकऱ्या उडवत चालली होती. माझ्या डोळ्यातून पाणी सुरू झाले. ते बघून, म्हणाली, “अरे रडतोस काय बायकां सारखा. तुला काय झालंय रडायला?” काही न बोलता परत फिरलो. घरी येवून आडवा झालो. आढ्याकडे डोळे लावून पडलो होतो. दोन तीन तास नुसता विचारांचा कल्लोळ उडाला होता. एवढयात एक विचार आला. “अरे एवढे भोगून दुःखी होऊन ती आलीय इथे. तिला आनंदी कशी करता येईल त्याचा विचार कर. तिच्या दुःखावरच्या खपल्या न काढता तिच्या मनावरचा भार कसा कमी करता येईल हे ठरव. तेच कर्तव्य ठरतं तुझं.”

एक दोन दिवस नुसता जात येत राहिलो. तिच्याबरोबर बागेत शेतात कामाला मदत करू लागलो. ती जेवायच्यावेळी आवर्जून हजर होऊ लागलो. ती नीट जेवते याच्या कडे लक्ष देऊ लागलो. पण कशानेही ती खुलत नव्हती. पूर्वी सारखी बोलत नव्हती. कविता करीत नव्हती. जीवंत होती म्हणून हालत डुलत होती. कविता कर म्हटले तर भयाण हंसत होती.

मला वाटले हिला परत माणसात आणायचे असेल तर हिच्या मनातल्या दुःखाचा निचरा झाला पाहिजे. काय भोगलेन त्याचा पाढा वाचायलाच लावला पाहिजे.

एक दिवशी सकाळीच मी तिला विचारले. “सुमाक्का तुझी आई गेली तेव्हा शेवटी म्हणाली होती. आम्हीच घात केला मुलीचा म्हणून. आम्हाला अजून ते कोडंच आहे.”

सुमाक्काच्या चेहेऱ्यावर एकदोन रेषा उमटल्या आणि नाहीशा झाल्या. बोलली काहीच नाही. ताबडतोब मागे लागण्यात अर्थ नाही म्हणून मी गप्प राहीलो.

दुसऱ्या दिवशी तिच्या परसात गुलाबाच्या झाडाकडे घेऊन गेलो. ते झाड आता चांगलच मोठं झालं होतं. खूप फुलं डंवरली होती. मी म्हणालो “बघ तुझा गुलाब कसा फुललाय.” ती अगदी रिकाम्या नजरेने पहात होती. त्यात कुठलाच आनंद, मागच्या आठवणी काहीच उमटत नव्हतं. एक रिक्त, भकास नजर होती.

जिवंतपणी माणूस मरू शकतं याचं उदाहरण होती ती. आता मला असह्य होऊ लागलं. म्हणालो "सुमाक्का नको ग अशी वागूस, बोलत जा पूर्वीसारखी. सांग काय भोगतेस ते. दुःख बाहेर काढ. बरे वाटेल तुला."

तिने त्याच भकास नजरेने माझ्याकडे पाहिले मग हळू पुटपुटत म्हणाली "अरे! माझे बोलणे देखिल विष आहे. आईकडे बोलले तर ती तीन चार दिवसात गेली. कशी बोलू तुझ्याकडे तू ही असाच मेलास तर? मीच काय ती मरत नाही."

हे भयानक होते. खूप दुःख सोसताना लोकाना पाहिलं होतं, पण हे काय आहे तेच समजत नव्हतं. सुमाक्काने आपल्या भोवती आपल्याच दुःखाचा कोश विणला होता. त्यात ती एकटीच ते दुःख सहन करीत बसली होती.

एक मात्र खरे. लोकानी जरी तिला वेडी ठरवली होती तरी मला ती वेडी वाटत नव्हती. ती व्यवस्थित विचार करू शकत होती. कारणे देत होती. फक्त आपले दुःख प्रकट करायला घाबरत होती. हा दिवसही फुकट गेला. काहीच समजणार नाही असे वाटू लागले. सुमाक्काला बोलते करायचा उपायही सुचेना.

मी आईकडे सर्व बोललो. ती वेडी नाही, हे देखिल ठसवले, आई म्हणाली "मग असे कोणी वागते का रे? वागणुकीवरून काय समजायचे? ही वेडी नाही? अरे! दुःख बोलून तरी दाखव म्हणजे त्यावर तोडगा काढता येतो. आणि हो तू आता नोकरीसाठी जाणार आहेस, उगीच नसते प्रश्न डोक्यात घेऊन जाऊ नकोस. सगळे सांगतात तिला सासरी काही त्रास नव्हता. तरी त्यांनी सांभाळली तिला. मला वाटते मुलं होत नाहीत, वांझपण आहे हाच धक्का पचवू शकत नाही ती असे वाटते. प्रारब्ध रे दुसरे काय ?"

मला कुठेतरी हे पटू लागले. पण तिच्याशी हे बोलायचे कसे याचा विचार करू लागलो. दोन दिवस बोलायचे शब्द एकत्र करण्यात गेले. या दोन दिवसात ज्या ज्या वेळी ती भेटली तेव्हा तेव्हा मी तिला एकच विचारायचो "सुमाक्का सांग ना का अशी वागतेस? काय झालंय तुला?"

दोन दिवस गेले आणि एके दिवशी मी चंग बांधून मनात आलेले विचारायचेच ठरवले दुपारची वेळ होती जेवणां नंतरची आवरा आवर करून सगळे विसावले होते. मी सुमाक्काला शोधून

बोलत बोलत ओटीवर घेऊन आलो. समोर बसवून समजावून सांगण्याच्या सुरात बोलायला सुरवात केली.

"सुमाक्का मला माहीत आहे, तू हळूवार मनाची अगदी मनमिळावू मुलगी होतीस. लहानपणापासून प्रत्येक गोष्ट तू मला सांगीतली आहेस. आपली एकमेकावरची माया सगळ्यानाच माहीत आहे. सगळे गाव म्हणते अगदी सख्या भावंडात सुद्धा अशी माया असा जिव्हाळा दिसत नाही. पण आज हे तू खोटे ठरवतेस. मला देखिल सांगीतले नाहीस तुझे दुःख, पण मला आता अंदाज आला आहे. अग सर्वानाच मुलं होतात असं नाही. काही काही जणाना हे सुख देव देत नाही. ते एवढं मनाला कशाला लावून घेतेस ? बरं तुला मुल नाही म्हणून त्या लोकानी, तुझ्या नवऱ्याने तुला वाईट वागवली का? मग ही बाजू तरी बघ ना. त्यातच संतोष मानायचा सुख शोधायचं. सगळ्यानाच तू काळजी लावून ठेवलीस. बघ मुलं होत नाहीत म्हणून इतर बायकाना खूप हाल सहन करावे लागतात. लोक नाही नाही ती दूषणं देतात. बिचाऱ्याना सवतीचा देखिल त्रास भोगावा लागतो."

आता सुमाक्का गदगद हलत होती. तिच्या पांढऱ्या फटक चेहेऱ्यावर लालूस पणा आला होता. डोळ्यातून धारा लागल्या होत्या त्याच वेळी माझ्या तोंडातून शेवटचं वाक्य निसटत होतं.

"बघ सगळे ठपका देतात. वांझपणाचा शिक्का बसतो." मी पुढची वाक्ये बोलूच शकलो नाही.

सुमाक्का एकदम किंचाळत उठली "तू सुद्धा? तू सुद्धा मला वांझ ठरवतोस? हाच का तुझा जिव्हाळा? अरे सारखा विचारतोस ना माझं दुःख काय? माझं दुःख काय? आहे हिम्मत ऐकायची? कविता पाहिजे असते ना माझ्या कडून तुला? मग ऐकच आता बघते कसे सहन करतोस ते. कवितेतच सांगते तुला " तिची किंचाळी मोठ्या मोठ्याने बोलणे ऐकून तिचे वडिल, माझी आई, भाऊ, वहिन्या सगळे धावत आले. मी खुणेनेच सगळ्याना आवरले. माझ्या आईच्या ताबडतोब लक्षात आलो. मी बांध फोडलाय. तिने सगळ्याना आवरले.

सुमाक्का अजुन हुंदके देत होती. तिने एकदम् टाहो फोडला. " आsss आss आss " काळीज चीरत जाणारी ती किंकाळी पुरी करून बोलली " ऐक – आsss"

……………

……………

मग पहिल्या कडव्यापासूनच आम्हाला हादरे बसू लागले. प्रत्येक चार ओळी नंतर ती किंचाळी फोडून हुंदके देत होती. मग पुढचा धक्का बसत होता. हा ज्वालामुखी फुटत होता. आम्ही त्यात पोळायला सुरवात झाली होती. प्रत्येकजण सुन्न होवून ऐकत होता. सगळे बधीर होत होते. किती वेळ झाला ते माहीत नव्हते. शेवटी ती थांबली.

मी सुन्न बधीर झालो होतो. खवळून उठलो होतो. काय करीत होतो ते समजत नव्हते.

......................

......................

आज बारा वर्षे निघून घेलीत. चौदा वर्षांची शिक्षा भोगून मी सुटलो होतो. चांगल्या वर्तणुकीमुळे शिक्षा कमी करून लवकर सोडले होते. हो! मी सुमाक्काच्या नवऱ्याचा मुडदा पाडला होता, बारा वर्षापूर्वी. त्या दिवशी मी सुन्न होऊन निघालो तो भ्रमिष्टासारखा नदीकडे निघालो. पार्वतीच्या देवळाकडे पोचलो. तिच्या भयानक रुपाकडे पहाताना हाताने एक त्रिशूळ केव्हा उचलला ते समजलेच नाही. एका काळ्या बाहुलीवर तो मारताच तिचे डोके फाटकन उडून दूर जाऊन पडले. कातरवेळ होत आलेलीही समजले नाही. तसाच भरकटत चालत राहिलो होतो. डोंगरावरच्या शंकराच्या देवळाकडे पाय नेत होते आणि मी जात होतो. केव्हाच काळोख झाला होता. देवळाच्या पायऱ्या चढत होतो. तोच समोरून कोणीतरी उतरत होते. माझे लक्ष नव्हते. पण त्याच व्यक्तिने हांकारले. समोर नारायण खोत, सुमीचा नवरा होता. क्षणात हातातला त्रिशूळ त्याच्या पोटात शिरला. त्याची किंकाळी बाहेर पडायच्या आत त्रिशूळ परत छातीत घुसला. मी काय करीत होतो मलाच माहीत नव्हते. त्याचा हात पकडून फरफटत मी त्याला नदीकडे नेवू लागलो. नदीवर पोचेपर्यंत तो केव्हा मेला तेही समजले नाही.

त्याचे कलेवर नदीत टाकून मी त्रिशूळ धुतला आणि देवळात ठेवला. चार पांच तास चालत मी तालुक्याला पोचलो. पोलीस स्टेशनमधे तक्रार नोंधवली. “मी नारायण खोताचा खून केलाय.”

बारा वर्षाची सक्त मजुरी अगदी सहज सहन झाली कारण सुमाक्काचे दुःख त्या पेक्षा कितीतरी जास्त होते. श्रमाचे काम आले व यातना वाटू लागल्या की तिची ती शेवटची यातनामय कविता आठवे.

विश्व उलगडे पहिल्या रात्री

घडती जडती सुंदर नाती

तहान त्याची करीते घाई

नव्हते पण ते नशीबी काही.

आ sss आ sss ---------

तिची किंकाळी मनात गुंजे आणि हात जोरांत चालत. तुरुंगात कामेही वेग वेगळी असत. श्रमांचे काम असह्य होऊ लागले की पुढची कडवी ओठावर येत

पुरुषार्थचा मेरुमणी तू

शक्तिची मी साध्य देवता

मानून ताते संबंध ठरविला

परी शक्तिला ना पुरुषार्थ मिळाला

“ हूँ s हूँ s s आsss आss”

कळीला झाली होती घाई

फुलावयासी लवकर पाही

परंतु सुर्य नभी दिसेना

काळोखाची रात्र सरेना.

“हां ss हां ss हां ss”

त्या दिवशी हा ज्वालामुखी फुटत होता सगळे दगडासारखे निश्चल झाले होते ते आठवायचे आणि हात जोरांत चालायचे. काम करण्याची संवय नसलेल्या अंगाची ठणक रात्री वाढायची. असह्य झाले की आठवे

कळता सारे माय धसकली

धसकून तापून विरून गेली

कोणी न उरले मन सांगाया

काय भोगते हे समजाया ss हांss हांs

खुन्याचे बिरूद घेवून मी दिवस, महिने, वर्षे तुरुंगात काढीत होतो. केव्हा घरच्यांची, सुमाक्काची आठवण येई. मन हळू हळू पुढे सरके ते आठवे,

दिवस संपले वर्ष संपले

भाग्य कळीचे असेच विरले

वांझपणाचे बिरुद मिळाले

सौभाग्यचे कुंकू विरले.

वांझ वांझचा घोष घोष रे

करीत होते आप्त जन सारे

मनी ऐकते आतून हांका

जन्म घ्यायचा आम्हा दे मोका. हा ss हा ss

फक्त बायकाना दोष देऊन बदनाम करणाऱ्या या समाजाने किंवा प्रथेने माझ्या सुमाक्काचा बळी घेतला होता. तिच्या दुःखासमोर माझी शिक्षा काहीच नव्हती.

आशा साऱ्या विरून जाती

रात्री साऱ्या भयाण होती

जवळी असुनी संग नसे

कारण त्याला पुरुषार्थ नसे ....हूँ ss हूं हूं

हे आठवताना ज्वालामुखी फाटून त्यातला तप्त रस माझ्या कानांत शिरल्यासारखे आजही होत होते. आजूबाजूनी इतर बायकाचे हुंदके आणि चुकचुकणे बारा वर्षे मी थरथरत ऐकत होतो. हाताने काम जोर जोराने करीत होतो. जेलर स्तब्ध होऊन पहात असे.

प्रतिष्ठेत त्याच्या जळले मी रे

दडवीत बसले दुःख कसे रे

वांझपणाचा मी दोष भोगला

नपुंसक तो मिरवीत फिरला,

सांगे मजला पुत्र हवा

दुसरा संग चालेल मला

बोलशील हा दोष कुणा

मोडुन टाकीन तुझा कणा

तुरुंगातील रात्री या ओळींमुळे तळमळत काढल्या. काय समजत होता तो सुमाक्काला. खरोखरच त्याने तिचे आयुष्य उध्वस्त केले होते. पौरुषत्व नसतानाही लग्नच का केले त्याने. हे विचार खूप प्रक्षोभित करायचे.

नाव सांडले देवाचे मी

भक्ति प्रार्थना नसतेच मनी

कसली भक्ति कसली मुक्ति

कसले जीवन सगळी माती.

शंकर राहिला बसुनी डोंगरी

सुकी पार्वती रडे नदीतीरी

असे चित्र रे माझे होते

भस्म भस्म रे जीवन ...तुझ्या सुमेचे.

आणि पुढचा टाहो फोडत ती जमीनीवर पसरलेली ती एवढीशी सुमाक्का आमच्यावर ज्वाळामुखीचा रस ओतत असलेली, आम्हा सर्वांना जाळत भाजत असलेली डोळ्यासमोर यायची. पण माझ्या डोळ्यातून एकही टिपूस येत नव्हता. उलट मी काही गुन्हा केलाय असे वाटतच नव्हते. वाटत होते ते एकच मी सुमाक्काला न्याय दिलाय. मग शांतपणा वाटू लागे.

------

बारा वर्षांनी सुटलो कुठे चाललोय माहीत नाही. समाजात स्वागत कसे होईल माहीत नाही. पण माझे मन शांत आणि स्थिर आहे. खुनी म्हणतील याची कोणतीच खंत वाटत नाही. सक्तमजुरीची शिक्षाही मला असह्य झाली नाही. कारण सुमाक्काने सांगीतलेले दुःख त्या पेक्षाही ताप दायक होते. प्रश्न एकच आहे, घरी जाऊ की नको? त्यांना माझ्यामुळे त्रास नको. समोर सुमाक्का दिसली तरी सहन होणार नाही. मलाही आणि तिलाही. त्यापेक्षा या लोकांच्या समुद्रातच नाहीसे झालेले बरे.

********

# गोमती- एक निरागस जिव्हाळा



लहानपणी शाळेत असताना एक वर्षी मुंबईला शिकायला आलो. वराडकरांची बिल्डिंग, एकवीसावा रस्ता, खार दांडा हा पत्ता. एकवीसावा रस्ता संपला की कोळयांच्या वस्तीतून पायवाटेने वराडकरांची बिल्डिंग गाठावी लागे. कोळयांच्या केंबळयांच्या बैठ्याघरामधे ही एकच चार मजली इमारत उठून दिसे.

समोर खाडी पसरलेली. दररोज भरती ओहोटी पहाताना मजा येई. बिल्डिंगसमोर वाळूच वाळू पसरलेली. कोळी लोकाच्या होड्या मासे घेऊन येत व त्याच वाळूवर ओतीत. कितीतरी प्रकारचे मासे असत. त्यांच्या बायकामुली मग मासे निवडून वेगवेगळे करायची एकच गर्दी करीत. त्यांच्या

बोलण्यात आरडाओरड फार असे. भाषा अगम्य वाटे. मराठीचीच बोली पण समजायला फार कठीण. मी तिसऱ्या मजल्यावरच्या आमच्या गॅलरीतून हे दृष्य खूप वेळ न्याहाळीत बसे. वाटे, खाली जाऊन अगदी जवळून सर्व पहावे. पण घरातून पहिल्याच दिवशी तंबी मिळालेली. "खालच्या कोळयांच्या मुलात जायचे नाही." जेवढे गॅलरीतून दिसे तेवढेच पहाण्यावर समाधान मानावे लागे.

दोन दिवसानी शाळा सुरू झाली. म्युनिसिपालिटीची शाळा, त्यामुळे आजुबाजूच्या कोळयांची मुलेच भरली होती. मी चौथीत होतो. पांच मिनीटे चालत गेले की शाळा यायची. गावी शाळा लांब होती. तेव्हा धावत धावत शाळेत जायची सवय पडली होती. इथेही मी धावत जायला लागलो तर पहिल्याच दिवशी काही मुले हसू लागली. काहीतरी बोलली देखील. पण मला समजलेच नाही. पण चटकरून लक्षात राहिली ती एक मुलगी. मला धावताना बघून जोरात हसत होती. तिच्या सोबत एक मोठा मुलगा होता. त्याला काहीतरी आपल्या भाषेत सांगून हसत होती. मी धावायचा थांबलो. हळू चालू लागलो. थोड्याच वेळात ते दोघे माझ्या जवळ पोचले. त्या मुलीने हसून विचारले, "तुज्या मंगोटी वाग लागला? त्याला बगीन धांवतला?". मला काहीच समजले नाही. समजले ते दोनच शब्द "वाघ" आणि "धांवतला". अंदाजाने मी समजलो "ती बहुतेक वाघ मागे लागल्यासारखा धांवतोस का?" म्हणत असावी.

मी काहीच बोललो नाही. रागही नव्हता आला. पण एक आठवले "कोळयांच्या मुलांबरोबर दोस्ती नाही करायची." मोठ्यांनी सांगीतलेले जीवेभावे आचरण्याचे ते दिवस, कसा बोलणार? जातीभेद कसोशीने पाळणारी कर्मठ, उच्चभ्रू वडिलधारी मंडळी. गप्प खाली मान घालून निघालो.

वर्ग सुरू झाला. पहातो तर ती मुलगी माझ्याच वर्गात. सहज लक्ष गेले तर ती माझ्याकडे बघून हसत, शेजारच्या मुलीच्या कानात काहीतरी सांगत होती. ती मुलगी देखील हसत होती. मला वाटले माझ्या धांवण्या बद्दलच बोलत असावेत. मी मान वळवली तास सुरू झाले. मास्तर शिकवू लागले तर उडालोच. भाषा एकदम विचित्र. गावच्या मास्तरांसारखी साफ नव्हती. मी नवीन पाहून मला त्यांनी नाव विचारले. नाव ऐकताच मला म्हणाले "बालवाचन आनला आहेस?" होकार जाताच पहिला धडा काढून वाचायला सांगीतले. स्वतः मास्तर व वर्ग शांतपणे ऐकत होते. दहा बारा ओळी वाचून झाल्यावर म्हणाले "काय समजले ते बोल." मी माझ्या भाषेत अर्थ सांगीतला. मास्तर खूष झाले. अजाणतेपणी माझे लक्ष त्या मुलीकडे गेले. तिच्या टपोऱ्या डोळयांत कौतुक, आश्चर्य पसरले होते. मंदपणे ती हसत होती. उगीचच धावणारा सकाळचा वेडा मुलगा तिला आता चांगलाच हुषार वाटू लागला असावा.

मधली सुट्टी झाली. सगळे बाहेर पळाले. पहिलाच दिवस. माझ्या ओळखीचे कोणीच नव्हते. इकडे तिकडे फिरत बसलो. शाळेसमोर कित्येक खाऊच्या गाड्या लागल्या होत्या. चणे, शेंगदाणे, म्हातारीचे गोड गुलाबी केस, आईसफ्रूट काडी. सगळी कोळयांची मुले तिकडे गर्दी करीत होती. काहीना काही घेऊन खात होती.

एवढ्यात समोरून ती मुलगी हातात दोन आईसफ्रूट पकडून माझ्याकडे धांवत येताना दिसली. मागून सकाळचाच तिच्या बरोबरचा मुलगा आईसफ्रूट चोखत येत होता. ती माझ्याकडे येवून म्हणाली "झे! झे! " आईसफ्रूटचा हात माझ्याकडे करीत होती. मला आईसफ्रूट द्यायला पहात होती. मी नको नको म्हणत होतो. तिचा भाऊ तेवढ्यात तिथे हजर झाला. म्हणाला "झे! ती देतेय त नाय काय बोलतेस?"

"नको, घरी रागावतील." मी कसे बसे बोललो.

"आईसक्रीम वितालेल, बेगीन झे! झे! " ती असं काहीतरी बडबडत होती. अर्थ समजत होता. भाषा अगम्य वाटत होती. मी गपचुप काडी घेतली व चोखायला सुरवात केली. ती त्या मुला बरोबर बोलू लागली. भाषा समजत नव्हती पण अर्थ समजत होता. ती सांगत होती. हा हुषार आहे. सुंदर वाचतो. गणित पटकन सोडवतो. मला समजले तो तिचा मोठा भाऊ आहे. तो सहावीत आहे. मग भाऊ मला म्हणाला "हिचा अभ्यास कच्चा हाय. तिला बरोबर समजाव."

मी उडालोच. कोळयांच्या मुलांशी दोस्ती नाही करायची ही घरी मिळालेली तंबी. आणि पहिल्याच दिवशी दोन्ही मुलं ओळख करतायत ती कोळी. काय करायचं? आईसफ्रूट तर खाऊन झालय. आता नाही कसं म्हणणार? बघू, शाळेतच तिला समजावत जाऊ.

मग मी तिला विचारले "आईसफ्रूटसाठी एवढे पैसे कुठून आणलेस?"

फ्रॉकच्या खिशांत हात घालून तिने नाणी बाहेर काढली. हंसत मला म्हणाली "बघ, माकन कवरे हाय ते." (बघ माझ्याकडे केवढे आहेत ते)

दोन आण्याचे एक नाणे, एक एक आणा व बाकी सगळे पैसे होते. मी थक्क झालो. मला तर घरून कधीच पैसे मिळणार नव्हते. ही केवढी पैसेवाली आहे. तिचे भाषा समजली नव्हती पण अर्थ समजला होता. तिला, तिच्या भावाला तिचा बाबा खाऊसाठी पैसे द्यायचा. मला थोडी असूया वाटली. केंबळयाच्या घरात राहाणाऱ्यांकडे पैसे होते, पण चार मजली बिल्डिंगमधे ब्लॉक घेवून रहाणाऱ्यांच्या

मुलाकडे पैसे नाहीत. कारण म्हणे शिस्त. बाहेरचे खायचे नाही हा दंडक. इतरांकडे बघत बसायचे दुसरे काय.

कोळ्यांखेरीज आणखी चार पाचच मुले मुली वर्गात होती. पण ती वेगळीच रहात. ती या मुलांशी जास्त बोलत नसत. मला आश्चर्य वाटे. मी मात्र हळू हळू गुणा व गोमतीचा चांगला मित्र होत गेलो.

गोमती माझ्याच वयाची. टपोरे डोळे, दाट केस, गोल चेहेरा, काळा कुळकुळीत रंग, दोन वेण्या मागे फारच उंच बांधलेल्या, त्यांना कधी निळी तर कधी लाल अशा रंगीत रिबिनीचा बो बांधलेला. वेगवेगळ्या  रंगांची रेलचेल असलेला फ्रॉक तिचा काळा रंग अजून उठावदार करायचा. गोल चेहेऱ्यावर उठून दिसायचे ते गोबरे गाल. डोळे आणि चेहेरा एकदम बोलका.

सारखी चपळपणे इकडे तिकडे फिरत असे. मधल्या सुट्टीत सहावीत असलेल्या भावाच्या वर्गासमोर ही अगोदर उभी होऊन जाई. त्याला घेवून पळत खाऊच्या गाड्यांकडे जाई. मग काहीतरी खायला घेई. दरवेळी ती माझ्यासाठीही घेई. दोन दिवसातच मी तिला मधल्या सुटीत टाळू लागलो. दररोज कसे तिला खर्चात टाकायचे. मला तर पैसे कधीच मिळणार नव्हते. मी तिला कधीच काही खाऊ घेवू शकत नव्हतो. मग तिचा खाऊ दररोज कसा घ्यायचा. मी शाळेच्या मागे किंवा वर्गातच राही. ती व तिचा भाऊ मला गर्दीत शोधत. मी सगळे लांबून पाही. कित्येकदा त्यांना मी फसवले म्हणून हसू येई.

असे एक दोनदा झाल्यावर तिने एक दिवशी मधल्या सुटीत हात पकडून मला खेचायला सुरवात केली. तिच्या भाषेत ती मला चल म्हणून सांगत होती ते समजले, पण इतर जे बोलत होती ते समजत नव्हते. तिचा अवतार बघण्या सारखा होता. भयंकर रागावली होती असे वाटत होते. गपचुप तिच्याबरोबर गेलो. गेलो कसला तीच मला फरफटत, खेचत घेवून चालली होती. मी लाल लाल झालो होतो. तिचे बोलणे चालूच होते. कोळी मुले ते ऐकून माझ्याकडे पहात होती व हसत होती. गणा वर्गा बाहेरच होता. आम्ही पोचलो तर गोमतीने त्याला सांगायला सुरवात केली. मी गणाला म्हटले “अरे बाबा, ही काय बोलते ते मला नाही समजत. काय म्हणतेय ती?”

“ती म्हनतेय तो मला मदत करी नाय. परीक्षेत पास नाय झयलू ते तुझं डोचकं फोरील. आनी फुडचं आयकशील त बेशूद होवन पडशील.” सहावीतल्या गणाने मला समजावले.

“पण मी कुठे नाही म्हणालो? ही बसली तर पाहिजे मधल्या सुटीत.” मी

"तू तिच्याकनशी (तिच्याकडून) घेत नाही. त्याबगीन(म्हणून ते) तिला लागते. तू शिकवनार नाहीस. काय घेतल्या सवाय कोन काम करील?" गणा सांगत होता.

"मला नको मोबदला. तिला सांग मधल्या सुटीत वर्गातच बसू. शिकवेन मी तिला." मी

एवढे ऐकताच गोमतीचा चेहेरा उजळला. हां हां म्हणत मान डोलवू लागली. लगोलग म्हणाली आत्तापासूनच सुरू, चल वर्गात. परत माझा बावळा पकडून मला वर्गात खेचत घेऊन गेली.

मी लुकडा, रोडका पाप्याचं पितर होतो. ती सडसडीत पण सुदृढ व ताकदवाली होती. आज पहिल्यांदाच ती इतकी जवळ आली होती. रागावली होती तेव्हा सगळे लक्ष ती काय बडबडतेय त्याच्यावर होते. आता परत जाताना तिला एक सुक्यामाशांचा वास येतोय हे माहीत पडत होते. मी जरी मासे खाणारा होतो तरी हा वास असह्य होता.

"ए आंघोळ करतेस की नाही? केवढा वास येतोय माशांचा. काय सुक्या माशांवर झोपतेस काय?" मी

"घरांत म्हावरंच म्हावरं. त्याचा, नायतर काय अत्तराचा वास येल काय तुला?" ती काय बोलली ते मी शब्दांवरून पकडले. पण एक खरं, सरळ बोलणे तिला माहीतच नव्हते. शिकवणी सुरू झाली आणि लक्षात आले हिच्या डोक्यात काहीही घालणे शक्यच नाही. बाहेर एवढी चळवळी, बडबडणारी, हुशारी दाखवणारी मुलगी, अभ्यासात एवढी ढ कशी? एकादा धडा वाचून मी तिला विचारले "समजले?"

ती दोन्ही हातांवर हनुवटी ठेवून, टपोरे डोळे बारीक करून ऐकणारी मुलगी, एकदम डोके वर उचलून, डावी कडून उजवीकडे फिरवत नकार देतेय बघून मी थक्क झालो. अरे मग इतका वेळ ही कसल्या समाधीत होती?

"अग मी काय वाचले ते तरी ऐकलेस?"

तिची मान होकारार्थी हलली.

"मग तेच तर लक्षात ठेवायचे व तसेच लिहायचे. त्यात काय अवघड आहे? चल मी तुला प्रश्न देतो, तू उत्तर लिही." मी

"तूच लीव." मलाच तिने सुनवले.

“मग परीक्षेत काय करशील? कोण येणार लिहीण्यासाठी?” मी

“माज्या बाजूला बस. मी तुजं बगुनशी लिवीन.” गोमती

“आणि मास्तर बाहेर घालवेल त्याचं काय?” मी

“कनाला मास्तर बेन(बाहेर) काडील, म्हावरं पायजे का नको त्याला. चार सवाय(शीव्या) दिल्या की येईल बरोबर.” गोमती

“अग पण तुला नको का यायला अभ्यास? मग शाळेत येवून उपयोग काय?” मी

“शिकूनशी नोरा (नवरा) बरा मिलते.” गोमती.

“पण मग याला काय अर्थ? मग माझी शिकवणी तरी कशाला?” हताश होत मी बडबडलो.

“म्हावरं वळकतेस? खजुरा दाकवीशील? वाव काडशील बाजूला? लाल, पांडरी कोलांबी येल वळकावा? मुशी, बोंबील म्हायती होतील. मना(मला) येते. तुला येते? मोटा हुश्शाऱ्या सांगतेस मना. मना येतं ते तुला नाय. तुला येतं ते मना नाय. म्हणून तू काय शाणा नाय.” गोमती तडकून बोलत होती आणि माझी घाबरगुंडी उडाली होती.

मी समजून गेलो. गोमती नांवाचे रसायन मला वर्षभर नको नकोसे करणार आहे.

थोड्याच दिवसांत तिने आपली मैत्री माझ्यावर आणखी घट्ट केली. हो तिचीच मैत्री. तिने सांगायचे व मी ऐकायचे. नाहीतर तिने बोलूनच माझे तुकडे केले असते. ती एक दिवशी म्हणाली “सांचे पारा ये. बाबा बले(पडाव)वैशी घरा येल. म्हावरं शिकवितन ओळखावा तुला.”

आली का पंचाईत. घरी काय सांगून बाहेर जाणार? रात्र पडायच्च्या आत या बयेन सोडलं नाहीतर? घरी मार पडेल. नाही गेलो तर दुसऱ्या दिवशी शाळेत ही बया सोलून काढेल.

घरी आलो तर मधले काका घरी आले होते. हायसे वाटले. ते जायला परवानगी द्यायचे. मी सांगीतले “शाळेतली मुलं एकवीसाव्या रस्त्याला मैदानात क्रिकेट खेळतात. मी जात जाऊ संध्याकाळचा?”

“हो, जा पण अंधार पडायच्च्या आधी घरी येत जा. व कोणाशीही भांडण करायचे नाही. हे गाव नव्हे. मुंबई आहे ही.” काका म्हणाले.

चला एका दिवसाऐवजी कायमचीच सोय करून टाकली. गोमतीने बोलवले की तिच्याकडे व इतर वेळी क्रिकेट बघायला जायचे. घरी काही समजणारच नाही.

संध्याकाळी गोमतीकडे निघालो. तिने कसे यायचे ते सांगीतलेच होते. सगळ्या घरा मधून वाट काढत गल्ल्या मोजत मी चाललो होतो. वाटेत नारळाच्या झावळांखाली होड्या झाकलेल्या बघून मजा येत होती. घरांतून मासे बनवण्याचा, भाकऱ्या शेकण्याचा व बरोबरच एक आंबूस विचित्र वास पसरला होता. मी गल्ल्या चुकलो. मग विचारायला सुरवात केली. गोमती कुठे रहाते? गोमतीचं घर कुठचं? उत्तरे मिळत, अर्धवट समजत त्याने पुढे जाई. गणाला लोक ओळखत. गोमती विचारलं की विचारीत कोण गोमती? इकडे कोणी गोमती नाही.

एवढ्यात गोमतीचीच हाक ऐकू आली. ती मागून धांवत आली. मी दोन घरे पुढे गेलो होतो. गोमतीचा अवतार बघण्या सारखा होता. ती खास कोळयांच्या वेषात होती. खाली साडी, वर ब्लाऊज व त्यावर ओढणी घेतलेली. दहा वर्षाची असेल नसेल, साडी कसली नेसते ही? तिला तशा वेषात बघून मला हसू आले.

“काय हसतेस काय वेड्यासरका. हसशील तर बग. का हसतेस?” जरी ती तिच्या भाषेत बोलली तरी मला समजले.

“काय ध्यान दिसते आहेस! ” मी बोलून गेलो आणि तिचा पारा चढला.

“आमी असंच नेसतून. हसावचं काम नाय. नाय तं डोकं फोरीन परत हसलाव त.” गोमती त्राटीकेचा अवतार घेत बोलत होती. तिचे घर आले तरी शांत झाली नव्हती. तिची आई व गणा बाहेरच हसत उभे होते. आईने तिला चापले. भाषा समजली नाही पण अर्थ समजला. ती म्हणत होती “तूच घरा बोलावतेस आनी झगरतेस (झगडतेस).” पण आता ती बडबडली, भांडली तरी मला काही वाटत नव्हते.

तिच्या आईने चटई आंथरून मला बसायला सांगीतले, गणाही सोबत बसला. माशाचं कालवण आणि अर्धी भाकरी घेवून गोमती आली. “लवकर खा. बाबा येवाचं टाईम झगलं(झाला). जावायचं बंदरावर आपल्याला” मला हुकूम सोडत गोमती बाई बोलल्या.

"पण मला नकोय काही. रात्री जेवण जाणार नाही." मी

"नको जेवू रातचेपारा. भूक नाय लागायची बोलते. अर्ध्ये रोटीन पोट भरतें? त्याच्या बगीन असा हाय काय सुकडा." गोमतीगंगा जोरात वाहू लागली. व मी निमूटपणे भाकरीचा तुकडा तोंडात कोंबला. मनात आले ही नक्की कशी आहे. चिडण्याशिवाय हिला काय जमतं की नाही? ही सुधरणार की नाही? या विचाराबरोबरच तोंडातून निघून गेले "गणा केवढी भांडते रे ही. हिच्या नवऱ्याचे काय होईल."

"तुला काय करावचा हाय? तुला सुकड्याला पसंत करेल तिचं काय होईल ते बग. मग मला बोल, दोन फलटया(व्हली) मारशील बलीची(पडाव, होडी) तर तोंडाशी फेस येल. माज्या लग्नाचं बगीतेय. माजं नातं बांधीलय माज्या बापास्नी. मस्त पैलवान बगीलाय बापास्नी. सुकडा नाय तुज्या सारका." गोमती आता मोठ्या लाटेसारखी माझ्यावर आदळत होती. तिची आई एकदम ओरडली "ग गोमी चूप बस. कंची वार्ता कई नेतेस."

खरेच होते आईचे. आम्ही शाळकरी मित्र होतो. पण मला आश्चर्य वाटले एवढ्या लहान मुलीचे लग्न ठरलेय? काय लोक आहेत हे.

एवढ्यात एकच गोंधळ उडाला. सगळ्या बायका कलकलाट करीत काहीतरी बोलू लागल्या. गोमतीची आई गोमतीला ओरडून सांगत होती "बलेव होरी आयलं, जा! जा! "

गोमती घरातून सुसाट धांवत बाहेर आली. माझा बावळा पकडून खेचत म्हणाली "बाबा आयला, चल धांव"

माझा बावळा पकडून मला फरफटत खेचत गोमती खाडीच्या दिशेने निघाली. मला वाटले माझा हात उखडणार. खाडीची वाळू सुरू झाली. धावताना पायात गोळे येवू लागले. माझा वेग कमी झाला. गोमतीचा हात सुटला. मला हायसे झाले. मी जमेल तेवढ्याच वेगाने धावत होतो. पुढे गोमती सुसाट धावत निघाली होती. पश्चिमेच्या मावळत्या सूर्यासमोर ती आली. पदर वाऱ्याने मागे उडत, लहरत होता, केस भुरभुरत होते. एक सुंदर

छायाकृती सुर्यासमोर तयार झाली होती. एक अनमोल चित्रासारखी. सूर्याच्या मावळत्या सोनेरी किरणांना कापून धावणाऱ्या गोमतीची एक लोभस काळी छाया मनावर ठसत होती. काळ्या छायांत, काळ्या रंगात अप्रतीम सौंदर्य असते ते पहिल्यांदाच पहात होतो. अनुभवत होतो.

सुसाट धावत ती खाडीच्या पाण्यात घुसली. समोरून दोन तीन होड्या किनाऱ्याकडे येत होत्या. ही लाटांची तमा न बाळगता खाडीत शिरली होती. ही पुढे पुढे जात होती पाणी वाढत होते. मी किनाऱ्यावर पोहोचलो तर ही कमरेपेक्षाही जास्त पाण्यात पोचली होती. होडीतल्या लोकाना हात करून काहीतरी ओरडत होती. मधेच ऐकू आले “बाबा SSS …….” होडीतले लोक तर सगळे सारख्या आकृतीचेच दिसत होते. कोणत्या होडीत तिचा बाबा होता तिला कसे समजले? तिसऱ्या होडीतून एका माणसाने हात वर करून हलवला. मग गोमती वळली, मागे आली. ढोपरभर पाण्यात उभी राहिली. मागे वळून मला पाण्यात बोलवू लागली. मी ढीम हललो नाही. ती एकदा होड्यांकडे पाही मग वळून मला बोलवी. माझी पाण्यात जायची हिम्मत होत नव्हती. मी काठावरच उभा होतो. मनात भीती होती. ही माझ्याकडे येईल आणि बखोट पकडून पाण्यात नेईल.

कित्येक बाया आता टोपल्या वगैरे घेवून खाडीकडे येत होत्या. होड्या देखील किनाऱ्या जवळ आल्या होत्या. एक दोन होड्या किनाऱ्यावर ओढल्या गेल्या त्यांनी मासे वाळूवरच ओतले. त्यांच्या बायका ते निवडू लागल्या. बाजूलाच लहान लहान मुले सापासारखे लांब मासे घेवून एकमेकाशी खेळू लागली.

गोमतीच्या बाबाची होडी किनाऱ्याला लागण्या आधीच गोमती होडीत उडी मारून चढली. तिला तिच्या बाबाने वर खेचली होती. गोमती बाबाला मिठी मारून बडबडत होती. काय ते गदारोळात ऐकू येत नव्हते. त्यांनी मासे काढून वाळूवर ओतले, तसे गोमतीची आई व दोन तीन बायका ते निवडू लागल्या.

गोमती धावत माझ्याकडे आली. मला म्हणाली "चल! म्हावरं वळूक, मी मास्तर आन तू माजं आईक." मी माशांच्या ढीगाकडे गेलो. ती मला एक एक मासा उचलून त्याचे नाव सांगत होती. खाजरा, मांदली, हलवा, मुशी, बोंबील, कोलांबी, दोडी, सुरमई कितीतरी नावे काय लक्षात रहाणार. दोन चार प्रकारचे घरी यायचे त्यामुळे माहीत. बाकीचे बघीतलेले पण नाहीत.

आता दिवस मावळायला येत होता. मी म्हणालो "गोमती निघतो मी, अंधार पडला तर घरी ओरडतील."

"अरं वा आनी परीक्षा केवदं? थांब म्हावरं वळूक, मंगशी जा." गोमती

तिने एक मासा उचलून मला विचारले "नाव बोल."

ती मांजाळी बघून मी पटकन म्हणालो "मांजाळी! "

"मादली! मादली बोल" गोमती ओरडली. दुसरा मासा तिने उचलला व म्हणाली "बोल."

मला ओळखता येईना. तसं लगेच बोलली "एवरं ध्यानांन काय रही नाय?"

माझ्या शिकवणीचा ती बरोबर सूड उगवत चालली होती. चारपाच मासे दाखवून मला चितपट केल्यावर म्हणाली "नापास तू, जा घरी."

मी निघालो तो हसतच. माझी परीक्षा आठवायची आणि हसू यायचे. तिने बरोबर ठोशाला ठोसा दिला होता. मला मात्र सगळा प्रसंग वारंवार डोळ्यासमोर येत होता. घरी जेवल्यावर झोपायला गेलो तर डोळ्यासमोर खाडी, वाळू, लाटा, सूर्य आणि त्या सगळ्यांच्यावर कोळी पहेरावात, वाऱ्यावर ओढणी फलकवत धावणाऱ्या गोमतीचे छायाचित्र दिसत होते. मला चिडवत पाण्यात बोलवणारी, बेदरकार होऊन खाडीच्या पाण्यात शिरणारी, होडीत चढणारी, होडीतून उडी मारून किनाऱ्याकडे धावणारी गोमती.

कधी सूर्यासमोरची नुसती छाया तर कधी सगळ्या हावभावा सकटची खट्याळ गोमती. तर कधी माझी परीक्षा घेणारी मास्तर गोमती.

आता गोमतीशी माझी खास गट्टी झाली होती. ती देईल ते मी खात होतो. ती बसली तर शिकवत होतो. मधल्या सुट्टीत ती सांगेल ते खेळत होतो. गणा, मी व गोमती.

गोमती समुद्रा सोबत रहाणारी, खडतर आयुष्य असलेल्या कोळ्याची पोर. समुद्राच्या लाटे सारखीच. क्षणात भयानक रागाची उंची गांठणारी. क्षणात आनंदाने फेसाळणारी. कधी दोन लाटांच्या मधल्या शांत पाण्यासारखी. समुद्रा सारखीच कनवाळू. तो मासे देई. ही खाऊ देई. खाडीवरच्या वाऱ्यासारखीच चपळ. काही न जुमानता तशीच येईल त्या दिशेला वहाणारी. मुक्त नैसर्गिक जीवन जगणारी. सुधारलेल्या जगाची बंधने नसलेली.

आता सहामाही परीक्षा सुरू होणार होती. गोमती कशी पास होणार याचेच मला कोडे होते. सहामाहीच्या परीक्षेला ही सरळ येवून माझ्या शेजारी बसली. मी पाटीवर उत्तर लिहले की ही पाटीवरचे पाहून लिहू लागली. मास्तर सर्व पहात होते. पण काहीही बोलत नव्हते. मधे एकदा तर तिने कहरच केला. मी जरा बाजूला सरकलो तर जोरात ओरडली "मला लीवायचंय पाटी इकडे धर." मी हबकलो. पण मास्तर उठून बाहेर गेले. खांकरून, घसा साफ करायचे नाटक करून परत आले. मी समजलो मास्तरांची कॉपी करायला संमती आहे. झाले सगळी परीक्षा गोमतीने माझ्या पाटीवरून दिली. वर मलाच म्हणाली "काय पण नाय केलं मास्तरने, उगीच भित्रा हायस तू. बा बरोबर होरीवर जा भीती जायल तुजी." मला राग आला. माझीच कॉपी करून वर मलाच सुनवून दाखवते आहे.

निकाल लागला गोमतीचा सहावा नंबर आला होता. ती नाचतच होती. माझ्याकडे हसत हसत बघून हात करीत होती. तिचा एवढा वरचा नंबर कधीच आला नव्हता. शाळा सुटताना मला म्हणाली "बग, मना येडं समजतेस. नंबर काडला का नाय मीनी! "

"हो, पण कसा? माझे बघूनच लिहीलेस ना?" मी

"मंग काय जायलं? बगुन लिवायला अक्कल नको?" गोमती

मनात आले बरोबर आहे. माझे सगळेच गिरवले असतेन तर माझ्या सारखीच पहिली आली असती. पण बोललो असतो तर माझा बुकलून रगडा केला असता तिने.

दुसऱ्या दिवशी मधल्या सुट्टीत तिने शेंगदाणे, म्हातारीचे केस दोन्ही खायला घातले. मी हळूच कळ काढली "काय ग! मास्तरच्या घरी कुठलं म्हावरं पोचवलंस?"

"ते आयाचं काम. ती परीक्षेनंतरच देवूशीच आली. चांगले दोन सरंगे नी मांदली घरा ठेवूनशी आली. आणि आज तुला पन घरा सादविलंय(बोलावलंय). देईल बग तुला पन." अगदी निरागसपणे गोमती हिशोब देत होती.

मी मात्र टरकलो. खरोखरच तिने मासे दिले तर घरी कसे नेणार? कोळयांच्या मुलांबरोबरची दोस्ती उघडी पडणार. नाही म्हटलं तर ही बया माझी पिटाई करेल. कदाचित घरी येवून घरच्यानाही दम मारून मासे घ्यायला लावेल. मग माझे काय होईल? मी पटकन म्हणालो "मला नकोत मासे. घरी ओरडतील."

ती हसत सुटली. आवरता आवरेना एवढे हसू . काय झाले तेच समजेना. मग गणाला म्हणाली, "किती भित्र भागु हाय रे . फुकाचे मासे मिळते त कोन रागवल? घाबरून घाबरून काहीच नाय लागे याच्या आंगाला. म्हनूनच सुकडा झालाय."

मला राग येत होता हिला काय सांगणार? घरी नुसते समजले असते की मी कोळयांच्या घरी जातो. खेळतो तर चांगलाच चोप बसला असता. वर हिच्याशी बोलणे सोडायला लागले असते. माझा रागीट, विचारात गेलेला चेहेरा बघून तिला काय वाटले देव जाणे. नरम पडत बोलू लागली "मी सांगल आईला नको देव माशे. पण घरला ये सांच्ये. माशाचं कालवण नी भाकरी खाशील ना?" पहिल्यांदा फेसाळत, जोरात अंगावर आलेली लाट आता शांत होत माघार घेत होती. नाहीतरी गोमती समुद्राच्या लाटां सारखीच होती. कधी रागाने महाकाय रूप घेवून अंगावर कोसळणारी, तर कधी हसणारी, सुंदर फेसाळणाऱ्या

छोट्या लाटे सारखी. कधी दोन लाटांमधल्या ओढी सारखी प्रेमळ ओढ लावणारी. तर कधी ओहोटीच्या शांतपणा सारखी डोळे बारीक करून धडा ऐकणारी. कधी धसमुसळी होवून जोरदार परतीच्या लाटे सारखी खेचत नेणारी, अशी क्षणा क्षणाला बदलणारी.

संध्याकाळी तिच्या घरी गेलो. ही गायब होती. गणा म्हणाला "तू येनार म्हनून जालं मागाय गेलीय." मला समजले नाही की माझा आणि जाळयाचा काय संबंध. मी गणाला विचारले "जाळे आणि ते माझ्यासाठी कशाला रे बाबा? मी काय करणार त्याचे?"

"अरे तू विचारलं शाळेन, ते जालं टाकूनशी म्हावरं कसं पकडीताल. आता तुला जालं टाकाव सांगीन बग. मासं पागाव लावील तुला." गण्याने सांगीतले आणि माझी पांचावर धारण बसली. ही आता मला खाडीच्या पाण्यात उतरवणार. जाळं टाकायला शिकवणार. मासे नाही मिळाले तर माझी टेर घेणार. पोटात भला मोठा गोळा आला होता.

तिच्या आईने मला व गणाला भाकरी व मासे आणून दिले. सुंदर वास येत होता पण चवच लागेना. लवकर खाऊन बया यायच्या अगोदर पळून जायचे ठरवले. जरा बकाबक खाऊ लागलो. ठसका लागला. आई पाणी घेवून आली पण ठसका विरायच्या आत गोमती एक जाळे घेवून पुढ्यात उभी ठाकली.

"खावूनशी जालं की चल माज्यापाठीशी, मासे पागावायला शिकवितन." गोमतीने माझ्यावर बॉंब टाकला.

"आज नको! मला सर्दी आहे. पाण्यात गेलो तर वाढेल." मी सुचलेले कारण ठोकून दिले.

"नाक सुकं नी शेंबूड पन नाय. कुटे पोटात जालीय सर्दी? आज जालं आणलंय पागायचं. उद्या नाय मिलायचं" गोमतीने ऑर्डर सोडली. एवढ्यात तिचा बाबा बाहेर आला. म्हणाला "झिपरे! जालं का आणलस? कुठे पागणार? तूजी ऊंची किती? कशी पागणार?"

बाबा अगदी आमच्या जवळ येवून बोलत होता. मला तो आंबूस वास दरवळून आला. कसला तो समजला नाही. त्याने मग गोमतीला जवळ घेतले. म्हणाला “झिपरे उद्या भरतीला बलेव(होडी) नेवाचा हाय. लयच म्हावरं हानीन. तू नको जाव.”

“बाबा, सरा पियालास, लय वास येते, सोड मला.” गोमती झटपटत त्याच्या तावडीतून सुटली. तिचा बाबा होहो करीत हंसत होता.

“सरा म्हणजे काय रे?” मी हळूच गणाला विचारले.

गणाने हाताचा आंगठा तोंडाकडे नेत खुणेनेच सांगीतले. मला काही समजले नाही. पण आंबूस वास सऱ्याचा एवढेच लक्षात आले. सरा म्हणजे हातभट्टीची दारू. सगळेच कोळी ती बनवत हे नंतर माहीत पडले.

गोमतीची आई बाहेर आली व म्हणाली “म्हावरा नाय नेतं? काय बाटशील?”

मी म्हटले “घरी बोलतील. ते विकत आणतात.”

“रेलेलं(शिळे) खाशील का ताजं?” गोमतीची आई. मी गप्प बसलो. कसं सांगणार, कोळ्यांच्या मुलात जायला मनाई आहे ते.

असेच दिवस चालले होते. गोमतीने एकदोनदा गणाच्या मदतीने मला जाळे टाकून मासे पागायची शिकवणी दिली. वर शेरापण मारला “तुला नाय जालं टाकीते. फुलूनशी गोल परलं पायजे. गनाचं बगुनशी टाक.”

आता माझी शिकवणी कमी झाली होती. उलट तिचीच शिकवणी वाढली होती. वार्षीक परीक्षा जवळ आली. गोमतीकडे जायचे हळू हळू बंद झाले. परीक्षेत गोमतीने माझे पाहून कॉपी केली. पांचव्या नंबरने पास झाली. मला मासे भाकरी खायला मिळाली. मग मी तिला सांगीतले “मी गावीच जाणार. परत येणार नाही. तिकडेच शिकणार. इकडे बरोबर नाही.”

"का जातेस तू? नको जाव. मी कशी पास होन?" एवढे बोलत गोमतीने रडायला सुरवात केली. गणाही मुसमुसु लागला. गोमतीची आई बाहेर आली.

"आया तू सांग याला, तू नको जाव." मग ती जोरजोरात हुंदके देत रडू लागली.

आई म्हणत होती "मोटे सांगतीन तंई(तिथे) जाल तो. तो काय करील? चुप, चुप हो बाय" हे बोलतानाच आई पण रडू लागली. मी कावराबावरा होऊन सगळं पहात होतो.

किती सरळ सगळं दाखवू शकत होते हे लोक. आमच्याकडे असा जिव्हाळा दाखवणंच नव्हतं. उथळपणा म्हणायचे त्याला. मनावर ही संध्याकाळ चिरत, कोरत गेली. मी येतो म्हणून उठलो तर तिघेही कोळीवाड्याच्या वेशीपर्यंत पोचवायला आले. ओल्या डोळ्यांनी निरोप द्यायला.

"कोळी लोकाच्या मुलांशी मैत्री नाही करायची." या नियमाला कोळीवाड्यातल्या आंबूस वासापेक्षाही जास्त घाणेरडा वास येवू लागला. का नको ते सांगतात हे मोठे लोक? हे लोक केवढे निर्भेळ प्रेम देतात.

गावी परत आलो. शाळा, जुने मित्र यात रमलो. गोमती, गणा हळू हळू आठवणीतून विरून गेले.

वर्षे उलटली. शिक्षण पुरे झाले. गृहस्थ झालो. चार पैसे खिशात खुळखुळू लागले व मग एक दिवशी ट्रिपला गेलो. समुद्र किनारा, सुंदर बीच, समुद्रात पोहायला उतरलो. लाटा अंगावर घेत होतो. एक मोठ्ठी लाट आली. फेसाळत अंगावर कोसळली, फुटली. परत जाताना मला खेचत फरपटत आत नेऊ लागली. कसाबसा उभा राहीलो. आता ती लाट लहान झाली होती. परत जाताना फेसाळत होती. एकदम गोमती आठवली. एका लाटेच्या तडाख्याने ती नजरेसमोर आली. जणू विचारत होती "सुकड्या! समुद्रात

पोहोतोयस? बराच शूर झालास रे. आणि मला विसरलायस? बघ कसे खेचले तुला.” हसरी खट्याळ गोमती मला चिडवत होती.

मला खजील वाटले. कसा विसरलो? लहानपणची जिव्हाळ्याची गोमती कुठे असेल? कशी असेल गोमती? भेटेल का परत. परत येताना मुंबईत रहाणार होतोच.

वेळ काढून खारला गेलो २१वा रस्ता आता ओळखू येत नव्हता. वराडकरांची बिल्डिंगही दिसेना. कोळीवाड्यातल्या झोपड्या खूपच कमी झाल्या होत्या. सगळीकडे मोठमोठाल्या फ्लॅटच्या बिल्डिंग झाल्या होत्या. कोळयांबरोबर दोस्ती न करायचा उपदेश करणाऱ्यानी त्यांनाच परागंदा केले होते. सोऱ्याच्या आंबूस वासापेक्षा उद्धट श्रीमंतीची प्रजा सगळीकडे पसरली होती.

मला त्यात गोमती, गणा व त्यांचे आईबाबा काय सापडणार! चार ठिकाणी झोपड्यात विचारून देखील उपयोग झाला नाही. मग परत फिरलो.

आता जेव्हा जेव्हा समुद्रावर जातो. तेव्हा लाट अंगावर येते ती गोमतीची आठवण देऊन जाते. तिच्या सारखीच परत जाताना फरफटत खेचते. परत मोठी होऊन येते. अंगावर कोसळते. तेव्हा वाटते गोमती, समुद्रपुत्री लाटेतच भेटणार, २१व्या रस्त्यावर नाही.

********

# पाऊ



डोंगरातून सूर्य वर येत होता व बामणांचा गण्या भटवाडीकडे धावत सुटला होता, त्याच्या बाबानी त्याला गोपाळभटजीना बोलावून आणायला सांगीतले होते. दगडाळ पाऊलवाटेने गण्या तोंडातून मोटरीचा आवाज काढीत व समोर हातांनी हवेतच स्टिरींग असल्यासारखे करीत धावत होता.

बामणांचे घर व भटवाडीच्यामधे झाडा झुडपांचे जंगल होते. गुराख्यांनी त्या जंगलात किती तरी पायवाटांचे चक्रव्यूह तयार केले होते. त्या पायवाटांच्या गुंतावळ्यातून भटवाडीची वाट लक्षात ठेवावी लागत होती. गण्याला ती बरोबर लक्षात राहिली होती. कारण “पाऊ”. गोपाळ भटजींची लेक पाऊ म्हणजे पार्वती.

गण्याचे आजोबा वारले होते. त्यांच्या श्राध्दाच्या वेळी गण्याच्या वडीलानी गोपाळ भटजी व त्यांच्या बायकोला ब्राह्मण सवाशीण म्हणून बोलावले होते. बरोबर पाऊ पण आली होती.

कोंकणात हे भटजी, बामणांच्या घरचे पण पाणी पीत नसत. मग जेवण तरी कसे जेवणार? त्यातून एक रीत पडली होती. जे भटजी श्राद्धाला यायचे ते घरच्या बायांना घेऊनच यायचे. मग त्या बाया स्वयंपाक घरातली सगळी भांडी घासून घ्यायच्या. विहिरीवरून पाणी आणायच्या. मग जेवण करायच्या. सगळे सोवळ्यात चालायचे.

श्राध्दाला गोपाळ भटजी आले ते फक्त बायकोला व मुलीला घेऊन. मुलगी म्हणजे "पाऊ" फक्त पांच वर्षाची. ती कसली मदत करणार आईला? पण तिची आई म्हणजे कामाला वाघ होती. आल्याबरोबर पाण्याची आणि जेवणाची भांडी घासून तिने लख्ख केली. दोन कळशा घेऊन विहीरीवरून पाणी आणले व घासलेले हांडे भरून टाकले. चूल पेटवून जेवणाला सुरवातही केली. तिला चुलीसाठी लागणारी लाकडे, शेणी गण्याची मोठी बहीण आणून देत होती. पण तिला सुद्धा आंधोळ करून सोवळे नेसून मगच पाऊच्या आईने मदतीला घेतले होते. पाऊ इकडे तिकडे न फिरता चुलीच्या बाजूला बसून होती. गण्याची बहीण तिला म्हणाली "जा गो पाऊ झोपाळ्यावर बस जा. इथे धगीकडे बसून तापशील, कंटाळशील. खेळ जा बाहेर."

"नको मी इथेच बसते. मज नाही आवडत कोंबड्या. तुमच्या घरात सगळीकडे कोंबड्या फिरतात." पाऊ.

गण्या हे ऐकून आत आला व पाऊला म्हणाला "चल परसात फिरू. फुले आहेत जास्वंदीला लागलेली काढू चल."

"आई जाऊ मी?" पाऊ.

"जा! पण त्याला शिवलीस तर मजकडे येवून मज शिवू नकोस. ओवळी झालीस तर स्नान करावे लागेल तूस." पाऊची आई म्हणाली. पडत्या फळाची आज्ञा घेऊन पाऊ बाहेर पळत सुटली. गण्याही धावत सुटला.

परसात जास्वंदी डंवरल्या होत्या. बाजूच्या चिखल भरलेल्या तळ्यात पांढरी कमळे तरारून आली होती. एका बाजूला कृष्णकमळाचा वेल जांभळ्या जांभळ्या फुलानी भरून गेला होता. पाणथळ जमिनीवर सोनटक्याची फुले सुगंध पसरवीत डोलत होती. हे सगळे पहाताच पाऊ ओरडली "अरे केवढी ही फुले मज काढून देतोस का रे थोडी?"

गण्याला एकदम स्फुरण चढले. चिखलाच्या तळयात शिरून त्याने चार पांच कमळे काढली, बाजुच्या वेलावरची कृष्णकमळे काढली, सोनटक्याच्या जंगलात शिरून सोनटक्याची पांढरी सुगंधी फुले काढली व पाऊ कडे देताना त्याला कृतकृत्य झाल्यासारखे वाटू लागले. पाऊ जरीकाठी खणाच्या कापडाची किरमीजी रंगाची परकर चोळी घालून आली होती. तिच्या गोऱ्या रंगाला तो किरमिजी रंग अजून उठाव आणीत होता. फुले पाहून पाऊचा चेहेरा खुलून आला. पण एवढी सगळी फुले कशी पकडायची समजेना. तिने परकराची खोळ तयार केली आणि गण्याने सगळी फुले त्या खोळीत भरली. फुले परकरात ठेवताना मुद्दामच त्याने पाऊच्या हाताला स्पर्श केला व एकदम म्हणाला

“पाऊ चुकून शिवलो मी तुला. ओवळी झालीस तू. आता?”

“ए! मज नाही स्नान करायचे. बोलू नकोस तू कुणास. नाहीतर ओवळी झाले म्हणून आई स्नान करायास लावेल. थंड पाण्याने स्नान मज नाही आवडत” पाऊ.

पाऊ बोलताना गण्या तिला पहात होता. गोरापान रंग, धारदार नाक, काळे भोर गडद केस, त्यांचा चोपून विंचरून मागे बांधलेला बुचडयासारखा आंबाडा, त्यातून चुकारपणे निसटलेल्या व चेहेऱ्यावर भुरभरणाऱ्या केसांच्या काही बटा, निळेशार बोलके डोळे, हसताना डाव्या गालावर पडणारी खळी, फुले घेताना दिसलेली लाल चुटुक निमुळती बोटे, परकराची खोळ केल्यावर दिसणारे हरीणीसारखे निमुळते पाय, लाल लाल खोटा व कोरलेली बोटे. हे सगळे पहाताना गण्याचे लक्ष स्वत:कडे गेले. तपकीरी काळपट रंग, उन्हात हुड हुड करीत फिरल्यामुळे रापलेला चेहेरा व खप्पड गाल, किडकिडीत शरीरयष्टी त्याला पाऊ कडे बघता बघता वाटले, ही एवढी सुंदर, मोहक कशी? आपण का नाही असे? तिच्यासारखेच गोरेपान सुबक, बांधेसूद, मोहक?

पाऊ असेल पांच सहा वर्षाची पण बाळाचा गोंडसपणा अजून तिच्यात दिसत होता, तो तिने सांडलाच नव्हता. आपण मात्र शेतात, नदीत, आंब्यांच्या बागात फिरून काळवंडून, रापून गेलो. असे कसे? ही काय उन्हात जातच नाही काय? मी फार तर दोन अडीच वर्षांनी मोठा पण फरक केवढा.

गण्या मनात हिरमुसला. पण तेवढयात पाऊ म्हणाली “तुमच्या घरी एवढी फुलझाडे कोणी लावली? आमच्या घरी परसात जास्वंदी, गुलाब व शेवंती आहेत. केव्हा केव्हा आई झेंडूचे बी पेरते. आम्हास एवढी फुले नाही मिळत. आणि तुमचे घर परसू केवढे मोठे आहे! आमचे फार लहान आहे.”

गण्याला फार बरे वाटले. आपलेही काही तरी हिला आवडले याचे समाधान वाटले. तो म्हणाला “बघ आमच्या  परसात किती झाडे आहेत ते. आंबे, फणस तर सगळयांच्याच घरी असतात, पण आमच्या परसात काजू, जांभूळ, चिंचा, आवळे, बांबू, सगळेच काही आहे. पहायचे आहे? चल जाऊ.”

“नको आई ओरडेल, काटाबीटा लागेल, मज फार दुखते हो काटा लागला तर.” पाऊ

“हो? अग मला शंभरदा काटा लागलाय. मी सरळ खेचून काढतो. आत तुटलाच तर दोन दिवसानी सुईने कोतरतो व पिळतो. पाणी आणि थोड्याशा रक्ता बरोबर तुटलेला काटा बाहेर येतो. मग बिब्बा गरम करून त्याचा डिंक भरतो जखमेत. दोन दिवसांत सर्व काही बरे होते.” गण्या एकाद्या शूरवीराच्या आवेशात आपली फुशारकी मारीत होता.

पाऊचे अगोदरच मोठे असलेले डोळे आणखी मोठे झाले. ती आश्चर्याने त्याच्या कडे पहात म्हणाली “तूच काढतोस काटा? तूच कापतोस? तूच बिब्बा घालतोस? घाबरत नाहीस? दुखल्यावर रडू येत नाही तूस?”

तिचे ते आश्चर्य बघून गण्याला फार बरे वाटले. मनात आले, तिच्याकडे जे आहे ते आपल्याकडे नाही, आपल्याकडे जे आहे ते तिच्याकडे नाही, फिट्टंफाट.

बोलत फिरता फिरता गण्या व पाऊ मागे जांभळाच्या झाडाकडे आली. एक खार जांभळाच्या थडावर सैरभैर होऊन चिकचिकत होती. थांबतच नव्हती. तिचा चिकाचिकाट ऐकताच गण्या सावध झाला. बारकाईने जांभळाच्या मुळाकडे निरखून बघू लागला. एका हाताने त्याने पाऊचा हात घट्ट पकडला व दुसऱ्या हाताने तोंडावर बोट ठेवून तिला गप्प रहाण्याची खूण केली. पाऊ बावरून त्याच्याकडे पाहू लागली.

त्याला समजले खार का ओरडत बसलीय ते. जांभळाच्या मुळाकडे एका सापाने त्या खारीच्या साथीदाराला पकडून गिळायला सुरवात केली होती. तो पाऊला हळू आवाजात म्हणाला “ते बघ! खार का ओरडतेय समजले?”

“काय आहे? मज नाही समजले.” पाऊ.

“तो बघ साप कसा दुसऱ्या खारीचा फडशा पाडतोय ते.”

“ए! चल पळूया, मज भिती वाटते सापाची.” पाऊ

"काय भितेस? लांब आहे साप. आणि सापावर आपला पाय पडला व त्याला दुखावले तरच चावतो तो. असाच नाही उगाच चावत. माझ्या बाबानीच सांगीतलेय हे मला. बघ, मजा बघ. असली मजा बघायला नाही मिळणार." गण्या.

आता पाऊची घाबरून गोळी झाली होती. रडवेली होत ती म्हणाली "सोड ना माझा हात. मज आईकडे जायचंय मज भीती वाटते रे सापाची, सोड ना हात." पाऊ आपला हात सोडवायचा आटोकाट प्रयत्न करीत होती. पण गण्याने पक्का पकडून ठेवला होता. तो म्हणाला "अग काय घाबरतेस मी आहे ना? बघ तो साप आता तिला पुरा गिळेल. बघ कसा तोंडाचा मोठ्ठा आ केलाय तो." हे ऐकून पाऊला सापाचा "आ" बघावासा वाटला. दोघेही सापाचे हे जेवण मन लावून बघत बसले. सापाने खारीला पुरे गिळले तसे तोंडा मागचा माग टमटमीत फुगला. सापाने मग विचित्र आळोखे पिळोखे घेतले तसा तो फुगलेला भाग खाली खाली सरकू लागला. मग साप हळू हळू सरपटत झाडापासून दूर जाऊ लागला. पाना पाचोळ्यात गायब झाला.

गण्या म्हणाला "बघ काय मजा आली. उगाच घाबरत होतीस" पाऊचा चेहेरा काहीतरी अप्रुप पाहिल्याच्या आनंदाने उजळला होता. गण्याचे कौतुक वाटत होते. एवढ्या लहान मुलाला काट्याने दुखत नाही, सापाची भीती वाटत नाही, तळ्यात शिरून कमळे काढतो. हे सगळेच तिला नवलाईचे होते. एवढा लहान मुलगा एवढा शूर कसा? तिच्या चेहेऱ्यावर गण्याचे कौतुक भरभरून उमटले आणि गण्या फुशारला. आतून कोणीतरी "गण्या s..s ए गण्या s..s" करून हांक मारतेय असे वाटले आणि दोघेही घराकडे पळत सुटले. पाऊ परकराचा खोळा सांभाळत धावत होती. आणि गणा धावता धावता थांबून तिला साथ करीत होता. घरात घुसून पाऊ तडक स्वयंपाकघरात शिरली परकराचा सोगा सोडून तिने सगळी फुले जमिनीवर पसरवली आणि एकदम बोलू लागली, "आई! आई! ऐक ना! "

"अगो तू पाय धुतलेस का? सगळे भटकून आलीस. इथे सोवळे आहे माहीत आहे ना तूस?" पाऊची आई तिला ओरडत होती.

"आई! पण ऐक ना! अग! आम्ही साप बघितला. सापाने खार पकडली होती व गिळत होता. सबंध खार गिळताना बघितली आम्ही." पाऊ धपापत सांगत होती.

"अगो कशाला गेलीस गो रानात! साप चावायला आला असता तर?" तिची आई चिंतेने विचारू लागली. "साप असा नाही चावत. त्याच्यावर पाय पडला तरच चावतो. गण्याने सांगीतले मला.

आणि आम्ही तो खारीला पुरा गिळून निघून जाईपर्यंत पहात होतो. तो मग पानात निघून गेला. खरंच साप असाच चावत नाही.'' पाऊ आता नवीन मिळालेले ज्ञान आईला देत होती.

“अग्गो बाई! मला सांगतेस होय? परत असले काही करायला जाऊ नकोस. सापाला जाग लागली असती तुमची तर आला असता अंगावर आणि ही फुले कशाला तोडलीस एवढी?'' आई.

“गण्यानेच दिली मला तोडून. आई ही सोनटक्याची फुले घाल ना माझ्या आंबड्यात, छान आहेत बघ.'' पाऊ. ती दोन फुले आंबड्यात माळत होती तेवढ्यात गण्या आत आला. त्याला बघताच बहिणीने त्याला हटकले “काय रे! हिला कुठे पाना पातेऱ्यात घेवून गेलास? आणि साप चावला असता तर?''

“मला पाणी दे प्यायला.'' गण्या बहिणीकडे दुर्लक्ष करीत बोलला.

“पाऊ चल ग तुला अजून मजा दाखवतो'' असे म्हणत तो बाहेर पडला.

“अरे घरा बाहेर नेऊ नको तिला. घरातच खेळा'' पाऊची आई ओरडून सांगत होती.

आता गण्याने झोपाळ्यावर बसायचे ठरवले. दोघेही झोका घेत छोट्या कविता म्हणू लागले. गण्याला माहीत पडले की पाऊ फार छान कविता म्हणते. आवाज गोड होता पण सगळ्या कविता भजना सारख्या देव भक्तीच्या होत्या. पाऊ गात होती आणि गण्या मुग्ध होऊन ऐकत होता. एवढ्यात समोरच्या बाजुला असलेल्या टोपल्यांच्या ढिगाऱ्यावून एक कोंबडी जोरात कॉक्... कॉक्.... करीत उडाली व ओटीवर आली. तिचे ओरडणे चालूच होते. गण्याने एकदम झोपाळा थांबवला, म्हणाला “कोंबडीने अंडे घातले. आणतो मी.''

“अरे थांब कोंबडी चावेल.'' घाबऱ्या आवाजात पाऊ सांगत होती. गण्या तोपर्यंत पळत पळत त्या टोपल्यांच्या ढिगाऱ्यात घुसला होता. दोन चार टोपल्या उलटया केल्यावर त्याला कोंबडीने घातलेले अंडे मिळाले. ते तो नाचवीतच घेऊन आला. पाऊ विचारत होती “काय करणार याचे?''

“काय म्हणजे सहा सात झाली की उकडून नाहीतर कालवण करून खाणार.''

“शी! घाणेरडाच आहेस, असले काही खाऊ नये. देव रागावतो आपल्यावर'' पाऊ समजावू लागली. एवढ्यात घरातून कोणीतरी येवून त्याच्या हातातले अंडे घेतले व वर दम मारला. घरात भटजी आहेत आणि अंडे काय मिरवतोस असे बडबडत तो निघून गेला. गण्याला समजेना भटजी असले

तर काय झाले. अंडे का नाही दाखवायचे? त्याने सरळ पाऊला विचारले "तुमच्या घरी कोंबड्या आहेत की नाहीत?"

"नाही त्या फार घाण करतात." पाऊ म्हणाली.

"मग तुम्हाला अंडी कुठून मिळतात?" गण्या

"मी नाही कधी खाल्ली. आमच्या घरी नसते असले काही." पाऊ.

"मग त्यांची पिल्लेही नसतील? फार छान असतात ग पिल्ले." गण्या

"हो? मग मला दाखव ना, मजा येईल" पाऊ.

"तू इथेच थांब मी आलोच" म्हणत गण्या बाहेर पळाला. थोड्या वेळाने एक कोंबडी व तिची तीन चार दिवसांची पिल्ले यांना हळू हळू हाकीत पडवीवर घेऊन आला. ती पिल्ले बघताच पाऊ एकदम खूष झाली. धावत येवून ती पिल्ले पकडायला पाहू लागली. पिल्ले पळत होती. गण्यामधे पडला व तिला म्हणाला "थांब मी देतो पकडून, नाहीतर कोंबडी येईल तुझ्या अंगावर." गण्याने कोंबडीचे लक्ष नाही पाहून एक पिल्लू उचलले आणि झोपाळ्याकडे पळाला. मागोमाग पाऊ पण आली. तिच्या हातात पिल्लू देताना म्हणाला "सांभाळ पिल्लाचे पाय टोचले तर घाबरून टाकून देवू नको त्याला."

"आई ग! किती छान कापसासारखे आहे रे! पण पायाची नखे टोचतायत." पाऊ

"मग दे माझ्याकडे." गण्या.

"नको असू दे माझ्याकडे आईला दाखवून येवू?" पाऊ.

"नको तिकडे सोवळे आहे. आई ओरडेल तुला" गण्या.

"पण एवढ्या कोंबडया झाल्या तर काय करता त्यांचे?" पाऊ.

"काय म्हणजे? कापून मस्त शिजवून खातो. मसालेदार मेजवानी असते ती." गण्या.

"शी..s..s किती घाण! कोंबडी खातात का कुणी? बॉक् कसे रे तुम्ही?" पाऊ.

"म्हणजे? तू कधी कोंबडी खाल्लीसच नाहीस? अग फार छान लागते." गण्या.

"हो? मग आमची आई का नाही करीत?" पाऊ.

"मला काय माहीत तू विचार आईला." गण्या

मागे उभे राहून गण्याची बहीण हे सगळे ऐकत होती. तिने एक धपाटा गण्याला घातला आणि म्हणाली "अरे नाय ते शिकवू नको तिला. भटजी ते. अंडी, कोंबडी खात नाहीत." गण्याला पाऊच्यासमोर बहीणीने घातलेला धपाटा आवडला नाही, तो हिरमुसला. त्याच्या बहिणीने पाऊ कडून कोंबडीचे पिल्लू घेतले व कोंबडीकडे सोडून दिले. तिला घेऊन ती घरांत गेली व म्हणाली "अहो हिने कोंबडीचे पिल्लू पकडले. तिला आंघोळ घालावी लागेल. मी घालू?"

"काय गो बाई उद्योग करून ठेवलास? दुसरे कपडेही नाही आणलेत. आता काय करू? घाला तिला कपड्यावरूनच आंघोळ आणि करा उन्हात उभी. वाळेल थोड्या वेळात" पाऊची आई.

गण्याच्या बहिणीने मग पाऊला न्हाणी घरात नेले ती ओरडत होती "थंड पाणी नको थंडी वाजते मला." मग गण्या टाळ्या पिटत तिला चिडवू लागला. पण गण्याच्या बहिणीने तिला गरम पाण्याने आंघोळ घातली. आंघोळ कसली चार तांबे डोक्यावर उपडी केले व तिला खळ्यात नेऊन उन्हात उभी केली. ती पुरती ओली देखील झाली नव्हती. गण्याला विचार आला कोबंडीचे पिल्लू पकडले तर पाऊ ओवळी झाली. आता चार तांबे पाणी ओतले तर सोवळी कशी झाली? काय तरी करतात हे मोठे लोक. कोबंडी, कुत्रा हे सगळे प्राणी देवाने बनवलेत, त्यांना शिवले तर काय ओवळे व्हायला होते? आता पाऊला थंडी वाजत होती ती हुडहुडायला लागली ती खळ्यात उन्हात उभी व गण्या पडवीत सावलीत उकीवडा बसून तिच्याकडे पहात होता. ती हुडहुडायला लागली आणि गण्या ओरडू लागला "ए थंडी वाजतेय? केवढी हुडहुडतेस हींव भरल्या सारखी? उन्हात फिर गोल गोल." गण्याचा आवाज ऐकून तिची आई बाहेर आली. आपल्या पदराने तिने पाऊला पुसले डोके केस खसाखसा पुसले. आता सोवळी झाली होती. त्यामुळे तिच्या आईचे सोवळे बिघडणार नव्हते, गण्याला सगळ्याचीच मजा वाटत होती. सोवळे काय! ओवळे काय! सगळे निरर्थक होते. दोघेही लहान होते. एकत्र खेळणारच. त्यांना ह्या सोवळ्या ओवळ्यात कशाला बांधतात हे मोठे लोक, वेडेच आहेत.

आता गोपाळ भटजी जोरजोरात मंत्र म्हणताना ऐकू येत होते. आवाज बाहेरपर्यंत येवू लागला तसे गण्या समजला, श्राद्धाची सांगता होत आली. एवढ्यात वडिलांची हाक ऐकू आली. आणि गण्या घरात धावत सुटला, पूजेच्या जागेवर एका पानावर भाताचे तीन चार गोल लाडू करून ठेवले होते. वर कसल्यातरी गवताच्या काड्या ठेवल्या होत्या. फुलेही घातली होती. त्या लाडवांवर वरण, आमटी

काहीच घातले नव्हते, पानावर भाजी चटणी काहीच नव्हते. हे असले कसले पान लावले? गण्याला काहीच उमजेना. तो वडिलानी सांगीतल्याप्रमाणे त्या पानांच्या पाया पडला व बाजूला उभा राहीला. बाजूला एका पत्रावळीवर सर्व जेवण वाढलेले दिसले, भाताची मूद, भाजी, चटणी, वडे, खीर सगळे वाढले होते. भटजींनी सांगीतल्यावर वडील ते पान उचलून बाहेर निघाले. मागोमाग गण्या देखील निघाला. बाहेर खळ्यात पाऊ अजूनही तापत होती. पण ती आता पांच छोटे दगड गोटे घेऊन पची खेळत बसली होती. ते बघताच गण्या तिच्याकडे धावत सुटला. पाऊ ओरडू लागली ‘‘मला नको शिवू! मला नको शिवू! ’’ गण्याच्या पाठीत एक धपाटा घालून त्याच्या बहिणीने त्याला परत वडलांकडे पिटाळले. ‘‘जा, पूजेचा प्रसाद कावळ्याला दाखवेपर्यंत कुठेही जाऊ नको बाबा, बरोबर रहा.’’ असा दम मारला.

त्याच्या बाबानी ते पत्रावळीवरचे जेवण घराच्या छपरावर ठेवले व एक दोनदा कावळ्याला ‘‘आ.. आ..’’ करून बोलावले. मग ते घरात जायला निघाले. गण्याला काहीच समजले नाही. कावळ्याला आज का जेवायला घातले? तेही सर्वांच्या अगोदर? पण कावळे तर आलेच नाहीत. मग बाबा थांबले का नाहीत? आपल्यालाही का परत घरात बोलावले? खूपच कोडी. पण गण्याला आता जाणवत होते पोटात कडकडून भूक लागलीय. घरात गेल्या गेल्या गण्या बहीणीला म्हणाला ‘‘भूक लागलीय काहीतरी खायला देना. नाहीतर जेवायलाच वाढ.’’ बहीण म्हणाली ‘‘थांब थोडा भटजी जेवल्याशिवाय कुठे जेवतोस?’’

थोड्याच वेळात भटजी, पाऊ आणि पाऊची आई जेवायला बसली त्यांचे अर्धे जेवण झाले असेल तेव्हा बहिणीने गण्याचे आणि वडिलांचे पान वाढले. तोपर्यंत गण्या पाऊ कशी जेवते तेच पहात होता. ती थोडा थोडा वड्याचा तुकडा तोडून खिरीत बुडवत होती व नाजूकपणे तोंडात घालून हळू हळू चावत होती. गण्याला एकदम हसू आले. त्याला त्याची म्हैस कशी रवंथ करते ते डोळ्यासमोर आले होते. तेवढ्यात त्याचे पान बहिणीने पुढ्यात ठेवले व गण्या त्यावर तुटून पडला. भूक जोराची लागली होती. एक वडा दोन घासांत पोटात शिरत होता. खिरीचा द्रोण भराभरा संपत होता. भाजी मात्र तशीच रहात होती. गण्याचे पूर्ण लक्ष जेवणात होते. घाईघाईने जेवताना खिरीचे ओहोळ, एक दोन शिते घेऊन हनुवटीवर ओघळली होती. पाच सहा वडे रिचवल्यावर गण्याने डोळे वर उचलले तर पाऊ त्याच्याच कडे पहात होती. ती एकदम म्हणाली ‘‘ए! असा काय जेवतोस नीट जेव! तोंड बरबटलेस बघ केवढे’’ गण्याला ओशाळे वाटले. डाव्या हाताच्या मनगटाने त्याने तोंड पुसले व मग हळू हळू जेवू लागला. घास देखिल छोटे घेऊ लागला. पाऊला बरे दिसले पाहिजे असेच त्याला वाटत होते.

जेवणे झाली आणि गोपाळ भटजी व गण्याच्या वडलांच्या गप्पा सुरू झाल्या. पाऊची आई जेवण आटोपून त्यांच्याच बाजूला येवून बसली. पाऊ अर्धी आईच्या मांडीत तर अर्धी जमिनीवर अशी आईला रेलून बसली होती. गण्या त्याच्या बाबांच्या आणि बहिणीच्या मधे बसला होता. त्याला या मोठ्या लोकाच्या गप्पात काहीच रस नव्हता. डोक्यात विचार चालू होते. काय तरी बोलून, पाऊला घेऊन तिथून सटकायची योजना डोक्यात फिरत होती. पण समर्पक कारण सुचत नव्हते.

एवढ्यात पाऊची आई बोलली "निघायचे का हो? नाही! बराच वेळ लागेल घरी पोचायला"

"अग्गो! उन्हे केवढी आहेत. मस्तक फुटते बघ अशा उन्हात. अंमळशाने निघू. तुम्हास दुपारी वामकुक्षी हवी, लवंडा इथेच कुठेतरी." गोविंद भटजींचे तुडुंब भरून सुस्तावलेले पोट निघण्यास नकार देत होते.

गण्याच्या बहिणीने आतल्या खोलीत चटई पसरून पाऊच्या आईच्या वामकुक्षीची सोय केली. तिच्याबरोबर पाऊ निघताच गण्या ओरडला "पाऊ चल झोपाळयावर बसू आपण."

"नको रे तिला आता नेऊस कुठे. तूही पड माझ्या जवळ." गण्याचे बाबा ओरडले. गण्या गप्प त्यांच्या शेजारी पहुडला. पांच मिनीटात त्याचे बाबा, गोपाळ भटजी दोधांचेही खर्ज लागले. गण्या टकटकीत जागा होता. तो हळूच उठून बाहेरच्या ओटीवर गेला. झोपाळयावर बसून झोका घेऊ लागला. झोपाळयाच्या कडीला खूप दिवसांत तेल पाणी नव्हते. त्यांनी लयीत कुईकुई चालू केले. झोके घेता घेता तो पेंगाळू लागला एवढ्यात दारांत पाऊ आली व म्हणाली "थांबव ना झोका, मलाही बसायचे आहे."

गण्याची पेंग पुरी उडाली. तिला झोपाळयावर घेऊन त्याने परत झोका सुरू केला. मग त्याला एकदम आठवले, त्याने पाऊला विचारले "ए! जेवायला बसलो तेव्हा तू कसले श्लोक म्हणत होतीस? काय म्हणत होतीस तू?"

"ते वदनी कवळ घेता म्हणत होते. ते म्हणून मगच जेवायचे. मग जेवण देवाचा प्रसाद होते. अपाय करीत नाही." पाऊ सांगत होती.

"ह्या! काय तरीच! " गण्याने हसण्यावारी उडवत म्हटले.

"काय तरीच काय? माझ्या बाबानीच सांगीतलेय. आणि बघ मी कशी गुटगुटीत आहे, नाहीतर तू?" पाऊ म्हणाली. थोडावेळ विचार करून गण्या म्हणाला "मग मला शिकव ना." झोपाळ्यावर बसून पाऊ श्लोकाची एक ओळ म्हणे मागाहून गण्या म्हणे. असे पांच सहा वेळ म्हटल्यावर गण्याचा श्लोक पाठ झाला.

आता दिवस उतरत होता. गोपाळ भटजींचे चहापाणी आटपले व सगळे जायला निघाले. गण्याला चैन पडेना. त्याच्याबरोबर खेळणारे कोणीतरी पहिल्यांदाच मिळाले होते. ती संगत संपताना त्याला चुकल्या चुकल्यासारखे वाटत होते. पोटात खड्डा पडल्यासारखे वाटत होते. गोपाळ भटजी, पाऊ आणि पाऊची आई आता खळ्यात उतरून निघाले आणि गण्या पडवीतला खांब पकडून खट्टू होऊन उभा राहिला. त्याला संध्याकाळ बरीच वाटेना.

रात्री जेवायला बसल्यावर हात जोडून त्याने वदनी कवळ घेता सुरू केले व त्याचे बाबा आणि बहिण "आ" वासून त्याच्याकडे पहातच बसले. श्लोक पुरा झाला तसे बहीण म्हणाली "दररोज म्हणत जा रे. छान वाटते. पाऊ छान शिकवून गेली तुला."

पुढचे कित्येक दिवस गण्या जेवताना हा श्लोक म्हणत होता. हळू हळू पाऊ पण मनातून विरळ होऊ लागली आणि श्लोकही बंद होत गेला.

चांगले सहा आठ महिने उलटले असतील आणि वडील म्हणाले "गोपाळ भटजीना बोलवणे पाठवायला हवे. तेच पूजेचा मुहूर्त काढतील व पूजाही सांगतील. कोणाला तरी पाठवले पाहिजे त्यांना बोलवायला." हे ऐकताच गण्याच्या डोळ्यासमोर पाऊ उभी राहीली. त्या दिवशीचे सगळे काही डोळ्या समोरून भर भर जाऊ लागले. तो म्हणाला "मी जाऊ बाबा? मला माहीत आहे भटवाडीचा रस्ता."

"काय रे जंगलात भिणार नाहीस ना? मग जा." त्याच्या बाबांनी जा म्हणताच गण्या पडत्या फळाची आज्ञा घेऊन भटवाडीच्या रस्त्याला लागला. तोंडानी मोटर गाडीचा आवाज व हाताने स्टिरिंग फिरवत धावत होता. वाटेवरच्या दगड धोंड्याचे भान त्याला नव्हते. जंगल हळू हळू मागे पडत होते. भटवाडीची घरे दिसू लागली. तसा गण्या धावायचा थांबला. त्याचा धावून धावून श्वास फुलला होता. भटवाडीत पोचेपर्यंत श्वास पुरा संथ झाला. पण मग त्याच्या लक्षांत आले. गोपाळ भटजींचे घर कुठले हे तर माहीतच नाही.

पहिल्या घरासमोरच एक बाई फुले काढताना दिसली. तिला गण्याने विचारले “काय हो पाऊचे घर कुठचे?” त्यालाच वाटले अरे! गोपाळ भटजींचे घर विचारायचे सोडून आपण पाऊचे घर म्हटले. त्या बाईने हातानेच दिशा दाखवत सांगीतले “या बाजूने सरळ जा चौथे घर पेंडशांचे आहे. तेच पाऊचे घर. पण तू कोण रे खोतांचा का?”

गण्या उत्तर न देताच परत धावत सुटला. घरे मोजीत तो चौथ्या घरासमोर आला. त्याला पाऊच अंगणात खेळताना दिसली.

“पाऊ! काय करतेस?” गण्या जवळ जवळ ओरडलाच. हासभास नसलेली पाऊ एकदम दचकून पहात राहीली. थोडा धक्का सांवरून म्हणाली “अरे तू कसा आलास?” एवढ्यात आतून पाऊची आई बाहेर येत बोलली “काय गो पाऊ, कोण आले आहे?” तिची नजर गण्यावर पडली तशी तिने त्याला अंगणाच्या पाळीवरच बसायला सांगीतले. आत जाऊन पाणी व पेला घेऊन आली. पेला त्याच्या जवळ जमिनीवर ठेवून म्हणाली “घे हा पेला. पाणी देते तुला.” गण्याने रिकामा पेला उचलला तसे तिने त्यात वरुनच पाणी ओतले. दोन पेले पाणी गण्याने घशाखाली उतरवले, तसे त्याला ताजेतवाने वाटले. तो पेला परत करू लागला तर पाऊच्या आईने तो खालीच ठेवायला सांगीतले. पेल्यावर तांब्यातले पाणी ओतून तिने त्याला सोवळा केला मगच उचलला.

गण्याला फार विचित्र वाटले. सगळीकडे ही बाई सोवळे जपताना दिसत होती. तो म्हणाला “बाबानी गोपाळ भटजीना बोलावलेय. पाऊ तुझी बाग दाखतेस?” निरोप संपल्या संपल्या त्याची पाऊबरोबर खेळायची खरी इच्छा उफाळून आली. पाऊ काही बोलायच्या आत तिची आईच म्हणाली “उन्हे फार वर आलीत हो. आता नका जाऊत परसदारी. आणि येतील हे सायंकाळी तुमच्या घरी. सांगेन मी त्यांस निरोप. चल पाऊ घरात. मज मदत कर थोडी.” पाऊ उठून आईच्या मागे घरात जाऊ लागली. गण्या हिरमुसला. आपल्याला आता परत जाणेच भाग आहे हे त्याच्या लक्षात आले. तो परत निघाला तो अगदी संथपणे. जराही धावायची इच्छा नव्हती. हळू हळू चालत तो जंगलापर्यंत पोचला डोक्यावर ऊन तापत होते. गण्याला पाऊच्या आईचा खूप राग आला होता. थोडा वेळ पाऊबरोबर खेळलो असतो तर काय झाले असते. पाऊ ओवळी झाली असती म्हणे. कसले सोवळे आणि कसले ओवळे. ही मोठी माणसे लहानाना मनसोक्त खेळू का देत नाहीत?

जंगलाच्या पायवाटेवर खूप दगड धोंडे होते. गण्या त्यातले काही उचलून इकडे तिकडेच्या झाडांवर झुडपांवर मारीत सुटला. मनातला राग निवळायला तोच एक मार्ग त्याला दिसला.

एक दगड त्याने करवंदांच्या गर्द झाडीत मारला आणि आतून एक भले मोठे भेकर उडी मारून त्याच्या पुढ्यातून धावत दुसऱ्या बाजूला झाडीत दिसेनासे झाले. अकस्मात जंगली जनावर उठल्यामुळे गण्याचा ऊर धपापू लागला. “मेलो! मेलो! ” करत गण्याने घराच्या दिशेने धूम ठोकली. भेकर हरीणासारखेच, पण जरा खुजे, अगदी भित्रा प्राणी. पण जंगलातला आणि एकदम समोर आलेला, त्याचीच भीती गण्याला वाटली होती. जंगल संपून वस्तीचा रस्ता दिसू लागला आणि गण्या थांबला.

घरी पोंचला. घटाघटा तांब्याभर पाणी प्याला. तसा जीव शांत झाला. बाबानी विचारले “ काय रे भेटले का भटजी?”

“नाही, पण पाऊच्या आईने सांगीतले संध्याकाळी येतील भेटायला. ती देईल निरोप.” गण्या सांगत होता. वाक्ये जरा तुटकच येत होती. अजून धक्का पुरा विरला नव्हता. एवढ्या लांब जाऊन देखील पाऊबरोबर थोडेही खेळायला मिळाले नाही, याचा फार राग येत होता.

संध्याकाळी गोपाळ भटजी आले व चार दिवसानी घरात पूजा करायची ठरले. आता परत पाऊ येणार खेळायला मिळणार म्हणून गण्या स्वस्थ झाला. पूजेच्या दिवशी गोपाळभटजी एकटेच आले. गण्याच्या बहिणीनेच प्रसाद, नैवेद्य केला. आणि गण्या परत एकदा खट्टू झाला.

पुढच्याच वर्षी गण्याची रवानगी त्याच्या आत्याच्या घरी तालुक्याच्या गावी झाली. गण्याचे गाव अगदी लहान. गावात शाळाच नव्हती. गण्या त्या मोठ्या गावात पहिल्यांदा बुजला व मग रुळला.

सगळेच मजेदार होते. खूप मुले, खेळायला हुंदडायला मोठ्ठी जागा. गावचा विसरच पडायचा. सुट्टी आली की गण्या आपल्या गावी जायचा. केव्हा दोन वर्षे गेली समजलेच नाही. आणि तिसऱ्या वर्षी शाळा सुरू होऊन दोनएक दिवस झाले असतील आणि एक गोरीपान, बुचडा बांधलेली व परकर पोलका घातलेली मुलगी शाळेत आली. गण्याला पाऊची आठवण झाली तो एकदम बोलून गेला “पाऊ”. ते एवढ्या जोरात होते की त्या मुलीने एकदम वळून बघीतले. बरोबर असलेल्या माणसाने पण बघितले. गण्याला माहीत पडले ती पाऊ होती. तो धावत तिच्याकडे गेला. पाऊचे डोळे रडून लाल झाले होते. “मामा नको ना! मज शाळेत नाही जावयाचे, आईपाशी ने मज.” असे सारखे तोंडाने बडबडत होती.

गण्या तिच्याकडे पोचला व म्हणाला “पाऊ अग रडतेस कशाला. शाळेत खूप खेळायला मिळते. खूप मुले आहेत. मजाच मजा. गप्प रहा ना.” तिचा मामा बोलला “कोण रे तू? पाऊला ओळखतोस?”

“मी गण्या, पाऊ आणि तिचे बाबा पूजा करायला आमच्याकडे यायचे. पाऊ सांग ना त्यांना.” गण्या.

आता पाऊ खूप सावरली होती. आपल्या ओळखीचा एक तरी मुलगा शाळेत आहे हे पाहून तिला धीर चढला. ती म्हणाली “हो मामा! हा गावच्या खोतांचा गण्या. आम्ही पूजा सांगायला जात असू यांच्या घरी.”

“मग आता बघ. तूस एक तरी ओळखीचा मिळाला ना? आता रडू नको.” मामा पाऊला म्हणाला. पाऊने मान डोलावली. पाऊ पहिलीत व गण्या तिसरीत अशी शाळा सुरू झाली, शाळा सुटली तेव्हा गण्या पाऊकडे आला, तिला घ्यायला अजून मामा आला नव्हता. गण्या पाऊच्या सोबतीला थांबला होता. बराच वेळ मामा आला नाही. जवळ जवळ सगळी मुले शाळेतून गेली होती. आता पाऊ रडवेली होऊ लागली तसा गण्या कळवळून म्हणाला “पाऊ सकाळी येताना रस्ता पाहून ठेवलायस ना? मी पोचवेन तुला मामा नाही आला तर. घाबरू नकोस.”

“पण मामा का नाही येत? मी आईकडेच जाते. मला नाही रहायचे इथे.” आता पाऊचे डोळे डबडबले. गण्याला गलबलून आले. तो म्हणाला “चल रस्ता सांग. मी पोचवतो तुला.”

“पण मला बरोबर रस्ता नाही सापडला तर?” पाऊ

“चल तर खरी मी विचारीन कुणाला तरी. मामांचे नाव माहीत आहे ना?” गण्या

दोघेही शाळेच्या गेट मधून बाहेर पडत होते तेव्हा लांबून मामा येताना दिसला. तो अगदी हळू हळू रमत गमत चालत होता. गण्याला पाऊच्या मामाचा जाम राग आला. पहिलाच दिवस लवकर नाही यायचे? मामा पोचताच म्हणाला “अरे! शाळा सुटली पण?”

“हो केव्हाची वाट पाहतोय. पाऊ तर रडवेली झाली होती. तुम्ही एक करा. मला तुमचे घर दाखवा मी पोचवत जाईन पाऊला तुम्ही नाही आलात तर.” गण्या जरा जोरात बोलून गेला.

"असे कर. आत्ताच चल आमच्याबरोबर आणि तूच पोचवत जा तिला. म्हणजे मला काम टाकून धावायला नको हिला आणायला" पाऊचा मामा.

आता सगळे गप्प होऊन चालत होते. गण्याचे घर शाळेपासून जास्त लांब नव्हते. ते आले तसे गण्या पाऊला दाखवून म्हणाला "ते बघ. ते माझ्या आत्याचे घर. मी तिच्याकडे राहातो. कधी चुकामुक झाली तर सरळ इथे ये. मग तुला पोचवीन मी."

"मामा मला नाही रहायचे, आईकडे जायचेय." पाऊ म्हणाली.

"आणि शिक्षणाचे काय? तुला इकडे शाळेत शिकायला पाठवली आहे." मामा जोरात बोलला.

पुढे जाताना रस्त्याच्या बाजूला एक पाऊलवाट आली. मामा तिकडे वळला तशी पाऊ पण, मागून गण्याही निघाला. पाऊलवाटेच्या दोन्ही बाजूला करवंदाच्या जाळी होत्या. मधुनच कुड्याची झाडेही दिसत होती. बरेच चालल्यावर घरे दिसू लागली. मामाचे घर गण्याने व्यवस्थित बघितले व म्हणाला "मी जातो. मला उशीर झाला तर आत्या काळजी करेल." आणि आल्या पावली तो परतला. त्याला कोणी थांबही म्हटले नाही की पाणीही विचारले नाही. गण्या दुडकत, धावत घरी पोचला. आत्या दारातच वाट पहात होती. आत्याने वेळ का झाला विचारताच गण्याने सगळी हकीगत सांगीतली व मामाचे घरही कुठे आहे ते सांगीतले.

आत्या म्हणाली "अरे भटवाडी ती. सगळे भटजी तिकडेच रहातात." गण्या घटाघटा पाणी पिऊन शांत झाला. मनात मात्र वाटत होते पाऊच्या मामाने कधीच येऊ नये पाऊला घ्यायला. म्हणजे दररोज तिला पोचवता येईल आपल्याला.

झालेही तसेच. मामाला आयतेच कामाचे कारण मिळाले. गण्या पाऊला दररोज पोचवू लागला. दोघेही बडबडत गप्पा करीत हसत जात. तिला पोचवून मग गण्या धावत पळत घरी येई. एकदा गण्याने विचारले. "पण काय ग. शाळेत तू सर्वांना शिवतेस, ओवळी होतेस घरी जाऊन सोवळी व्हायसाठी आंधोळ करतेस का ग?" गण्या टिंगल केल्या सारखा विचारता झाला.

"हो! मामी सगळे कपडे न्हाणी घरात लटकवून ठेवते. मी घरात जातच नाही. बाहेर न्हाणी घरात न्हाऊन मगच घरात जाते. नाहीतर मामी फार ओरडते. मला आई नव्हती ओरडत अशी." परत रडवेली होत पाऊ सांगत होती.

गण्याला गलबलून गेले. करवंदीच्या झाळीत शिरून गण्याने चार पाच काळीभोर करवंदे काढली व तिला देत म्हणाला “ही घे! छान पिकलेली आहेत. आता पुढच्या वर्षीपर्यंत मिळणार नाहीत. शेवट शेवटचीच आहेत. ”

खूष होत पाऊने करवंदे घेतली. तिचा खूष चेहेरा पाहून गण्याला फार बरे वाटले.

असेच दिवस गेले. शाळेचे वर्ष संपत आले तसे पाऊला गण्याने विचारले “ रजेत आईकडे गावी येणार ना? कधी जाणार गावी?”

“मला नाही माहीत. बाबा येतील घ्यायला तेव्हा जाईन, तू पण जाणार?” पाऊ.

“हो तर! मी रजा लागली की दुसऱ्याच दिवशी निघतो. अगदी पहिली एस.टी. पकडतो मी.” गण्या.

“मी बाबांची वाट पहाणार. तू लवकर पोचलास तर त्यांना लवकर यायला सांग.” पाऊ

“हो मी सांगेन. पण तू माझ्याबरोबर चल ना. मी सोडेन तुला. मला माहीत आहे तुझे घर.” गण्या

“पण बाबा इकडे आले तर? त्यांना सांगायला पाहिजे. आणि मामी नाही पाठवणार.” पाऊ.

पाऊचे घर आले आणि गण्या मागे फिरला. रजा पडली. गण्या घरी आला. परत झाडा झुडपात फिरा, नदीत डुंबा चालू झाले. चार पांच दिवसानी गोपाळ भटजी अचानक आले. गण्याच्या बाबांशी गप्पा मारीत होते. गण्या परसात आंब्याच्या झाडावर चढून अर्धे कच्चे आंबे खात होता. भटजी आल्याचे समजल्यावर सरसर खाली उतरुन घरी यायला निघाला. वाटले बरोबर पाऊ पण आली असेल.

बाहेरच पडवीत त्याचे बाबा व भटजी बसले होते. त्याला पहाताच भटजी म्हणाले “गणेशराव फार चांगले करता हो. आमच्या पार्वतीला घरापर्यंत दररोज सोबत करता. सांगत होती ती. फार चांगले करता हो.”

आपल्याला गणेशराव म्हटले म्हणून व पुढची स्तुती ऐकून गण्या फुशारला “तिला का नाही आणलेत? खेळलो असतो आम्ही.” गण्या बोलून गेला.

"आणीन हो पुढच्या वेळी. परवाच घेवून आलो तालुक्याहून. तिच्या मामीने पापड कुरडयाचे घातले होते, मदतीला थांबवून घेतले पार्वतीस. विठ्ठलराव काय सांगायचे हो. दुसऱ्यांकडे शिक्षणासाठी ठेवणे झाले. ते कामे करवून घेतात पोरी कडून. अहो सहा वर्षाची पोर राबवतात हो. पण काय करणार शिकायसाठी तालुक्यास कुठे ठेवायचे. मामा शिवाय दुसरे कोणी जवळचे नाही." दुःखी आवाजात भटजी वडिलाना सांगत होते.

"वेळेवर पोरीला शाळेतून घेऊन येता येत नाही. मग काय तुमच्या गणेशने आपल्या शिरावर घेतले हे काम. रोज बिचारा पार्वतीला घरापर्यंत पोचवतो व मागच्या मागे निघून जातो. पाणी सुद्धा विचारीत नाहीत पोराला. हे बघ पार्वतीच्या आईने लाडू दिलेत करून तुझ्याकरीता. घे हे." सुस्कारत भटजीनी डबा पुढे केला. गण्या तो घेऊन घरात पळाला. बहिणीने डब्यातील लाडू दुसऱ्या डब्यात काढून त्यांचा रिकामी डबा घासून पुसून स्वच्छ केला. व बाहेर आणून भटजींना विचारले "पाणी टाकून घेणार का?"

"नको राहू दे द्या तसाच. घरी जाऊन स्नान करायचेच आहे. तेव्हा धुईन तो. अहो आमच्या हिचे सोवळ्याचे अवडंबर फार. मी सांगतो थोडी मुरड घाल जुन्याला. जग बदलतेय पण ऐकतच नाही." डबा घेऊन भटजी उठले, "येतो हो" म्हणत निघाले देखिल.

गण्याने न राहावून विचारले "गोपाळ भटजी पाऊला उद्या घेऊन येणार ना?"

"नाही रे बाळा बघतो दोन चार दिवसात या बाजूला काम असले की येईन घेऊन सकाळीच. व सोडीन खेळायास तुझ्याबरोबर. संध्याकाळी घेऊन जाईन बरे का?" भटजी वाटेला लागले.

गण्या घरात झोपाळ्यावर येऊन बसला. झोका घेता घेता मागचे सगळे आठवू लागले. डोळ्यासमोर बुचडा बांधलेली किरमीजी परकर पोलक्यातली पाऊच दिसत होती. एकाद्या बाहुली सारखी वाटत होती. परत शाळा सुरू झाली की पाऊ दुसरीत जाणार व आपण चौथीत जाणार याचे गण्याला फार बरे वाटत होते. झोपळ्यावर बसल्या बसल्या हळू हळू गुंगी चढू लागली आणि तो झोपाळ्यावर आडवा झाला. झोपून गेला.

शाळा सुरू होणार, तालुक्याच्या गावी जायचे. गण्याच्या आईने आणि बहिणीने फराळाचे पदार्थ करायला घेतले. गण्याच्या आत्याकडे पाठवायचे होते. एवढ्यात गोपाळ भटजी पाऊला घेऊन आले. म्हणाले "गणेशराव समजवा हिला. शाळेत जायचे नाही म्हणते. पाठवणार असाल तर आईला

बरोबर पाठवा म्हणतेय. तिला पाठवले तर गावच्या पूजापाठांचे कसे करणार? आणि ही इथे राहिली तर शिक्षण कसे होणार?"

गण्याला "गणेशराव ऐकून फार मोठे झाल्यासारखे वाटले. त्याने पाऊला बरोबर घेतले व परसात निघाला मनात आले हिचे मन वळवलेच पाहिजे. तालुक्याच्या गावी शाळेत जायची, हिला घरी पोचवायची मजा जाईल. मग आपल्यालाही कंटाळा येईल.

"काय ग पाऊ! शाळेत का जायचं नाही म्हणतेस?"

"अरे! मामी सगळेच काम मला सांगते. केर काढ, भांडी धू, शेणाने जमीन सारव. शाळा संपली की हीच कामे करते मी. अभ्यास केव्हा करू? मामाही म्हणतो पोरीच्या जातीस काम पहिले. संसार चांगला होतो. आईला सांगीतले तर कळवळून रडली ती. वाटले उगीच सांगीतले तीस. आई रडलेली मला नाही आवडत. मलाही रडू रडू होते रे! मग जायचेच कशास मामाकडे. आईकडेच शिकेन मी घरकाम."

"काय वेडेपणा करतेस. अग शिकून मोठी झालीस तर असली कामे कायमची सुटतील. थोडा त्रास काढावा लागेल, पण शिकून मोठे व्हायला होते असे गुरुजी सांगतात ते काय उगीच? मला वाटतं तू खूप शिकावंस. म्हणून शाळा सोडू नकोस." गण्या बोलत होता खरा पण त्याला मनात भिती वाटत होती. हिने खरंच शाळा बंद केली तर. हिला दररोज घरी पोचवायची मजा बंद होईल. पाऊ बरोबर असली की किती छान वाटते. मग त्याला तिच्या मामीचा फार राग आला. वाटले, एकदा मामीला जोरात विचारावे "काय गे! एवढ्याशा मुलीला कामाला काय जुंपतेस? कशी बाहुलीसारखी आहे ती. तिला मळवून, शेणात घाण करून टाकायची का?" पण एवढ्या मोठ्यांना आपण कसे बोलणार? "बघ पाऊ मी तुला दररोज पोचवतो ना घरी? मग? मी तसाच सोबत करेन तुला. तुला अभ्यासाला वेळ पाहिजे ना? मग माझ्या घरी ये. आपण एकत्र अभ्यास करू. माझी आत्या फार छान आहे. ती लाडच करेल तुझे." गण्या एक एक गोष्ट पुढे करून मनवत होता.

"कसे येणार तुझ्याकडे परत गेल्यावर स्नान करावे लागेल, ओवळी झाले म्हणून, त्याचे काय. न्हाणी घरात संध्याकाळी गरम पाणी नसते. थंड पाण्याने स्नान मला नाही करवत, थंडी वाजते. वर परत केस कोरडे करायलला आई नाही. मामी मलाच सांगते कोरडे कर म्हणून. मग आईची फार आठवण येते. मला नको ना सांगूस चल म्हणून. मला माहीत आहे. मी नाही म्हणाले की तू हिरमुसला होतोस. मग

मला ते ही वाईट वाटते." पाऊ सरळ मनाने सांगताना ऐकून गण्या हुशारला. त्याला वाटले कुठेतरी मार्ग तयार होतोय. जरा जोर केला तर यायला तयार होईल ती.

"हे बघ. तू शाळा नको बंद करू. आई बाबाना सांग तुला जायला का नाही आवडत ते. ते बोलतील मामाशी मग मामी नाही वागायची अशी. किंवा दुसरे कोणी नाही का जवळचे नातेवाईक तालुक्याला? असतील तर त्यांच्याकडे रहा." गण्या वेगवेगळे मार्ग सुचवीत होता.

"सांगीतले रे मी आईला. तर ती म्हणाली, पोरीचा जन्म घेतलायस सगळे करता यायला पाहिजे. वर अभ्यासही करायचा. शिकून मोठे व्हायचे. मग आमच्यासारखे भिक्षुकीचे घास नाही येणार नशिबी. म्हणजे काय रे? भिक्षुकीचे घास? मला नाही समजले." पाऊ निरागसपणे विचारत होती.

गण्यालाही समजले नाही. तो गप्पच बसला. आपल्याला समजले नाही हे सांगणे त्याला बरोबर वाटेना. त्याने विषय बदलला. "बघ काजूवर बोंडू किती छान पिकलेत, काढू?"

थोडा वेळ परसात बोंडू, कच्चा कैऱ्या काढून दोघेही घरात परतले. गोपाळ भटजीनी विचारलेच "झाली का तयार पार्वती?"

"हो! येणार ती. पाठवाच तिला. शिकून मोठे नको व्हायला?" गण्या मोठेपणाचा आव आणीत बोलून गेला. पाऊ त्याच्याकडे पहातच राहिली.

सुट्टी संपली गण्या बस पकडायला आला तर तिथे रडवेली झालेली पाऊ व तिचे आई बाबा अगोदरच येवून उभे होते. गण्याला बघताच पाऊला परत रडू आले. आई डोक्यावर हात फिरवीत तिला समजावू लागली. बस येताच पाऊ बरोबर आई देखिल बसमधे चढली. गण्या सगळे पहात होता. बोलणे खुंटले होते. गण्याला बसमधे फार मागे जागा मिळाली होती. तालुक्याच्या गावी पोचताच गण्याने पाऊला व आईला गाठले. जरा मोठेपणाचा आव आणत म्हणाला "बरे झाले आई हिला आणलेत ते. ती घाबरते रानातल्या रस्त्याने जायला. पण मी पोचवीत जाईन तिला दररोज. आणि तिला माझ्याबरोबर अभ्यासाला पाठवता आले तर पहा. ती नंतरच्या आंधोळीला घाबरते."

"काय ते बोलते मी भाऊशी, पण त्याची बायको काही ऐकणार नाही. हिने थोडे समजून घेतले पाहिजे. सोवळे पाळायचे तर केली आंधोळ बाहेरून आल्यावर. त्यात काय एवढे मोठे! " आई बोलत होती.

गण्याला वाईट वाटले. आई असूनही तिला पाऊची काळजी कशी नाही. तिला थंडी वाजते, मग कशाला उगीच आंधोळ, कसले सोवळे, पाऊ कशी एकाद्या बाहूली सारखी आहे. कोमेजील ती, गण्याचे मन हळवे हळवे झाले. गण्याच्या आत्याचे घर दिसू लागले व गण्या बरे येतो म्हणत पळत सुटला.

दुसऱ्या दिवशी शाळा सुरू झाली, पाऊला घेवून मामा आला. त्याने गण्याला सांगीतले की "गणेश तू हिला अभ्यासाला बोलवतोस हरकत नाही. पण तिचे सोवळे असणार तिला चुकून देखिल शिवायचे नाही. शिवलास तर तिला स्नान करावे लागेल. ते ही थंड पाण्याने."

गण्याला काय बोलावे ते समजेना. पाऊकडे पहात तो उभा राहीला, मामा गेला तसे पाऊ म्हणाली "काल आईने मामा मामीला सांगीतले, अभ्यासाला तुझ्याकडे पाठवायला. मामी थोडी बडबडत होती. पण मामा हो म्हणाल्यावर गप्प झाली. मी दुपारी जेवण झाले की येत जाईन."

गण्या एकदम खूष झाला. त्याच्या बाहुलीचा सहवास वाढणार होता. शाळा सुटल्यावर नेहमीप्रमाणे गण्याने पाऊला घरी पोचवले. लवकर ये अभ्यासाला, असे म्हणायलाही विसरला नाही. मग दररोज दुपारी साडेतीन चार वाजता पाऊ त्याच्याकडे येवू लागली. तास दीडतास नेमाने अभ्यास होऊ लागला. कधीही अभ्यासाला न बसणारा गण्या पाऊ मुळे अभ्यास करायला लागला, म्हणून गण्याच्या आत्याला पाऊ आवडू लागली. दुपारच्या चहाच्या वेळी तिला खाऊची बशी मिळू लागली आणि पाऊ आत्यांच्या घरात रुळू लागली. एवढी की आत्यांशी गप्पाही मारू लागली. शिवाशीव झाली तरी घरी सोवळे पाळलेय अशी थाप ठोकू लागली.

अभ्यासाच्या वेळी गण्या तिला समजावे. त्याने तिचा अभ्यास चांगलाच जोर पकडू लागला. गण्याचाही नियमीत अभ्यास होऊ लागला. शेवटची परीक्षा होऊन निकाल हाती आला. पाऊ दुसरीच्या वर्गात पहिली आली. गण्या चौथीच्या वर्गात दुसरा आला होता. तरी पाऊ पहिली आल्याचा आनंद गण्यालाच जास्त झाला. कधी नाही तो गण्या पाऊला पोचवायला गेला, तेव्हा तिच्या घरापर्यंत गेला. मामा होतेच. हसत ओरडत म्हणाला

"पाऊ पहिली आली वर्गात."

पण मामा मामीने "अस्से होय! " एवढेच उद्गार काढून दाखवले. गण्या खट्टू झाला. पाऊला म्हणाला "पाऊ गावी केव्हा जाणार?" मामा एकदम म्हणाला "अरे मी येणार होतो पोचवायला

तिला. पण तू जातो आहेसच तर पोचवशील का रे तिला घरी? मला उगीच हेलपाटा कशास? तू चांगला समजूतदार आहेस. मी बसवून देईन गाडीत दोघांना. चालेल ना?"

गण्या एकदम खूष झाला, हो मामा. मी अगोदर पाऊला घरी पोचवीन, मगच मी घरी जाईन." परत एकदा मोठा होत गण्या म्हणाला. दुसऱ्याच दिवशी गण्या आणि पाऊ गाडी पकडून गावी निघाले. आत्याने तिकीटीच्या पैशापेक्षा एक रुपया जादा दिला होता. गण्याने त्याची खूपशी पेपरमिंट घेतली होती. गाडी सुरू झाली व गावा बाहेर पडली तशी दोन पेपरमिंट त्याने पाऊला दिली. एक लाल व दुसरे पिवळे पाऊ एकदम खूष झाली. तुला कोणी दिली? कुठून आणलीस एवढी? मी पहिल्यांदाच खाणार रे?"

थोड्याच वेळात पाऊची जीभ व ओठ लाल लाल झाले. पहिल्यांदाच खाल्लेल्या गोळ्यांचे समाधान चेहेऱ्यावर पसरले. ते चित्र पहाण्यात गण्या दंगून गेला. त्याच्या बाहुलीचे हे रूप तो मनात साठवत होता. त्यात तरंगताना गाव केव्हा आले त्याला समजलेच नाही.

पाऊच्या घरी दोघेजण पोचले तर गोपाळ भटजी व पाऊची आई चकित झाली. "अग मामा नाही आला पोचवायला? पाऊची आई विचारीत होती. "नाही आले ते. मी येणार म्हणून माझ्या सोबतीने पाठवली तिला. आणि हो! पाऊ वर्गात पहिली आली हो. छान अभ्यास केला तिने माझ्याबरोबर." गण्याच्या काहीच पोटात रहात नव्हते.

"हो का? छान झाले हो. पोरीला शिकायची आवड लागतेय हो." पाऊची आई पोरीचं कौतुक करीत होती. गण्या पाणी पिऊन आपल्या घरी निघाला वाटेत त्याला हरवल्यासारखे वाटत होते. आता महिना दीड महिना पाऊचा सहवास मिळणार नव्हता. परत शाळा सुरू होईपर्यंत वाट पहावी लागणार होती. बाहुली हरवल्यासारखे वाटत होते.

तो काळ संपला परत शाळा सुरू झाली. वर्षे भर भर उलटू लागली आणि गण्याने सातवी पास केली आता हायस्कूल सुरू झाले. पाऊ सहावीत आली होती दरवर्षी पहिलीच येत होती. दोघांच्या शाळेच्या वेळा बदलल्या आणि सहवास संपला. आता तसे दोघेही मोठे होत होते. त्यामुळे विशेष काही फरक दोघानाही वाटला नाही.

पण दोन वर्षानी पाऊने सातवी पास केली. गण्या ती आता हायस्कूलला येणार म्हणून खूष होता. पण पाऊ गायब झाली. हायस्कूलला आलीच नाही. गण्या गडबडून गेला. कुठे गेली? शिक्षण

सोडले तिने? एवढी पहिली येणारी मुलगी शिक्षण सोडून बसते? काय म्हणायचे या लोकाना? गण्या विचाराने त्रासून जात होता. गावी गेल्यावरच माहीत पडणार होते. पाऊने शिकायचे का थांबवले.

उन्हाळयाच्या सुटीत दहावी पास करून गण्या गावी गेला. भटवाडीत जायचे काही तरी कारण मिळते का पहात होता. पण तसे काही मिळेना. मग एक दिवशी मन पक्के करून म्हणाला "मी गोपाळ भटजींच्या घरी जाऊन येतो." कोणीच हटकले नाही, तसा गण्या भटवाडी कडे निघाला.

गोपाळ भटजींच्या घरी पोचला तर भटजी आणि पाऊची आई खळ्यातच बसली होती. गण्याने लगबगीतच विचारले "पाऊ कुठेय?"

"अरे ती इथे नसते. ती गेल्याच वर्षी पुण्यास तिच्या काकाकडे गेली. ती तिकडेच शाळेत जाते. हुषार होती, पहिला नंबर यायचा म्हणून काकास गळ घातली. पुण्यास शिक्षण बरे हो. म्हणून तिकडेच पाठवली." गोपाळ भटजी सांगत होते. गण्याला ती शिकतेय हे ऐकून आनंदही होत होता व आता सहवास तुटला म्हणून हरवल्यासारखे वाटत होते. "पण आता तर रजा पडलीय. रजेतही नाही आली?" गण्या.

"पुणे जवळ नाही रे बाळा. जाण्या येण्यास भरपूर पैसे लागतात हो. कशाला एवढा खर्च करायचा! येईल शिक्षण संपवूनच" गोपाळ भटजींचे बोलणे ऐकून गण्या खट्टू झाला. आता पाऊ भेटणार नाही या विचाराने तो हळहळला. त्याच विचारात घरी कसा पोचला त्याचे त्यालाच कळले नाही.

हळू हळू दिवस जात होते. गण्याचे हायस्कुलचे शिक्षण पुरे होऊन गण्या कॉलेजला मुंबईला गेला. काळ आपले काम चोख करीत होता. पाऊ हळू हळू विस्मरणात जात होती. कॉलेजचा अभ्यास वाढला तशी पुरी अंर्तधान पावली. एक जिव्हाळा काळाच्या ओघात जिरून गेला. गण्यात मुंबईचा रोग पुरा भिनला. महत्वाकाक्षा वाढल्या, धांवपळ वाढली, अभ्यासातल्या चढाओढी, मागोमाग नोकरीची चढाओढ सुरू झाली. नवीन शब्दांची ओळख होऊ लागली. तोंडातून इंग्रजीचे बोल असलेली मराठी सहजगत्या येवू लागली. बारीक अंगकाठी व्यायामाने डौल धरू लागली. नोकरीतील कामगिरीने व बढतीने अंगावर इंग्रजी कपडे शोभू लागले. गण्या फाडफाड इंग्रजी बोलू लागला, मुंबईच्या वेगाबरोबर धावू लागला. पुरा मुंबईकर झाला.

गण्या आता गावी कमी जाऊ लागला. गाव गावढळ वाटू लागले. मुंबईचे परीट घडीचे आयुष्य गावच्या वातावरणाला कंटाळू लागले. आई बाबांना पैसे पाठवले की कर्तव्य संपू लागले.

मुंबईच्या आयुष्याची, नोकरीतील कामाची एवढी धुंदी चढली की गावचे घर, आवार, झाडे, नदी, जंगल सगळे सगळे मनाच्या सांदीकोपऱ्यात दडून बसले. एक एक यश मिळवत जाण्याची नशा लागली त्यातच त्याला परम आनंद मिळू लागला.

आणि अचानक एक दिवशी त्याची आई मुंबईला आली. गण्या काकाकडे रहात होता. ती काकाना म्हणाली. गण्याच्या लग्नाचे पहायला हवे थोराड होत चाललाय. काका म्हणाले "बोला गणोपंत, मुलगी कशी हवी? काही मनात योजलेय की नाही? असल्यास सांगा." या बोलण्याबरोबर गण्याला जाण झाली माणसाला गृहस्थाश्रमही असतो. प्रश्न मनात आला "आपल्याला कशी सहचारीणी आवडेल?" आणि क्षणात आठवण जागी झाली ती पाऊची, खरंच पाऊ सारखी सुंदर, अभ्यासात हुषार, खेळकर, गोड बोलणारी मुलगी मिळेल तर काय बहार येईल. पण डोळ्यासमोर मूर्ती आली ती बारा तेरा वर्षाच्या पाऊची, पाऊ आता मोठी झाली असेल, कशी दिसत असेल, किती शिकली असेल, तिचेही लग्न झाले का? कितीतरी प्रश्न एका मागोमाग मनात धावत आले.

आता आई विचारू लागली "गणोबा! काय विचारात पडलास? अरे तुझ्या बरोबरच्या सगळ्यांची लग्ने झाली. गोपाळ भटजींची पार्वती तुझ्याबरोबर होती ना शाळेत? ती तर आई देखिल झाली. सहा महिन्या पूर्वी बाळंतपणास आली होती तिच्या आईकडे." या बाक्याबरोबर गण्या खडबडून जागा झाला.

"हो कुठे असते ती?" त्याच्या तोडूंन प्रश्न सटकला.

"ती पुण्यालाच असते. तिच्या नवऱ्याचा कारखाना आहे पुण्यात. फार मोठा कारभार दिसतो. नवरा भली मोठी गाडी घेऊन आला होता गावी . तिला परत न्यायला देखिल गाडी घेऊन आला होता." गण्याची आई सांगत होती तसे गण्याला समाधान वाटत होते. पाऊ सुखात आहे. तिचा नवरा तिची छान काळजी घेतो. या विचाराने गण्या सुखावत असतानाच आईने परत विचारले "पण तुझा विचार तू बोलतच नाहीस? काय ठरवतोयस लग्नाचे? आपल्या नेरुरकरांकडून मुलगी आली आहे सांगून. मी त्यासाठीच आले आहे. विचार असेल तर पहा मुलगी पसंत पडली तर लवकरच लग्न घेऊ."

"माझी काही हरकत नाही. तुला पसंत पडली की झाले" गण्याच्या तोंडातून काय बाहेर पडले हे त्यालाच माहीत पडले नाही.

मग सगळे सोपस्कार रीतसर, मुहुर्तावर, सगळयांच्या अडीअडचणी पार करत पुरे झाले व गण्या सुमुहुर्तावर चर्तुभुज झाला. त्याने स्वतःचा फ्लॅट घेतला होताच, पण एकटे काय राहायचे म्हणून काकांकडेच राहात होता. त्याचा फ्लॅट काकांच्या शेजारच्या इमारतीत होता. सगळेच कसे सोयीचे होते. गण्याला कामासाठी बाहेरगावी जावे लागे. मग त्याच्या बायकोला काका, काकूंची सोबत मिळणार होती.

गण्याचा गृहस्थाश्रम मार्गी लागला आणि गण्याची पुढच्याच महिन्यात बढती झाली. गण्या मार्केटींग मॅनेजरच्या पदावर पोहोचला आणि त्याच्या टूर्स वाढल्या.

वर्षे उलटत होती. गण्याच्या टूर्स वाढत होत्या, कंपनीत वजन वाढत होते. बढात्या मिळत होत्या. गृहस्थाश्रम सुखाचा चाललेला दिसत होता. गण्या दोन मुलांचा बाप झाला होता. डोक्यावरचे केस विरळ व्हायला लागले होते. डोक्याच्या मागे छान चन्द्रकोर दिसू लागली होती. फिरायला गाडी आली होती. बायको दररोज जीम व महिन्याला ब्युटीपार्लरला जाऊन सौंदर्य ताजेतवाने ठेवत होती. मुले लाडू, चकल्या, चिवडा विसरून पफ, फ्रँकी, पिझ्झा असल्या प्रकारांवर ताव मारू लागली होती. एकूण काय गण्या पूर्ण यशस्वी होऊन सुखवस्तू, श्रीमंतांच्या यादीत प्रवेशला होता.

पण त्याचबरोबर सारखे फिरणे, बाहेरचे खाणे, कामाचा दबाव, वेळा सांभाळायची सर्कस या सगळयामुळे रक्तदाब व ॲसीडीटीचा प्रचंड त्रास व्हायला लागला. डॉक्टर, गोळ्या, वेगवेगळी औषधे, त्यांच्या वेळा सांभाळायची नवी कसरत हे सगळे नशीबी आले. चाळीशीतच म्हातारपणाची लक्षणे बघून तो हादरला. कुणीतरी अल्टरनेट थिरपी म्हणून योगासने, ध्यान वगैरे करायचा सल्ला दिला व गण्याने एक गुरु गाठला. गण्याला पचतील, परवडतील अशी योगासने व ध्यान या गुरुने त्याला शिकवले पण आहारही बदलायला लावला. गण्या पूर्ण शाकाहारी झाला. ध्यान नियमित करू लागला. देवपूजेला अर्धातास लागू लागला. थोड्याच दिवसात गण्याच्या चेहेऱ्यावर शांत भाव दिसू लागला. डॉक्टरच्या गोळ्या, योगासने, ध्यान व आहार या मुळे प्रकृती रुळावर आली.

बरोबरच कंपनीला एक मोठ्या कॉंट्रक्टची संधी चालून आली. पुण्याच्या एका कंपनीला फार मोठे एक्सपान्शन करायचे होते. खूप नवीन मशीन्स बसवायच्या होत्या. कच्च्या मालापासून शेवटच्या प्रॉडक्टपर्यंतचे व्यवस्थित प्लॅनींग करून मशिन्स बसवायच्या होत्या. याचे पूर्ण ज्ञान गण्याच्या कंपनीकडे होते व खास करून गण्या त्यात पारंगत झाला होता.

कंपनीने गण्याला प्रोजेक्ट वर नेमून पुण्यास जायची तयारी करायला सांगीतले. गण्याने पुण्याचा रस्ता पकडला. ज्या कंपनीचे काम होते त्याचे मालक रत्नपारखी नांवाचे गृहस्थ फार कडक व

झटपट निर्णय घेणारे दिसले. त्यांनी सर्व गोष्टी रीतसर गण्याला समजावल्या व गण्याला सर्व स्कीम तयार करून खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यास तसेच सर्व ड्रॉईंग्ज तयार करण्यास सांगीतले.

गण्याने शांतपणे सांगीतले हे सर्व करण्याआधी त्यांच्या कंपनीला कॉंट्रॅक्ट करावे लागेल. मगच पुढचे काम होईल. बरोबरच तयार करून आणलेल्या कॉंट्रॅक्टचा गोषवारा त्याने रत्नपारखीना दिला. त्यांनी गण्याला दोन दिवसानंतर बोलावले. मग नवीन इमारत गण्याला दाखवली. अतिशय सुंदर, एकसंध, लांबलचक इमारत पाहून गण्याला आनंद झाला. अशा इमारतीत प्लॅनींग सोपे जाणार होते.

दोन दिवसानी गण्या पुण्याला गेला तर रत्नपारखीनी कामाचे कॉंट्रॅक्ट पुढे केले. एक दोन छोट्या दुरुस्त्याच त्यांनी सुचवल्या होत्या. त्या गण्याने मान्य केल्या, कॉंट्रॅक्ट टाईप होऊन सर्वांच्या सह्या झाल्या व रत्नपारखीनी पहिला चेक, इमारतीचा प्लान, मशिनरीची लिस्ट व इतर सर्व माहीतीचे बाड गण्याला सुपूर्त केले.

दुपार झाली होती. आता रत्नपारखी बदलले होते. गण्याला अगदी खेळीमेळीने आग्रह करीत म्हणाले “चला आपण लंच आज एकत्रच घेऊ.” पंचतारांकित हॉटेलात रत्नपारखी व गण्या पोहोंचले. टेबल सुंदर  लावले होते. व एक बाई त्या टेबलवर आपली जागा पकडून बसली होती. रत्नपारखी टेबलकडे पोचताच म्हणाले “माधवी हे गणेशराव खोत. आपले सर्व कॉंट्रॅक्ट मी आजच यांना दिले. या पुढे पेमेंटसाठी हे तुला भेटतच जातील. आणि  मि. खोत! या आमच्या पत्नी माधवी रत्नपारखी”

गण्याने एक नजर मिसेस रत्नपारखीवर टाकली. मनात कुठेतरी वाटले. चेहेरा ओळखीचा वाटतो.

“काय घेणार? बिअर कि हार्ड ड्रिंक?” रत्नपारखी विचारत होते.

“मी यातले काहीच घेत नाही. तुम्ही घ्या मी एकादा फ्रूटपंच किंवा लाईम सोडा घेईन तुम्हाला कंपनी म्हणून” गण्या शांतपणे म्हणाला.

“अहो तुम्ही मार्केटींग पहाता ना? जनरल मॅनेजर आहात कंपनीचे आणि ड्रिंक्स घेत नाही? बिझनेस कसा मिळवता?” रत्नपारखी.

“अहो आज मिळवला तसाच. बिझनेस मिळेपर्यंत कुठे आपण सेलिब्रेट केलं? आता बिझनेस झाला आहे ना? मग कशाला प्यायची?” गण्या शांतपणे बोलला.

"बरं काय घेणार? कोणतं सूप? नॉनव्हेज चालेल ना?" आता सौ. माधवी रत्नपारखी विचारत होत्या. परत ती बोलण्याची लकब पाहून गण्या विचार करू लागला "कोण असेल बरं ही? आपण कधी भेटलोय हिला?" पण काही केल्या त्याला आठवेना. हंसत खेळत जेवण आटोपले व गण्या मुंबईला परत निघाला.

एवढे मोठे काम मिळाल्याची बातमी त्याला ऑफिसमधे जाऊन मालकाना द्यायची होती. दुपारचे अडीच वाजले होते. ट्रॅफिक नसले तर तो सहा वाजण्याअगोदर पोचू शकत होता. पण गण्या अडकला. मुंबईला पोहोचेपर्यंत सात साडे सात होणार हे त्याला ट्रॅफिक वरून समजले. मग त्याने मालकाना फोन वरच बातमी दिली.

घरी पोचण्या अगोदर मुलांना आवडणारी मिठाई घेऊन गण्या घरी पोचला. घरात आनंद उसळला. गण्याच्या कामाबद्दल गण्याला पगारच नव्हे तर कामाचे कमिशन मिळे. या कामाचे त्याला घसघशीत पैसे मिळणार होते. सगळे खूष झाले.

दुसऱ्या दिवशी ऑफिसमधे देखिल चैतन्य पसरले. मालक खूष होऊन गेले होते. तासभर सर्वांनी भरपूर गप्पा करून झाल्यावर काम सुरू केले.

काम बाकीचे लोक करणार होते. गण्या फक्त ते बरोबर झाले की नाही एवढेच पहाणार होता. म्हणून त्याच्या कडे वेळच वेळ होता. शांतपणे आपल्या खुर्चीत केबीन बंद करून गण्या झुलत होता.

अचानक डोळ्यासमोर सौ.रत्नपारखी आल्या व कोडं परत सुरू झालं. या बाईला कुठे भेटलोय? नक्कीच भेटलोय, कोण ही? मग डोळ्यासमोर बायकोच्या माहेरच्या मैत्रिणीतील एक एक जणी येवून गेल्या. पण कुणाशीच साम्य जुळत नव्हते आणि कोडे सुटत नव्हते.

दिसण्यात साम्य वाटत होते पण एवढी रंगरंगोटी व फॅशन करणारी एकादी बाई पाहिल्याचे आठवत नव्हते. चाळीशीकडे झुकलेली ही बाई अंगकाठीने बरीच स्थूल होती. गोऱ्यापान चेहेऱ्यावर मेकअपची कितीतरी पुटे चढवली होती. चाळीशीत न दिसणारी गालावरची लाली कृत्रीमपणे रंगवलेली होती. भुंवया कोरून काढल्या होत्या. डोळ्यांच्या पापण्या निळसर रंगवल्यामुळे विचित्र वाटत होत्या. केस मान झांकतील एवढेच ठेवून कापून टाकले होते. ते सुटेच होते. पोलक्याला बाह्या नसल्याने सुख दंडांच्या खाली लोंबकळताना दिसत होते.

चारी बाजूनी वाढलेल्या वजनामुळे गजराज गण प्रतीत होत होता. मग ही बाई आपण पूर्वी कशी बघीतली असेल? शक्यच नाही. मिसेस रत्नपारखींना आपण पूर्वी भेटलो असणे शक्य नाही. गण्याची विचारधारा अखंड वहात होती.

पण ते ओठ मुडपून बोलणे. तो डोळ्यातला निरागस भाव, आवाजातील आर्जव नक्कीच ओळखीचे वाटत होते. असेल कदाचित दुसऱ्या कुणात तरी पाहिलेले हे गुण चुकून हिच्यातही आले असतील. आपलाच गैरसमज होत असेल गण्या हळूहळू निष्कर्षावर पोचत होता.

चारपाच दिवसात सर्व ऑफर तयार झाली. ड्रॉईंग्ज तयार झाली आणि गण्या पुण्याला पोचला. रत्नपारखी खूष झाले. एवढ्या लवकर कामाचे प्लॅनींग ते ही त्यांच्या मनाजोगते झाले होते. सगळे कॉंट्रॅक्ट ४ कोटीहून जास्त झाले होते. रत्नपारखींच्या अंदाजापेक्षा ३० ते ५० लाखानी कमी असल्याने ताबडतोब पुढच्या कामाला सुरवात करायची ऑर्डर त्यांनी गण्याला देऊन टाकली.

आता गण्याचे काम संपले होते. बाकीचे सर्व इंजीनीयरींग डिपार्टमेंट करणार होते. झालेल्या कामाचे पैसे आणणे एवढीच गण्याची जबाबदारी राहीली होती.

तीन महिन्यांनी गण्या परत पुण्याला गेला. पहिला टप्पा पुरा झाला होता. रत्नपारखीनी पैसे द्यायचे कबूल केले होते. आता त्याची भेट मिसेस रत्नपारखी बरोबर होणार होती. फायनान्स त्यांच्या अखत्यारीत होता. सर्व कागदपत्र अगोदरच पाठवल्यामुळे मिसेस रत्नपारखीनी जास्त वेळ घेतला नाही. पण पेमेंट देताना म्हणाल्या "मिस्टर खोत, ताबडतोब निघणार की लंचला आम्हाला कंपनी देणार? काय सांगू मिस्टर रत्नपारखीना?"

"नको नको अहो माझी कसली कंपनी? मी साधा शाकाहारी घरचे जेवण जेवणारा. मला हॉटेलचे मानवत नाही की मी ड्रिंक्सही घेत नाही. माझी कसली कंपनी?" गण्या जरा ओशाळवाणा होत बोलत होता.

मिसेस रत्नपारखींनी जास्त आग्रह केला नाही, म्हणून गण्याची सुटका झाली. गण्याने निःश्वास सोडला व घाईतच निघून मुंबईचा रस्ता पकडला. पुढच्या दोन वेळी फारसे काही बोलणे झाले नाही. सगळी घडी रीतसर बसली होती. जेवढे काम होई त्याची बिले गण्या व्यवस्थित चेक करून पाठवी. दर दोन महिन्यानी स्वतः जाऊन पेमेंट आणी. मिसेस रत्नपारखी भेटत. हसून स्वागत करीत पेमेंटचा चेक देत व गण्या मुंबईला परत निघे.

आता काम पुरे होणार होते. शेवटचे दोन टप्पे बाकी होते. आणि गण्या पेमेंटसाठी मिसेस रत्नपारखीसमोर बसला होता. अचानक मिसेस रत्नपारखींचा प्रश्न आला.

"अहो खोत! आपले मूळ गाव कुठले? मी देखिल कोकणातलीच पण तुमचे गाव कुठले?"

"मी पिंपळगावचा. सिंधुदुर्ग जिल्हा. आपण?" गण्या

"काय योगायोग पहा! मी देखील पिंपळगावची, आणि तुमचे नाव गणेश खोत? लहानपणी मीही एका खोतांच्या घरी जायची. तिथे एक फार चांगला मुलगा भेटला होता. अतिशय धाडसी, मनमिळावू, मदतीला केव्हाही तयार असणारा. माझा अभ्यास त्याच्यामुळेच झाला."

मिसेस रत्नपारखी सांगत होत्या आणि गण्याच्या डोक्यात झंझावात सुरू झाला होता. तो एकदम ओरडला. "गोपाळ भटजींची पाऊ! तू पाऊ आहेस?"

"अहो हळू! ऑफिसमधे ऐकतील कोणी." मिसेस रत्नपारखी

"मी गणेश! मला ओळखले नाहीस? अग मीच पाऊचा अभ्यास घ्यायचो. आता तरी ओळखलेस?" गण्या

"हो! ओळखले पण केवढा बदल झालाय तुझ्यात. तो बारकुळा हाडकुळा गण्या कुठे आणि हा ऐटबाज सुटातला गणेश कुठे? कसं ओळखणार? पण थांब मी मिस्टर रत्नपारखीनाच बोलावते. मजा येईल आणि आज आपण एकत्रच लंच घेऊ. आमच्या घरी." एवढे बोलत तिने मि. रत्नपारखीना बोलावून घेतले. ते येताच त्यांना सांगू लागली.

"अहो हा गणेश खोत आमच्याच गावाचा. मी तुम्हाला सांगायची ते आठवते का? शाळेत असताना एका मुलाने मला अभ्यासात फार मदत केली. हाच तो. फार धाडसी होता. एवढासा बारकुळा पण एकटा जायचा जंगलातून." मिसेस रत्नपारखी आपले लहानपण मिस्टरांकडे उघडे करीत होत्या.

"अग पण आता ते एका मोठ्या कंपनीचे मार्केटींग मॅनेजर आहेत. त्यांना तू अरे तुरे काय करतेस? गणेशराव माफ करा हा. लहानपण आठवलं की असंच होतं काही जणांचं." मि.रत्नपारखी

"अहो पण आता आपण लंचला घरीच जाऊ. तुम्ही घेऊन या याला तासाभराने. तेवढयात मी जेवणाची व्यवस्था बघते. गण्या! काय आवडते रे तुला? पहिल्यांदाच पाऊकडे जेवणार आहेस सांग काय मेनू आवडेल?" मिसेस रत्नपारखी.

मिस्टर रत्नपारखी आता अवाक् झाले होते. त्यांची बायको पुरी लहानपणात भान हरपून शिरली होती. नांवेही लहानपणीची झाली होती. गण्या काय पाऊ काय? रत्नपारखी हंसतच म्हणाले "जितक्या लवकर जाता येईल तेवढी जा. अजून जास्त बोललीस आणि बाहेर स्टाफने ऐकले तर मला एंबरासींग होईल. काळजी करू नकोस मी नाही सोडत यांना तू जेवायला घातल्याशिवाय."

"पण त्याला सांगू देत तर खरं, काय आवडेल लंचला."

"काहीही चालेल मी सर्व खातो. फक्त तळलेले व गोड अगदी कमी खातो. पण व्हेजच हां." गण्या म्हणाला.

एवढे ऐकून पाऊ उर्फ माधवी घरी निघाली व गण्याला घेऊन रत्नपारखी आपल्या केबीनमधे गेले. गण्या विचारात पडला होता. लहानपण नजरे समोरून झरझर निघून जात होते.

पाऊ किती नाजूक व सुंदर दिसायची. ओठ केवढे लाल चुटुक होते. निसर्गताच तिला सौंदर्य बहाल झाले होते. पण आता? काय गरज होती तिला लांब सडक केस कापून बॉबकट करायची? त्या लालचुटुक ओठांवर कसलेतरी लिपस्टीक लावून बिघडवायची?"

रत्नपारखी घरी जायचं सांगत होते. "काय भूक नाही लागली का खोत? चला निघूया."

"हो चला! "

"अहो कसले एवढया विचारात पडला होता?"

"काही नाही लहानपणाच्या आठवणी एकदम ताज्या झाल्या. त्यात गुंगलो एवढेच. पाऊचा अभ्यास घेणं, शाळा सुटली की घरी पोचवणं सगळं आठवलं हो! केवढी भित्री होती. आई सोबत राहाता येणार नाही म्हणून शाळाच सोडणार होती. पहा आता शिकून तुमचा कारभार सांभाळायला कशी मदत करते ती." गण्या भडाभडा बोलत सुटला होता.

रत्नपारखी गाडी चालवता चालवता मधूनच एकादा कौतुकाचा कटाक्ष गण्याकडे टाकत होते. मग म्हाणाले “खोत आत्ता काही बोलू नका. जेवताना तुमच्या लहानपणीच्या सगळ्या मजा सांगा. तुमच्या पाऊच्या म्हणजे आमच्या माधवीच्या पुढयात सांगा. फार मजा येईल हो. आणि मलाही खूप शस्त्र मिळतील माधवीला वेळोवेळी चिडवायला.” गण्या हंसला, गप्प झाला. घर आले तसे रत्नपारखी गण्याला हात पकडूनच घरात घेऊन आले.

“वॉश घेणार? फ्रेश व्हा! “ रत्नपारखी.

गण्या फ्रेश झाला. बाहेर आला तर रत्नपारखी वाट पहात होते. एवढयात एक दहा वर्षाचा मुलगा धावत आला मागोमाग आठ वर्षाची मुलगी. गण्याची नजर मुलीवर पडली. तो पहातच राहीला. पाऊचीच मुर्ती हुबेहूब त्याच्यासमोर उभी होती. त्याच्या तोंडून एकदम निघाले “या रे पिल्लानो. मामाला भेटणार नाही?” मुलगा जरा लाजला पण मुलगी सरळ पुढे आली आणि गण्या जवळ बसत म्हणाली “मामा मला साप जेवतो कसा दाखवशील? आईला दाखवलास तसा?”

गण्या एकदम म्हणाला “आईने सगळे सांगीतले वाटते तुला. पण इथे पुण्यात कुठे दाखवणार तुला. इकडे माणसे आणि गाडया, सापांसाठी जागा कुठे आहे पुण्यात?” गण्याला कुठेतरी बरे वाटले. पाऊ त्याला विसरली नव्हती. तिलाही लहानपणचे दिवस लक्षात होते.

जेवताना तर गण्याला व पाऊला मुले आणि रत्नपारखी सारखे प्रश्न विचारत व तो उत्तर देई. गण्याने तळ्यात उतरून काढलेली कमळे. रानातून घरी जाताना वाटणारी भिती, मामाच्या घरची कामे, मग गण्याच्या आत्याच्या घरचा अभ्यास या सगळयांची उजळणी होत होती. जेवण संपता संपता रत्नपारखी एकदम म्हणाले “मुलानो या रजेत आपण आईच्या गावी जायचे. आणि ते ही या मामाना घेऊन. काय हो? पण आम्हाला तुमच्या घरी कोण कोण आहेत तेही सांगा.”

“मी आमच्या सौ व दोन मुले, दोन्ही मुलगेच आहेत” गण्या

“मग असं करूया, रजा पडली की तुम्ही सगळे पुण्याला या. दोन दिवस पुणे फिरा हिच्याबरोबर. मग निघू गावी जायला. आमच्या गाडीने सकाळीच निघायचे चालेल ना?” रत्नपारखी

“ए गण्या! हो रे! खरंच जाऊया. तुझ्या बायकोची, मुलांची चांगली ओळख होईल.” पाऊ उर्फ माधवी बोलली.

"ए आई, पण आजीला सांग हां, सारखी सारखी आंघोळ नाही घालायची. मला फार थंडी वाजते." पाऊची मुलगी तक्रार करीत होती. हे ऐकून गण्या एकदम् जोरांत हसू लागला. म्हणाला "काय ग पाऊ अजून तुझी आई सोवळं पाळते तर? मग तुला घरात कशी घेते. तिला माहीत नाही तू नॉनव्हेज खातेस?"

"ए बाबा गप्प बस तिला काही माहीत नाही. आणि आम्ही दोन दिवसांपेक्षा जास्त कधी राहिलोच नाही. बाबा रे, तू आहेस बडबड्या, बोलून जाशील आणि आम्हाला आईचे दार कायमचे बंद होईल." पाऊ.

रत्नपारखी गडगडाट हसत होते म्हणाले. "जाताना आपण झकास सॉसेजीस घेऊन जाऊ आणि सासूबाईंनाच खायला घालू म्हणजे झाले."

असे खेळीमेळीत जेवण संपले. चांगलाच उशीर झाला होता. निघायला पाहिजे असा विचार करीत असतानाच रत्नपारखी म्हणाले "गणेशराव आमची गाडी पाठवतो. ड्रायव्हर पोचवेल तुम्हाला. आणि हो, हिला मैत्रिणी जमा करायला आवडतात. आता तुमच्या बायकोशी मैत्री केल्याशिवाय राहाणार नाही. बोलक्या आहेत ना त्या? नसल्या तरी चालेल ऐकायला कोणी मिळाले की ही खूष असते." रत्नपारखी डोळे मिचकावीत हसत बोलले.

"पण गणेशराव तुमचे आभार मानलेच पाहिजेत. तुम्ही हिचा अभ्यास घेतलात. हुषारी दाखवली म्हणून पुण्यात आली. म्हणून आम्हाला बायको मिळाली. नाहीतर आमचा रामदास झाला असता हो" पावला पावलाला रत्नपारखी आता पाऊची खेचत होते.

गण्या देखिल हसत होता. त्याला रत्नपारखी पूर्ण आवडले होते. रुबाबदार होते. शरीर यष्टी व्यायामाने डौलदार ठेवली होती. डोळ्यातून मिस्कीलपणा ओसंडत होता. पण सर्वात मोठी गोष्ट म्हणजे रक्तात खरी खुरी श्रीमंती वहात होती. कंजूसपणाचा लवलेशही नव्हता. खेळीमेळीत हसत कोट्या करीत जगणारा एक पूर्ण श्रीमंत माणूस गण्याला दिसत होता.

गण्याला आपल्या बालपणीच्या मैत्रीणीचा संसार, पाहून खूप समाधान वाटत होते. त्याच तारेत तो मुंबईला परत निघाला. कार मुंबईकडे सुसाट धावत होती आणि गण्याच्या नजरे समोरुन पाऊच्या घरची दुपार उभी होत होती, झरझर पुढे सरकत होती. एवढयात काय झाले कोण जाणे त्याला नजरेसमोर

लहान पणाची पाऊ आली. गोरीपान, बांधेसुद, निरागस ,टपोरे डोळे, लाल चुटुक ओठ, हरिणीसारखे चपळ पण गोरे पाय, भुरभुर उडणारे चुकार केस व लांब लचक दोन वेण्या. केवढी सुंदर दिसायची पाऊ.

गण्याला शिवल्यामुळे थंड पाण्याची आंघोळ करून कुडकुडणारी सोवळी पाऊ. अंडे खातो हे समजल्यावर “शी, काय घाणेरडा आहेस” म्हणून ओरडणारी पाऊ. फुले ओच्यांत घेऊन धांवणारी पाऊ. ती लहानपणीची पाऊ एकदम नजरेसमोर भरभर येत होती.

घाट सुरू केव्हा झाला, संपला केव्हा गण्याच्या काहीच लक्षात आले नाही. ड्रायव्हरने गाडी फूड कोर्टवर घेतली आणि गण्याला विचारले “साहेब चहा पिऊन येऊ का?” तंद्रीतून जागा होत गण्या आजुबाजूला पहात म्हणाला “हो! हो! आणि काहीतरी खाऊनही घे. पोहोचेपर्यंत रात्री जेवणाची वेळ टळणार आहे. मी बसतोय गाडीतच. तू ये लवकर” ड्रायव्हरला पैसे देऊन गण्या परत आपल्या तंद्रीत शिरला. त्याला ती तंद्री फार गोड वाटत होती. त्यातच रहावे असे वाटत होते.

त्याने डोळे मिटले. सीट अजून मागे करून आरामात बसला. परत तंद्रीत शिरायचा प्रयत्न करू लागला पण आता त्याच्या डोळ्यासमोर आत्ताची पाऊ उर्फ माधवी येऊ लागली.

केसांचा बॉबकट, तोंडांवर कितीतरी प्रकारची क्रिम्स लावलेली. कृत्रिमपणाने गालावर लाली लावून चाळिशीतून पंचवीशीत जाण्याचा केविलवाणा प्रयत्न करणारी, सुखासीन झाल्यामुळे चारी बाजूनी पसरलेली. चालताना गजगतीने चालणारी, ओठांवर कसल्या कसल्या छटांचे लिपस्टीक लावून मूळचे सौंदर्य घालवणारी, कुणालाही शिवले तर सोवळ्याचे भान विसरलेली, लहानपणीची अंड्याचा तिटकारा करणारी पण आता चिकन वर ताव मारणारी. ही पाऊ श्रीमंतीने बिघडवलेली तर नव्हती ना? की शहरी अनिर्बंध सुखाना बळी पडलेली होती? मी नॉनव्हेज खात नाही म्हटल्यावर आश्चर्य व उपहासाने पहाणारी ही पाऊ खरी की लहानपणीची ती पाऊ खरी?

आता मात्र प्रवास कंटाळवाणा होत होता. केव्हा एकदा घरी पोचतो असे झाले होते. पाऊचे विचार जेवढया लवकर संपतील तेवढे बरे वाटणार होते.

मनातील काही प्रतिमांना तडे जायला लागले की केवढे दुःख होते हे तो पहिल्यांदाच अनुभवत होता.

********

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील  सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत. त्याशिवाय वर्षाला सुमारे तीस ते चाळीसलाख वाचक वेबसाईटवरून पुस्तके डाऊनलोड करतात.

अर्थात याने आमचं समाधान नाही. सुमारे बाराकोटी मराठी माण्सांपैकी किमान अर्धे म्हणजे सहा कोटी लोक “वाचक” व्हावेत अशी आमची इच्छा आहे. माउलिंनी सांगितलंय. “जो जे वांछिल ते तो लाहो”. आमचीही वांछा “तो” पूर्ण करील. करीलच.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail.com या पत्त्यावर पाठवा बरं!